सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | मंगळवार, १० सप्टेंबर २०२४ | वर्ष दुसरे | अंक १६९ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## मुख्यमंत्र्यांच्या वर्षा निवासस्थानी केंद्रीय गृहमंत्र्यांनी घेतले गणरायाचे दर्शन



मुंबई, ९ सप्टेंबर : केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आज मुख्यमंत्र्यांच्या वर्षा निवासस्थानी भेट देत गणरायाचे दर्शन घेतले. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गृहमंत्री शाह यांचे स्वागत केले.

गृहमंत्री शाह यांच्या हस्ते गणपतीची आरती करण्यात आली. यावेळी मुख्यमंत्री श्री. शिंदे आणि खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या हस्ते केंद्रीय गृहमंत्री शाह यांचे शाल, श्रीफळ देवून सत्कार करण्यात आला. तसेच त्यांना 'शासन आपल्या दारी' पुस्तकाची प्रत आणि गणपतीची मूर्ती भेट म्हणून देण्यात आली. मुख्यमंत्र्यांच्या स्नुषा वृषाली शिंदे यांनी गृहमंत्री शाह यांचे औक्षण करीत स्वागत केले.

यावेळी राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मंत्री दीपक केसरकर, मंगल प्रभात लोढा, माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे, आमदार चंद्रशेखर बावनकुळे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी गृहमंत्री शाह यांनी मुख्यमंत्री शिंदे, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, स्नुषा वृषाली यांच्याशी संवाद साधला.

# जाहीर वाद टाळा, विरोधकांच्या फेक नरेटिव्हला उत्तर द्या!

## अमित शाहांच्या महायुतीतील नेत्यांना सूचना

मुंबई, ९ सप्टेंबर : आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर रविवारी रात्री मुंबईत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या उपस्थितीत महायुतीची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. सह्याद्री अतिथीगृहावर रात्री उशिरापर्यंत सुरू असलेल्या या बैठकीत अनेक महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा झाल्याची माहिती आहे. लोकसभा निवडणुकीच्या काळातील चुका टाळा. विधानसभेच्या उमेदवारांची निवड करताना विनिंग मेरिट हाच निकष डोळ्यांमसोर ठेवा, अशा सूचना अमित शाह यांनी महायुतीच्या नेत्यांना दिल्या. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांसह प्रमुख नेते उपस्थित होते.



याशिवाय, विधानसभा निवडणुकीच्या काळात महायुतीमधील अंतर्गत वाद चव्हाट्यावर येऊ देऊ नका, अशी सक्त ताकीदही शाह यांनी नेत्यांना दिली. या बैठकीत अमित शाह यांनी विधानसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी कोणत्या भागात किती आणि कधी सभा घ्यायच्या, याबाबतच्या नियोजनासाठी महायुतीच्या नेत्यांशी चर्चा केली. तसेच विधानसभा निवडणुकीसाठी अमित शाह यांनी भाजपच्या काही नेत्यांवर विशेष जबाबदारी सोपवली आहे.

अमित शाहांनी महायुतीच्या बैठकीत सांगितले की, महायुतीमधील धुसफूस चव्हाट्यावर आणू नका, जाहीर वाद टाळा, लोकसभा निवडणुकीत झालेल्या चुका टाळा, जिंकून येण्याची क्षमता असलेले योग्य उमेदवार निवडा, विरोधकांच्या फेक नरेटिव्हला उत्तर द्या, महायुतीच्या नेत्यांनी संयम ठेवावा, एकजूट दिसेल, याची काळजी घ्या, राज्य सरकारने घेतलेले निर्णय जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचवा आणि भाजपच्या ज्या आमदारांची कामगिरी समाधानकारक नाही, त्या जागांबाबत योग्य निर्णय घ्या.

## जम्मू-काश्मीर : दोन घुसखोरांना कंठस्नान

जम्मू, ०९ सप्टेंबर : जम्मू-काश्मीरच्या राजौरी जिल्ह्यातील नौशेरा सेक्टरमध्ये नियंत्रण रेषेवर भारतीय जवानांनी घुसखोरीचा आणखी एक प्रयत्न हाणून पाडला आहे. जवानांनी घुसखोरी करणाऱ्या दोन जिहादी दहशतवाद्यांचा खात्मा केला आहे.

यासंदर्भातील माहितीनुसार, गुप्तचर यंत्रणा आणि जम्मू-काश्मीर पोलिसांना घुसखोरीची माहिती मिळाली होती, त्यानंतर एलओसीवर अलर्ट जारी करण्यात आला होता. सीमेवर सज्ज असलेल्या जवानांनी घुसखोरांना गोळ्या घातल्या. यावेळी या जिहादी दहशतवाद्यांकडून मोठ्या प्रमाणात शस्त्रसाठा जप्त करण्यात आला आहे. आतापर्यंत २ एके-४७ रायफल आणि एक पिस्तूल जप्त करण्यात आले आहे. परिसरात सर्च ऑपरेशन सुरू आहे. जम्मू-काश्मीरमधील विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सुरक्षा यंत्रणा हाय अलर्टवर आहेत. यापूर्वी ३० ऑगस्टल रोजी सैन्याने दहशतवाद्यांचा मोठा कट उधळून लावला होता. यावेळी सुरक्षा दलांनी विशेष मोहीम राबवून घुसखोरीचा प्रयत्न करणाऱ्या ३ दहशतवाद्यांचा खात्मा केला आहे.

केंद्रशासित प्रदेशाच्या निर्मितीनंतर जम्मू-काश्मीरमध्ये पहिल्यांदाच विधानसभा निवडणुका होणार आहेत. निवडणूक आयोगाने राज्यातील ९० विधानसभा जागांसाठी मतदानाच्या तारखा जाहीर केल्या आहेत.

## भारतात मंकीपॉक्सचा आढळला पहिला रुग्ण, केंद्र सरकारने केली अधिकृत घोषणा

मुंबई: भारतात मंकीपॉक्सचा पहिला संशयित रुग्ण आढळल्यानंतर केंद्रीय आरोग्य मंत्रालय अलर्ट झाले आहे. एमपॉक्स व्हायरसशी लढणाऱ्या देशात परतलेल्या एका व्यक्तीला रुग्णालयात वेगळ्या ठिकाणी ठेवण्यात आले आहे. संक्रमण झाल्याचे समोर आल्यानंतर त्याच्या नमुन्यांचा तपास केला जात आहे. आरोग्य मंत्रालयाने एक विधान जारी करून सांगितले की चिंतेची कोणतीही बाब नाही.

केंद्राच्या माहितीनुसार एक युवा पुरूष रुग्ण जो नुकताच मंकीपॉक्सच्या संक्रमण झालेल्या देशातून आला होता त्याला मंकीपॉक्स झाल्याचे समोर आले आहे.

ही केस WHO रिपोर्टचा भाग नाही - आरोग्य मंत्रालय

केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने आपल्या विधानात पुढे म्हटले की हे एक वेगळे प्रकरण आहे जे जुलै २०२२ मध्ये भारतात रिपोर्ट करण्यात आलेल्या पहिल्या ३० प्रकरणांसारखे आहे. हे सध्या सार्वजनिक आरोग्य आपातकालचा भाग नाही.

प्रोटोकॉलनुसार होत आहेत उपचार

आरोग्य मंत्रालयाच्या माहितीनुसार हे प्रकरण प्रोटोकॉलनुसार रेस्ट्रिक्ट केले जात आहे आणि संपर्कही ट्रेसिंग केले जात आहे. यामुळे संभाव्य सोर्सची माहिती मिळवता येईल.

घाबरण्याची गरज नाही - आरोग्य मंत्रालय

जगभरातील अनेक देशांमध्ये कहर करणाऱ्या मंकी पॉक्सबाबत आता भारतात धोक्याची घंटा वाजली आहे. खरंतर मंकीपॉक्सचे संशयित प्रकरण भारतात आढळले आहे.

## इस्त्रायलला होणारा शस्त्रपुरवठा सुरुच राहणार; याचिकेवर सुनावणीस सुप्रीम कोर्टाचा नकार

नवी दिल्ली, ०९ सप्टेंबर : भारताकडून इस्रायलला होणारा शस्त्रास्त्र पुरवठा रोखण्याची मागणी करणाऱ्या याचिकेवर सुनावणी करण्यास सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला आहे. सरन्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने सांगितले की, परराष्ट्र धोरण हा पूर्णपणे केंद्र सरकारच्या अखत्यारीतील विषय असल्याचे सांगत कोर्टाने यात हस्तक्षेप करण्याचे कोणतेही कारण नाही.

वकील प्रशांत भूषण यांच्या माध्यमातून दाखल केलेल्या याचिकेत इस्रायल पॅलेस्टाईनमध्ये नरसंहार करत असल्याचा आरोप करण्यात आला आहे, त्यामुळे भारत सरकारने कंपन्यांना इस्रायलला लष्करी वस्तूंचा पुरवठा थांबवावा. याचिका दाखल करणाऱ्यांमध्ये निवृत्त सनदी अधिकारी कुमार शर्मा, माजी आयएएस मीना गुप्ता, माजी आयएफएस देब मुखर्जी, दिल्ली विद्यापीठाचे सामाजिक विज्ञानाचे माजी डीन प्राध्यापक अचिन विनायक, प्रसिद्ध प्रोफेसर जीन ड्रेझ, प्रसिद्ध कर्नाटक शास्त्रीय संगीतकार थोदूर मदाबुसी कृष्णा, सामाजिक कार्यकर्ते डॉ. दर्श मंदार आणि मजदूर-किसान शक्ती संघटनेचे निखिल डे होते.



याचिकेत नवीन परवाने देण्यावर बंदी घालण्याची मागणी करण्यात आली आहे आणि म्हटले आहे की, आंतरराष्ट्रीय करारावर स्वाक्षरी करून, भारत नरसंहार थांबवण्यासाठी सर्व उपाययोजना करण्यास बांधील आहे. त्यामुळे ते इस्रायलला कोणतीही लष्करी उपकरणे किंवा शस्त्रे निर्यात करू शकत नाहीत. तेही जेव्हा या शस्त्रांचा वापर युद्ध गुन्ह्यांसाठी केला जाऊ शकतो असा गंभीर धोका असतो. याचिकेत आंतरराष्ट्रीय न्यायालयाच्या २६ जानेवारीच्या निर्णयाचा हवाला दिला होता, ज्या अंतर्गत गाझा पट्टीतील गुन्हेगारी प्रतिबंध आणि शिक्षेवरील कन्व्हेन्शन अंतर्गत त्याच्या जबाबदाऱ्यांचे उल्लंघन केल्याबद्दल इस्रायलविरुद्ध तात्पुरत्या उपाययोजना करण्याचे आदेश दिले होते.

याचिकाकर्त्यांच्या म्हणण्यानुसार, लष्करी शस्त्रांचा सतत पुरवठा करणे हे भारतीय संविधानाच्या कलम १४ आणि २१ चे तसेच आंतरराष्ट्रीय कायद्यांनुसार भारताच्या दायित्वांचे उल्लंघन आहे. याचिकेत म्हटले होते की, भारताने इस्त्रायलला दिलेली मदत, विशेषत: लष्करी उपकरणांसह, जर ही मदत नरसंहार करार, आंतरराष्ट्रीय मानवतावादी कायदा किंवा सामान्य आंतरराष्ट्रीय कायद्याच्या इतर आदेशांचे उल्लंघन करण्यासाठी वापरली जात असेल तर ती तात्काळ थांबवावी इस्रायलला आधीच पुरविण्यात आलेली शस्त्रे नरसंहार करण्यासाठी, नरसंहारासाठी हातभार लावण्यासाठी किंवा आंतरराष्ट्रीय मानवतावादी कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या रीतीने वापरली जाणार नाहीत याची खात्री करण्यासाठी भारताने त्वरित सर्व शक्य प्रयत्न केले पाहिजेत असे याचिकेत म्हंटले होते.

# विषाणूजन्य आजारांबाबत आणखी दक्षता आवश्यक : मनपा आयुक्त यशवंत डांगे

### जनजागृती मोहीम आणखी चार आठवडे चालणार

अहमदनगर : पावसाळ्यात उद्भवणारे विषाणूजन्य आजार रोखण्यासाठी महानगरपालिकेच्यावतीने गेल्या आठ आठवड्यापासून जनजागृती मोहीम सुरू आहे.नगरकरांच्या सहकार्यामुळे आपण सर्व डेंग्यू ,झिका आदी विषाणूजन्य आजार रोखण्यात यशस्वी झालो असलो तरी आणखी दक्षता घेण्याची आवश्यकता असल्याने ही जनजागृती मोहीम पुढील चार आठवडे चालविण्यात येणार असल्याची माहिती महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांनी दिली.

विषाणूजन्य आजार जनजागृती मोहिमेच्या आठव्या आठवड्यात चिपाडे मळा, सारसनगर भागात प्रत्यक्ष भेटी देऊन डास उत्पत्ती स्थाने नष्ट करण्यात आली. खबरदारीच्या उपाययोजना बाबत जनजागृती करण्यात आली. त्यावेळी नागरिकांना



मार्गदर्शन करताना आयुक्त डांगे बोलत होते.

यावेळी माजी उपमहापौर गणेश भोसले म्हणाले की, नगरकरांनी आपला परिसर स्वच्छ ठेवण्यात महापालिका प्रशासनाला सहकार्य करणे आवश्यक आहे. महानगरपालिकेने गेल्या सात आठवड्यांपासून राबविलेल्या विषाणूजन्य आजार जनजागृती मोहिमेमुळे रुग्णसंख्येत लक्षणीय घट दिसून येत आहे. महापालिका प्रशासनाचे कार्य कौतुकास्पद असल्याचे देखील यावेळी श्री. भोसले म्हणाले. अजय पिसोटे म्हणाले की, रोटरी क्लबच्या माध्यमातून नागरिकांच्या आरोग्यासाठी वर्षभर विविध उपक्रम राबविले जातात. विषाणूजन्य आजार प्रतिबंधासाठी आमचे महापालिकेला नेहमीच सहकार्य असेल. त्या माध्यमातून डास उत्पत्ती रोखण्यासाठी प्रभावी उपाययोजना म्हणून व्हेंट पाईपला जाळ्या बसवण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. अनिल बोरगे म्हणाले की, पावसाळ्यातील आजार रोखण्यासाठी मोठ्या प्रमाणात जनजागृती झाल्यामुळे व आरोग्य विभागाने केलेल्या प्रभावी उपाययोजनांमुळे त्यावर नियंत्रण मिळवण्यात यश आले आहे. परंतु शहरात चिकनगुण्याचे रुग्ण आढळून येत असल्यामुळे त्यावर देखील प्रभावीपणे उपाययोजना सुरू करण्यात आल्या आहेत. यासाठी देखील नगरकरांचे सहकार्य अपेक्षित असल्याचे डॉ. बोरगे यांनी यावेळी सांगितले.

यावेळी माजी नगरसेवक संजय चोपडा, प्रकाश भागानगरे, प्रियांका पिसोटे, डॉ. सचिन गांधी, डॉ. निशांत गरुड, डॉ. संदीप राऊत, मधुर बागायत, डॉ.आयेशा शेख, डॉ. अश्विनी मरकड, डॉ. सृष्टी बनसोडे, पुरुषोत्तम आडेप आदींसह अधिकारी कर्मचारी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## विद्यार्थ्यांनी या देशाचा एक चांगला नागरिक बनणे आवश्यक : पद्मश्री डॉ.जहीर इसाक काझी



छत्रपती संभाजीनगर, दि.९ : भारत हा जगातील सर्वात तरूण देश असून देशातील तरुणांनी उपलब्ध संधीचा योग्यप्रकारे लाभ घेणे आवश्यक आहे. तरुणांनी आपल्याला आवडणाऱ्या क्षेत्रात शिक्षण घेत समर्पण भावनेने काम करीत राहिले पाहिजे. आपल्या आजूबाजूला घडणाऱ्या गोष्टीबद्दल विद्यार्थ्यांनी जागरूक राहत एक चांगला माणूस बनत असताना या देशाचा एक चांगला नागरिकही बनले पाहिजे, असे प्रतिपादन पद्मश्री डॉ.जहीर इसाक काझी यांनी येथे केले.

महात्मा गांधी मिशन विद्यापीठाचा पाचवा वर्धापन दिन सोहळा विद्यापीठाच्या रुक्मिणी सभागृहात मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी पद्मश्री डॉ.जहीर इसाक काझी यांनी उपस्थितांशी संवाद साधला. यावेळी, एमजीएमचे उपाध्यक्ष डॉ.पी.एम.जाधव, एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, शिक्षणतज्ञ भाऊसाहेब राजळे, कुलगुरू डॉ. विलास सपकाळ, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, सर्व अधिष्ठाता, प्राध्यापक, विद्यार्थी व सर्व संबंधित मान्यवर उपस्थित होते.

चिंतनगाह परिसरात मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. त्यानंतर या ठिकाणी ध्वजारोहण आणि विद्यापीठ गीतगायन संपन्न झाले. प्रमुख पाहुण्यांना एनसीसीच्या विद्यार्थ्यांकडून गार्ड ऑफ देण्यात आला.एमजीएम विद्यापीठाच्या वाटचालीची संपूर्ण माहिती यावेळी माहितीपटाच्या माध्यमातून दाखविण्यात आली. आज मान्यवरांच्या हस्ते 'एमजीएम अभिव्यक्ती २०२४' या न्यूजलेटरचे प्रकाशन करण्यात आले. त्याचप्रमाणे वृत्तपत्रविद्या आणि जनसंवाद महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांच्या 'एमजीएम इन्स्पायर' अंकाचेही प्रकाशन करण्यात आले. आजच्या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.दीपा देशपांडे व प्रा. मोहसीन अंसारी यांनी केले तर आभार प्रा. शिव कदम यांनी मानले.

# दोन वर्षानंतर नाथसागर पुन्हा तुडुंब; गोदावरी नदीत पाण्याचा विसर्ग सुरु





तभा वृत्तसेवा

पैठण दि ०९ : दोन वर्षानंतर पुन्हा तुडुंब भरलेल्या नाथसागर जलाशय सांडव्याच्या २७ पैकी ६ द्वारातून अखेर गोदावरी पात्रात ३ हजार १४४ पाण्याचा विसर्ग करण्यात येत असून नदीकाठच्या नागरिकांना सतर्कतेचा ईशारा देण्यात आला आहे.धरणात येणाऱ्या पाण्याची आवक पाहता सुरू असलेला विसर्ग हा कमी जास्त करण्यात येणार असल्याची माहिती अधीक्षक अभियंता समाधान सबनिसवार यांनी दिली.

मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या शेती सिंचन व औद्योगिक वसाहतीसाठी वरदान ठरलेल्या पैठण येथील नाथसागर धरणातून सोमवार रोजी दुपारी धरणाचे सहा दरवाजे क्रमांक १०,२७,१८,१९,१६,२१ या दरवाजातून गोदावरी नदीत ३ हजार १४४ क्युसेक पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे सोमवार रोजी दुपारी बारा वाजेच्या दरम्यान वरील धरणातून पाण्याची १२ हजार क्युसेक आवक सुरू असल्यामुळे सायंकाळपर्यंत पाण्याचे आवक लक्षात घेता गोदावरी नदीतील सोडण्यात आलेला विसर्ग वाढ होण्याची शक्यता अधीक्षक अभियंता समाधान सबनीसवार, कार्यकारी अभियंता प्रशांत जाधव, धरण उप अभियंता रायबोले, विजय काकडे यांनी व्यक्त केला आहे. आठवड्यापासून नाथसागर धरणाचे दरवाजे उघडून गोदावरी पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात येणार असल्यामुळे नदी काठावरील नागरिकांनी गोदावरीत येणाऱ्या पाणी पाहण्यासाठी गर्दी केली होती तर पैठण शहरात धरणाच्या पायथ्याशी पाणी पाहण्यासाठी पर्यटक नागरिकांनी आतापासूनच गर्दी सुरू केली. धरण परिसरात मोठ्या प्रमाणावर पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला असून नाथसागर धरणाचे दरवाजे

अर्धा फुटाने उघडून पाटबंधारे विभागाचे अधीक्षक अभियंता समाधान सबनीसवार, कार्यकारी अभियंता प्रशांत जाधव, धरण उप अभियंता विजय काकडे, पोलीस निरीक्षक संजय देशमुख, नामदेवराव खरात,माजी नगराध्यक्ष सोमनाथ परदेशी, यांच्या हस्ते नाथसागर धरणाची पाण्याची व धरणाच्या दरवाज्याचे विधिवत्त पूजन करून गोदावरी नदीत पाण्याचा विसर्ग सुरु केला आहे.

यापूर्वी या धरणातून उजवा कालव्यातून माजलगाव धरणासाठी ५०० क्युसेक पाण्याचा विसर्ग करण्यात आलेला आहे.यावेळी उपविभागीय अभियंता रायबोले, शाखा अभियंता संदीप कुरले, गणेश खराडकर, आप्पासाहेब गकड,अब्दुल बारी गाझी,आप्पासाहेब तुजारे, रामनाथ तांबे, शेषेराव आडसुड,सुरक्षा रक्षक इंचार्ज आबासाहेब गरुड आदी उपस्थित होते.नाथसागर धरणाचा पाणीसाठा हा ९८ टक्के ईतका झाला आहे.



## शेत रस्त्याकडे तहसीलदारांचे दुर्लक्ष

# रस्त्यामुळे दुखापत व जीवित हानी झाल्यास प्रशासन जबाबदार :शेतकऱ्यांचा इशारा

सिल्लोड (प्रतिनिधी) : पाल येथील महाराणा प्रताप नगर ते जाधववाडी वस्तीकडे मुख्य रस्त्यालगत जिल्हा परिषद बांधकाम उप विभागाने रस्त्याचे काम करताना रस्त्याच्या बाजूने चारीचे खोदकाम केलेले आहे परंतु या रस्त्यालगत असलेल्या शेतकऱ्यांना शेतात जाते - येते वेळीस मोठी कसरत करावी लागत असून कहिक वेळा बैलगाडी व ट्रॅक्टर उलटून येथील शेतकरी जखमी झालेले हा त्रास कमी व्हावा व बैलगाडी व ट्रॅक्टर उलटून भविष्यात जिवित हानी होण्याची भीतीने येथील शेतकऱ्यांनी तहसीलदार,तलाठी,व ग्रामसेवक यांच्याकडे वेळोवेळी तक्रार निवेदन दाखल करूनही येथील शेतकऱ्यांना प्रशासनाकडून न्याय मिळत नसल्याचा गंभीर प्रकार समोर आलेला आहे.

सदर शेत रस्त्याचा प्रश्न सोडवण्यासाठी तहसील कार्यालयाकडे दिनांक २८/१२/२०२०, दिनांक २५/०५/२०२३, दिनांक ३१/०५/२०२३,व तसेच तहसीलदार,तलाठी,व ग्रामसेवक यांच्याकडे दिनांक २६/०२/२०२४,रोजी तक्रार निवेदन दाखल करण्यात आलेले आहे व तसेच रुपये ४५०० व रुपये २२५० चा भरणा करून दिनांक १०/०६/२०२४ रोजी स्वखर्चाने रीतसर मोजणी करून तहसीलदार, जि.प.उपाभियंता,तलाठी,व ग्रामसेवक यांच्याकडे नुकतेच पुनश्च तक्रार निवेदन दाखल करत रस्त्यालगत चारीत सिमेंट नाली टाकून देण्याची कार्यवाही १० दिवसात करण्याचे किंवा शेतात जाण्यासाठी रस्त्यालगत चारीत सिमेंट नाली टाकण्यासाठी लेखि परवानगी देण्याची किफायत तक्रार निवेदनात केलेली असून सदर रस्त्याचा प्रश्न प्रलंबित राहूल्यास यापुढे बैलगाडी व ट्रॅक्टर उलटून आंम्हा शेतकऱ्यांना शारीरिक दुखापत अथवा जीवित हानी झाल्यास त्यास तहसीलदार फुलंब्री, जि.प. बांधकाम उपाभियंता,तलाठी पाल ,व ग्रामसेवक पाल हे वैयक्तिक जबाबदार राहतील,असा इशारा व्यथित झालेल्या शेतकऱ्यांनी दिला आहे. सदर तक्रार निवेदनावर बाळू तुकाराम काळे,विजय काळे,निवृत्ती काळे,रमेश तुकाराम काळे,ज्ञानेश्वर काळे यांनी स्वाक्षरी केलेली आहे.

## एकही पात्र लाभार्थी घरकुल योजनेपासून वंचित राहणार नाही - पालकमंत्री ना.अब्दुल सत्तार

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.९ सप्टेंबर



प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत सिल्लोड - सोयगाव तालुक्यात जवळपास ६ हजार लाभार्थ्यांना मं… आहे.मात्र उर्वरित जे लाभार्थी राहिलेत त्यांना तीन ट… ळणार आहे असे पालकमंत्री ना.अब्दुल सत्तार यांनी स… घर बांधण्यासाठी स्वतःची जागा नाही,काही जण गायरा… अनेक वर्षांपासून राहत आहे.अशा लाभार्थ्यांचा जा… न प्रत्येक पात्र लाभार्थ्यांना घरकुलाचा लाभ देण्यात येईल एकही पात्र लाभार्थी घटकूल योजनेपासून वंचित राहणार नाही अशी ग्वाही पालकमंत्री ना. अब्दुल सत्तार यांनी दिली.

प्रधानमंत्री आवास योजना टप्प्या क्र.२ अंतर्गत सोयगाव तालुक्यातील १ हजार ६८२ लाभार्थ्यांचे घरकुल मंजूर झाले असल्याची माहिती पालकमंत्री ना. अब्दुल सत्तार यांनी दिली आहे. त्यामुळे बेघरांचे स्वप्न साकार होऊन त्यांना हक्काचे घर मिळणार आहे. येत्या १५ तारखेला प्रधानमंत्री मा.ना.नरेंद्रजी मोदी यांच्याहस्ते ऑनलाइन पद्धतीने लाभार्थ्यांच्या खात्यात घरकुल योजनेचा लाभ जमा होणार आहे.

अनुसूचित जाती / जमाती व इतर अशा लाभार्थ्यांच्या याद्या ग्रामपंचायत कडे गटविकास अधिकारी दादाराव आहिरे यांनी सादर केल्या आहेत.त्याअनुषंगाने सदरील लाभार्थ्यांनी आपले आधारकार्ड,बँक पासबुक,जातीचा दाखला, नरेंगाचे जॉबकार्ड,स्वतःची जागा उपलब्ध असल्याचा दाखला पंचायत समितीत दाखल करावेत असे आवाहन पालकमंत्री ना.अब्दुल सत्तार यांनी केले आहे.

## गणेश उत्सवात पंधरा दिवसापासून टाकळगांव अंधारात

नायगांव( प्रतिनिधी.) : डी.पी .नादुरुस्त असल्याने ऐन गणेश उत्सवाच्या काळात गेली पंधरा दिवसापासून टाकळगांव पुर्ण अंधारात असताना महावितरण विभाग मात्र लक्ष देण्यास तयार नाही. पिण्याच्या पाण्यासह गावातील पिठाची गिरण्या बंद आसल्याने नागरिक चांगलेच वैतागले आहेत. गावकरी नायगांव कार्यालयात तळ ठोकून बसले आहेत. नायगांव तालुक्यातील टाकळगांव हे नायगांव महावितरण उपविभाग अंतर्गत येत असुन गावातील डी.पी.गेली पंधरा दिवसापासून नादुरुस्त असल्याने गावक-यानी या संदर्भात नायगांव कार्यालयात लेखी तक्रार ही केली . गाव पुर्ण अंधारात आसताना महावितरण च्या अधिका-याने गावक-याच्या मागणीची दखल अजतागायत घेतली नसल्याने गावकरी मात्र महावितरण च्या बेजबाबदारपणाला चांगलेच वैतागले आहेत. गावात लाईट नसल्याने पिण्याचे पाणी मिळत नाही. पिठाची गिरणी बंद असल्याने बाहेर गावी जाव लागत आहे . पावसाळ्याचे दिवसात नागरिकासह लाहण मुलाना आंधाराचा सामना कराव लागत आहे. दोन दिवसावर लक्ष्मी पुजन आहे सर्वत्र लाइटींगची सजावट असते.आशी गंभीर परिस्थीती आसताना महावितरण विभाग टाकळगांव प्रकरणी कीती गंभीर आहे यावरूण दिसत आहे.



## पुंडलिक शिंदे यांचे निधन

तभा.वृत्तसेवा

सोयगाव, फर्दापूर दि.९ सप्टेंबर

सोयगाव तालुक्यातील फर्दापूर येथील पुंडलिक मानाजी शिंदे (वय.८५) यांचे दि.९ सोमवार रोजी सकाळी वेळ ११:३० वा. अल्पशा आजाराने राहत्या घरी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर सोमवार रोजी सायंकाळी ६:०० वा. फर्दापूर येथील बौद्ध स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी,तीन मुले,दोन मुली,सुन,नातवंडे,असा परिवार आहे. पत्रकार जगन शिंदे यांचे ते वडील होत.

# गंगापूर खुलताबाद तालुक्यात तब्बल पाच हजार ३७७ घरकुल मंजूर

### गंगापूर तालुक्यात१११तर खुलताबाद तालुक्यात ४० गावांना मिळणार लाभ. आ. प्रशांत बंब

तभा वृत्तसेवा

गंगापूर दि.९ सप्टेंबर : गंगापूर तालुक्यातील १११ गावातील चार हजार २९१ तर खुलताबाद तालुक्यातील ४० गावातील एक हजार ८६ अशा एकुण गंगापूर आणि खुलताबाद तालुक्यातील पाच हजार ३७७ लाभार्थ्यांना घरकुले मंजूर केल्याची माहिती आमदार प्रशांत बंब यांनी दिली असून त्यांनी केंद्राकडे केलेल्या पाठपुराव्याला यश आले आहे.

पंतप्रधान आवास योजने अंतर्गत सन २०२४ - २५ करिता जिल्ह्यातून गंगापूर आणि खुलताबाद तालुक्यात सर्वाधिक पाच हजार ३७७ घरकुले आमदार प्रशांत बंब यांनी मंजूर करून घेत आपली छाप पुन्हा एकदा मतदारसंघात सोडली आहे. या अगोदरही आमदार प्रशांत बंब यांनी गंगापूर आणि खुलताबाद मतदारसंघात सर्वात जास्त विकास निधी खेचून आणला आहे व आता देखील जिल्ह्यात सर्वाधिक घरकुले मंजूर करून घेतली आहे. त्यामुळे त्यांचे वर्चस्व मतदारसंघात कायम आहे. **गावनिहाय गंगापूर तालुका मंजूर घरकुले :** अगरकानडगाव ३९, अकोली वडगाव ६३, अंमळनेर ४८, आंबेगाव २६, आंबेलोहळ ७८, आसेगाव ३३, बाबरगाव ४१,बाभूळगाव ६१, बगडी २१, भागाठाण २७, भालगाव ३४,



भेंडाळा ६०, भिऊ धानोरा १२, भोयेगाव ९०, बोलेगाव ०५, बुट्टे वाडगाव २४ दहेगाव ५१, देवळी ०४, धामोरी बुद्रुक २०, धामोरी खुर्द ५३, ढोरेगाव १७, दिघी ६८, दिनवाडा ३३, डोमेगाव १२, डोणगाव ५६, एकलहरा ४५, फतियाबाद १८, फुलशेवरा १३, गाजगाव ३८, गळणनिंब २६, गणेशवाडी १३, गवळी धानोरा ०९, गवळीशिवरा २०, घाणेगाव २०,घोडेगाव १८, गुरु धानोरा ५२ हैबतपुर ३६, इटावा ०६, जंभाळा २२, जामगाव १२६, जिगठाण १०६, जोगेश्वरी ६३, कायगाव ७३, कणकोरी २२, कासोडा ५०, काटेपिंपळगाव ५९, खडकनारळा ०४ किनळ ०५, कोडापूर २५, लखमापूर २६, लांझी २५, लिंबेजळगाव ०९, मेहबूबखेडा ३१, व महोली १४, माळीवाडगाव ६०, मलकापूर २४,मालुंजा खुर्द ३३, ममदपूर २५, मांडवा ३१, मांगेगाव ७०, मांजरी ८०, मुद्देशवाडगाव ३२, नंद्राबाद १३, नारायणपूर बुद्रुक २६, नवाबपूर १८, नेवरगाव ११८, पाचपिरवाडी १५, पखोरा ३०, पांढरोहळ ६६, पेंढापूर ४८, पिंपळगाव ४१, पिंपरखेडा १८, प्रतापूरवाडी ०१, पुरी ३०, रायपूर ४१, रांजणगाव नरहरी ६५, रांजणगाव पोळ ४०, रांजणगाव शेणपुंजी ३८, सावखेडा ६६, सावंगी लासुर स्टेशन २३३, शहापूर २७, शहापूर बंजर १८, शंकरपूर १९, शेंदूरवादा ३६, शिंगी १८, शिवराई ०५, सिद्धनाथ वाडगाव ६१, शिल्लेगाव २७, सिंदीशिरसगाव १६, शिरसगाव २६, शिरेगाव ३५, शीरेसायगाव ५५, सोलेगाव २६, सुलतानाबाद ०४, टाकळी कदिम ४६, तळपिंपरी २५, तांदुळवाडी ०६, टेम्भापुरी ११, तुर्काबाद खराडी २६, वडाळी ४८, वडगाव ६५, वाहेगाव ३१, वजनावर ३०, वाळूज १९८, वरखेड १००, वरझडी ३०, वसुसायगाव २०, येसगाव ३३, झोडेगाव २६.

**खुलताबाद तालुका :** भडजी ४४, बोडखा ३८, चिंचोली ३८, दरेगाव ३५, देवळाना बुद्रुक ३३, धामणगाव १९, गदाना १८, गल्लेबोरगाव २९, घोडेगाव १८, गोळेगाव ३३, कागजीपुरा ०१, कानडगाव ०८, कनकशीळ १५, खांडीपिंपळगाव २२, खिर्डी २१, कसाबखेडा ७३, लोणी ४८, मावसाळा १८, म्हैसमाळ ४१, निरगुडी बुद्रुक ३५, पाडळी ३६, पळसगाव ५१, पळसवाडी १२, पिंपरी ०९, रसूलपुरा ११ सराई ०२, बाजार सावंगी ३६, चुलीभंजन ७१, सोनखेडा २६, सुलतानपूर ३६, ताजनापूर २०, टाकळी १६, तिसगाव २०, तिसगावतांडा०६ वेरूळ ५५, विरमगाव ०६, वडोद बुद्रुक ३५, येसगाव ३१, झरी २०.

दरम्यान आगामी काळात नोंदणीकृत बांधकाम कामगारांना मोठ्या प्रमाणात घरकुले देण्यात येणार असल्याचेही आमदार प्रशांत बंब यांनी सांगितले.

# कैं.वसंतराव कुलकर्णी स्मृती पुरस्कार प्रदान

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि ९ सप्टेंबर पैठण तालुक्यातील बिडकीन येथील सृजन शैक्षणिक प्रतिष्ठान संचलित सृजन प्राथमिक व माध्यमिक विद्यालय ,बिडकीन येथे कै. वसंतराव कुलकर्णी स्मृती पुरस्कार व भा.बा.आर्विकर पुरस्कार उपक्रमशील शिक्षकास प्रदान करण्यात आले .कै. वसंतराव रमाकांत कुलकर्णी यांच्या स्मरणार्थ त्यांच्या कुटुंबीयांनी हा पुरस्कार बिडकीन परिसरातील उपक्रमशील शिक्षकास देण्याचा संकल्प केला असून तसेच श्री. भास्कर आर्वीकर यांनी श्री. स.भु.शिक्षण संस्थेमधील



एका उपक्रमशील शिक्षकास भा.बा आर्वीकर पुरस्कार यावर्षीपासून देण्याचा संकल्प केला आहे.

श्री . सरस्वती भुवन शिक्षण संस्थेचे सरचिटणीस डॉ . श्रीरंग देशपांडे यांच्या हस्ते या पुरस्कारांचे वितरण झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. हिरू गुरसहानी हे होते. डॉ. श्रीरंग देशपांडे सरचिटणीस स. भु. शिक्षण संस्था यांच्या हस्ते कै. वसंतराव रमाकांत कुलकर्णी पुरस्कार संगीता भन्साळी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चिंचोली व भा. बा. आर्वीकर पुरस्कार सुजाता तोष्णीवाल यांना प्रशस्तीपत्र,गौरव चिन्ह, शाल व पुष्पगुच्छ देऊन या पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले .याप्रसंगी भास्करराव आर्वीकर , विवेक कुलकर्णी , किसनलाल तोतला डॉ. अंतारम धरपळे ,बद्रीनाथ नरवडे , जिल्हा परिषद शाळेचे केंद्र प्रमुख तभा मुख्याध्यापक उमेश सोनवणे,सय्यद इनुस ,राजेंद्र कुलकर्णी ,नंदकुमार वैद्य, महेश कुलकर्णी, विजय कुलकर्णी राजू वैद्य , सुनील धुत ,मुख्याध्यापक धर्मेंद्र येवले, उपमुख्याध्यापक युवराज पाडळे,राजू शिंदे ,रायभान ठाणगे, ज्ञानेश्वर चाटूपळे या मान्यवरांची उपस्थिती होती कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुख्याध्यापक रवींद्र ठाणगे आभार राजेंद्र कुलकर्णी यांनी केले कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक वृंदांनी परिश्रम घेतले.

# सत्तेत येऊन समाजाला न्याय देण्याचे काम अजित पवारांनी केले : इद्रिस नायकवडी

तभा वृत्तसेवा

कन्नड दि.०९ सप्टेंबर -भाजप, शिवसेना महायुतीबरोबर सत्तेत गेलेले राष्ट्रवादीचे नेते तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शाहू, फुले, आंबेडकर विचारांचा वारसा सोडलेला नाही. मोर्चे, आंदोलनातून समाजाला न्याय मिळत नाही, सत्तेत येऊन समाजाला न्याय देण्याचे काम त्यांनी केले. तर मुस्लिम समाजाला हक्क मिळवून देण्याचे काम ते सातत्याने करत असल्याचे प्रतिपादन राष्ट्रवादी अल्पसंख्यांक विभागाचे राज्य प्रमुख इद्रिस नायकवडी यांनी केले.

शहरातील जी.एन हॉल येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा वतीने अल्पसंख्यांक प्रदेश अध्यक्ष इद्रिस नायकवडी यांच्या उपस्थित मेळाव्याचे आयोजन केले होते. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस नेते संतोष कोल्हे, जिल्हाध्यक्ष मोसिन पटेल,कार्याध्यक्ष मोबिन सिद्दीकी,तालुका अध्यक्ष प्रकाश




गाडेकर,शहर अध्यक्ष अहेमद अली यांनी मनोगत व्यक्त केले. अल्पसंख्यांक तालुका अध्यक्ष नवाब सेठ यांनी प्रास्ताविक केले

या मेळाव्यात मार्गदर्शन करताना नायकवडी म्हणाले की, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मुस्लिम समाजाला संरक्षण व शैक्षणिक सुविधा देण्याचे काम केले. तर युवकांना प्रवाहात आणण्यासाठी मौलाना आझाद विकास महामंडळासाठी ३० कोटीची असलेली तरतुद कोटी रुपये पर्यंत करुन एकप्रकारे न्याय दिला. उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलांसाठी मौलाना आझाद शैक्षणिक शिष्यवृत्तीत मोठ्या प्रमाणात वाढ केली. राष्ट्रवादीच्या उमेदवारांना पुन्हा विधानसभेत पाठविल्यास त्यांना बळ मिळणार आहे. तसेच सर्व प्रश्न देखील मार्गी लागणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

राज्यात कोठेही मुस्लिम समाजावर अन्याय अत्याचार होत असल्यास ते धावून जाऊन त्यांना संरक्षण व न्याय देण्याचे काम करत असल्याचे सांगत त्यांनी मुस्लिम समाजाच्या संरक्षणासाठी केलेल्या कार्याची माहिती दिली. तर ज्या महाविकास आघाडीच्या नेत्यांनी भरभरून मते घेतली, ते मात्र समाजाची परतफेड करु शकले नसल्याचा आरोप त्यांनी केला. यावेळी तालुका कार्याध्यक्ष मुकेश वेताळ,माजी नगरसेवक असलम पटेल,जावेद पटेल, आबेद अली,माजी नगरसेवक युवराज बनकर, रवींद्र राठोड,बंटी काशिनंद,संतोष निकम, अनिल गायकवाड, अथर भाईजी, दिपक ताठे, अक्कू पवार, उद्धव पवार, राहुल वाघ,तालुका उपाध्यक्ष योगेश घुले, संजय सोन्ने, सोयगाव तालुका उपाध्यक्ष दिनेश राठोड, खातखेडा शाखा अध्यक्ष किरण पवार, शाखा उपाध्यक्ष रोहित नेवरे, हनुमान नगर शाखा अध्यक्ष अरुण निकम, मुसा भाई, मंगेश सोनवणे, दिपक पवार, आकाश अधीक, प्रकाश भाऊ पातळे, सागर शिंदे आदीं सह हजारो अल्पसंख्यांक कार्यकर्ते उपस्थित होते.सूत्रसंचालन मुकेश वेताळ यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार शरीफ भाई यांनी केले.

# सिल्लोड व सोयगाव तालुक्यात ग्रामपंचायत स्तरावर नेमण्यात येणारे योजनादुत निवडप्रक्रीयेत सावळा गोंधळ-ज्ञानेश्वर मोठे

सिल्लोड : सिल्लोड व सोयगाव दोन्ही तालुक्यातील महाराष्ट्र शासनाने कौशल्या विकास व नाविन्यता विभागाच्या शासन निर्णयानुसार प्रत्येक ग्रामपंचायतीला एक योजनादुत या प्रमाणे नेमणुक दिली जाणार आहे.सिल्लोड -सोयगाव तालुक्यामध्ये अनेक ग्रामपंचायतींनी मुद्दाम व हेतुपुरस्कृत या योजनेचा प्रचार प्रसार केला नाही. त्यामुळे बर्यांच ग्रामपंचायतीमधुन पदवीधर तरुणांचे ऑनलाईन अर्ज आलेले नाही. त्यामुळे आता ऑफलाईन अर्ज घेउन आता जवळच्या कींवा वशिल्याच्या कार्यकर्त्यांकडुन ऑफलाईन अर्ज मागविणे चालु आहे.

जर एखाद्या ग्रामपंचायतीमधुन ऑनलाईन अर्ज प्राप्त झाले नसेल .तर त्यांना परत ऑनलाईन अर्ज करण्याची संधी दिली पाहिजे .परंतु सिल्लोड -सोयगाव तालुक्यातील योजनादुत योजनेतील संबधित अधिकारी दबावाखाली काम करून हा गैरप्रकार करण्याचे काम चालु असल्याच्या अनेक तक्रारी आमच्याकडे प्राप्त झाल्या आहे.



काहीही असले तरी संबधित विभागाने निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार व त्यामध्ये नमुद कार्य पद्धती नुसार या योजनादुतांची नियुक्ती देणे आवश्यक आहे तसे न झाल्यास किंवा जवळचा कार्यकर्ता वशिलाबाजी योजनादुत नेमल्यास पात्र सुशिक्षित तरुणावर अन्याय होणार आहे. ही अत्यंत गंभीर बाब असुन कोणताही गैरप्रकार होणार नाही याची दक्षता घ्यावी अशाप्रकारे लेखी निवेदन गट विकास अधिकारी यांच्याकडे भारतीय जनता पार्टी सिल्लोड -सोयगाव च्या वतीने देण्यात आले. या निवेदनावर मा आमदार सांडु पा लोखंडे,भाजपा प्रदेश चिटणीस सिल्लोड सोयगाव विधानसभा निवडणुक प्रमुख सुरेश बनकर , भाजपा अल्पसंख्याक प्रदेशाध्यक्ष इद्रिस मुलतानी,भाजपा जिल्हा सरचिटणीस तथा सिद्धेश्वर सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन ज्ञानेश्वर मोठे भाजपा तालुकाध्यक्ष अशोक गरुड, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष सुनिल मिरकर आदिंच्या सह्या आहेत.

# राजू शिंदेंकडे पश्चिम विधानसभाप्रमुखपद; उमेदवारी मिळण्यावर एकप्रकारे शिक्कामोर्तब

त. भा. प्रतिनिधी, दि. ९

वाळूज महानगर : दोन महिन्यांपूर्वी भाजपमधून शिवसेनेच्या ठाकरे गटात आलेल्या राजू शिंदे यांचे पक्षातील वजन वाढविण्यात येत आहे. विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्याकडे विनंती करून शिंदेंना आता पक्षात सक्रीय केले आहे. पश्चिम मतदारसंघातून ते विधानसभा निवडणूक लढण्यास इच्छुक आहेत. त्यामुळे आतापासून तयारी करण्याच्या अनुषंगाने त्यांच्याकडे पश्चिम विधानसभा प्रमुखपदाची जबाबदारी देण्यात आली आहे. त्यामुळे एकप्रकारे त्यांच्या संभाव्य उमेदवारीवर शिक्कामोर्तबच झाले आहे.



पश्चिम मतदारसंघातून निवडणूक लढण्यासाठी माजी खासदार चंद्रकांत खैरेही इच्छुक आहेत. तालुकाप्रमुख बाळासाहेब गायकवाड यांनीही निवडणूक लढण्याची तयारी केलेली आहे. मात्र अंबादास दानवे यांच्या मनात वेगळेच असल्याचे दोन महिन्यांपूर्वी दिसून आले. राजू शिंदे यांना भाजपातून ठाकरे गटात आणण्यात दानवे यांचाच मोठा वाटा असल्याची चर्चा आहे. आता पक्षात आतापर्यंत नसलेले पद तयार करून राजू शिंदेंकडे पक्षाची संघटनात्मक जबाबदारीही सोपवली आहे.

विधानसभा प्रमुख असे पद ठाकरे गटात नव्हते. विजय वाघचौरे हे शहरप्रमुख तर बाळासाहेब गायकवाड तालुकाप्रमुख ते ही पश्चिम मतदारसंघातून निवडणूक लढवण्यास इच्छुक असून पश्चिम विधानसभा मतदारसंघात त्यांनी कामही करण्याची सुरुवात केली आहे. नविन प्रवेश घेतलेल्या कार्यकर्त्यांना महत्व दिले जात असून, निष्ठावंत शिवसैनिक डावलल्या जात असल्याने निष्ठावंतांतून नाराजीचा सूर उमटत आहे. राजू शिंदे यांना संपर्क साधला असता त्यांनी नंतर बोलतो असे म्हणत बोलणे टाळले.

# यश शहा यांची नियुक्ती

अहमदनगर : महाराष्ट्र शासनाच्या भगवान महावीर स्वामी निर्वाण कल्याण महोत्सव जिल्हा समितीच्या अशासकीय सदस्यपदी येथील इंजि. यश प्रमोद शहा यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ना. मंगलप्रभात लोढा यांच्या सूचनेनुसार ही नियुक्ती करण्यात आली आहे. २४ वे जैन तीर्थंकर भगवान महावीर स्वामींच्या २५५० व्या महानिर्वाण कल्याण महोत्सवानिमित्त ना. मंगलप्रभात लोढा यांच्या अध्यक्षतेखाली संपूर्ण राज्यात जिल्हास्तरीय समित्या गठीत करण्यात आले आहे. त्यानुसार पार्श्वनाथ कन्स्ट्रक्शन व इंटेरियरचे संचालक इंजि. यश शहा यांची अहमदनगर जिल्ह्यासाठी नियुक्ती करण्यात आली आहे. इंजि. यश शहा हे जैन समाजाच्या विविध संघटनांवर पदाधिकारी म्हणून सक्रियपणे कार्यरत आहेत. त्यांच्या या नियुक्तीबद्दल जैन साधू - साध्वी तसेच ललित गांधी, संदीप भंडारी, राजेंद्र शहा, पलक शहा तसेच समाज बांधवांनी अभिनंदन केले आहे.



## किसना डायमंड अँड गोल्ड ज्वेलरीने ३५ वे शोरुम सुरु

पुणे - किसना डायमंड अँड गोल्ड ज्वेलरी, भारतीय दागिने उद्योगातील एक अग्रगण्य नाव, पुण्यात त्यांचे पहिले खास शोरूम, महाराष्ट्रातील दुसरे आणि भारतातील ३५ वे शोरूम सुरू करते. श्री घनश्याम ढोलकिया, संस्थापक आणि एमडी, हरी कृष्ण ग्रुप आणि श्री पराग शाह, संचालक, किसना डायमंड अँड गोल्ड ज्वेलरी यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. हे भव्य उद्घाटन साजरे करण्यासाठी, किसना आपल्या आदरणीय ग्राहकांसाठी हिऱ्यांचे दागिने बनवण्याच्या शुल्कावर १००टक्के आणि सोन्याचे दागिने बनवण्याच्या शुल्कावर २०टक्के पर्यंत सूट देत आहे. याव्यतिरिक्त, किसना सप्टेंबर महिन्यासाठी अबकीबारआपकेलियेशॉप आणि कार जिंकण्यासाठी लकी ड्रॉ स्पर्धा देखील चालवत आहे. २०,००० किंवा त्याहून अधिक किमतीची डायमंड/प्लॅटिनम/सॉलिटेअर ज्वेलरी खरेदी करून किंवा ५०,००० ची सोन्याचे दागिने खरेदी करून ग्राहक सहभागी होऊ शकतात. किसना तर्फे भाग्यवान विजेत्यांची निवड केली जाईल आणि त्यांना कार भेट दिली जाईल. लॉन्च बद्दल भाष्य करताना, श्री घनश्याम ढोलकिया, संस्थापक आणि एमडी, हरी कृष्ण ग्रुप, म्हणाले, पुणे आमच्यासाठी एक महत्त्वपूर्ण बाजारपेठ आहे आणि येथे आमचे पहिले खास शोरूम उघडणे आणि महाराष्ट्र राज्यातील दुसरे शोरूम हे आमच्यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. ही वाढीची रणनीती 'हर घर किसान' या आमच्या व्हिजनशी संरेखित आहे, जिथे आम्ही भारतातील सर्वात वेगाने वाढणारा ज्वेलरी ब्रँड बनण्याचे ध्येय ठेवतो, ज्यामुळे प्रत्येक महिलेचे हिऱ्यांचे दागिने असण्याचे स्वप्न पूर्ण होते.

### अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर

**अहमदनगर शहर येथे माझी वसुंधरा ३.० अभियान राबविणे. - सन २०२३-२४ अंतर्गत**

**फेर ई-निविदा सूचना क्रमांक : ६७ सन २०२४-२५**

**अहमदनगर शहर येथे माझी वसुंधरा ३.० अभियान राबविणे. सन २०२३-२४** अंतर्गत ०१ कामाची ई-निविदा सुचना क्र. ६७ सन **२०२४-२५** ई-टेंडर पध्दतीने ऑनलाईन मागविणेसाठी शासनाच्या http://mahatenders.gov.in या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. तरी याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

(मा. आयुक्त, यांचे मान्यतेने)

स्वाक्षरी/-
शहर अभियंता
अहमदनगर महानगरपालिका

संचिका क्रं.२०२४/३.वि.अ.वै./एम.ए.जी./ज.म.नोंद/सी.आर /२०२४
दिनांक :- ३०/०८/२०२४.

### जाहीर प्रगटन

अर्जदार :- श्री/श्रीमती फिरोना युसुफ सय्यद आता विवाहीत फिरोजा हारुन पटेल रा. पडेगांव ता.जि. छत्रपती संभाजीनगर.

:-: विरुध्द :-:

गैरअर्जदार :- ग्रामपंचायत कार्यालय पुरी ता गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर.

विषय :- जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ (सुधारीत २०२३) मध्ये कलम ११(२) व ३ प्रमाणे जन्म मृत्यू नोंद बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यानी या कार्यालयास अर्जदार स्वतः नामे यांचा जन्म दिनांक २०/०५/१९८० रोजी मौजे पुरी ता गंगापूर येथे झाला असून ग्रामपंचायत कार्यालय पुरी ता गंगापूर येथील जन्म/मृत्यु रजिष्टरला जन्म नोंदणी करण्यासाठी आदेश होणेस अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी या जाहीर प्रगटना व्दारे कळविण्यात येते की, सदर नोंद बाबत कोणाचा उजर, अक्षेप हरकत असल्यास त्यांनी हे प्रगटन जाहीर झाल्यापासून ३० दिवसाचे आत आपला उजर, अक्षेप हरकत या न्यायालयात लेखी स्वरुपात नोंदवावा मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही व अर्जदाराचे मागणीनूसार सदरची नोंद करण्याबाबत संबंधितांना आदेश दिला जाईल.

आज दिनांक ३०/०८/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

ठिकाण :- वैजापूर.
दिनांक :- ३०/०८/२०२४.

उप विभागीय अधिकारी, वैजापूर.

### जाहिर प्रगटन

**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**

जा.क्र. २०२४/मशाका/जमाबंदी-१/जन्म-मृत्यु नोंद/सिआर-५०० उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड दिनांक २०/०८/२०२४

अर्जदार ०:- अनिल नामदेव राठोड रा. भिलदरी तांडा ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विरूध्द

गैरअर्जदार ०:- ग्रामपंचायत कार्यालय सायगव्हाण ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विषय :- जन्म-मृत्यु अधिनियम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज.

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी अॅड एच. जी. शेख यांच्या मार्फत अर्ज सादर करून अर्जदार यांना न्वांच्या मुलाचे जन्माचे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार यांच्या मुलाचा जन्म दिनांक ०८/०८/२००८ रोजी भिलदरी तांडा ता. कन्नड येथे झालेला आहे.

अर्जदार यांच्या मुलाचा जन्म दिनांक ०८/०८/२००८ रोजी भिलदरी तांडा ता. कन्नड कामासाठी जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

सदर जाहिर प्रगटनाव्दारे तमाम जनतेम सुचीत करण्यात येते की, अर्जदार यांच्या मुलाचा जन्म दिनांक ०८/०८/२००८ रोजी भिलदरी तांडा ता. कन्नड येथे झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत म्हनजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक ०९/१०/२०२४ रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरूपात आपला आक्षेप नादवावा मुदतीन कोणचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदारास दिनांक ०८/०८/२००८ रोजी भिलदरी तांडा ता. कन्नड येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीतनंतर आलेला उजर/आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही.

करिना दिनांक २०./०८/२०२४ रोजी मदर जाहिर प्रगटन माझया महीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड करिता

### जाहिर प्रगटन

**मा.व्ही.डी. पाटील दिवाणी न्यायाधिश साहेब कनिष्ठ स्तर कन्नड यांचे न्यायालयात.**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १६२/२०२४. पुढील तारीख २७/०९/२०२४.

अर्जदार : १. चांदीबाई भ्र. हिरा राठोड, वय ६८ वर्षे, धंदा घरकाम, रा. वडनेर तांडा, ता. कन्नड जि. औरंगाबाद. २. राजू हिरा राठोड, वय ४५ वर्षे, धंदा मजुरी, रा. वडनेर तांडा, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ३. भोजू हिरा राठोड, वय ४० वर्षे, धंदा मजुरी, रा. वडनेर तांडा, ता. कन्नड जि. औरंगाबाद.

विरुद्ध

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन द्वारा जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद.

अर्ज : बॉम्बे रेग्यूलेशन अॅक्ट १८२७ चे कलम २ व ३ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्यांचे वकील अॅड.डी.एन. चव्हाण यांचे मार्फत या न्यायलयात अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्रं. १ ही मयत हिरा बाला राठोड यांची पत्नी असून अर्जदार क्र. २ व ३ हे मुले आहे. अर्जदार क्रं. २ व ३ हे आपसात सख्खे भाऊ असून अर्जदार क्रं. १ ही त्यांची आई आहे. अर्जदार क्र. १ ते ३ हे मयत हिरा बाला राठोड यांचे कायदेशीर वारस आहे. अर्जदार क्र. १ चे पती व अर्जदार क्र. २ व ३ यांचे वडील नामे हिरा बाला राठोड हे दि.०४/०७/२०२० रोजी मौजे वडनेर तांडा, ता. कन्नड येथे आजारपणामुळे मरण पावले आहे. अर्जदार क्रं. १ ते ३ यांना मयत हिरा बाला राठोड यांचे मृत्यू पश्चात तहसिल कार्यालय, ग्रामपंचायत कार्यालय, उपअधिक्षक भूमि अभिलेख कार्यालय, गाव, नगर व शहर भूमापन कार्यालय, तलाठी कार्यालय, गट विकास अधिकारी कार्यालय व इतर शासकिय व निमशासकिय कार्यालय मध्ये आवश्यक ते कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदार क्रं. १ ते ३ हे मयताचे वारस असल्याबाबत कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. मयत हिरा बाला राठोड हे मौजे वडनेर तांडा, ता. कन्नड येथे राहत असतांना आजारपणामुळे मयत झाले आहे. सदरील मयतास अर्जदार क्रं. १ ते ३ हे वारस असून वेळोवेळी वेगवेगळ्या कार्यालयात वारस प्रमाणपत्राची आवश्यकता भासत असल्यामुळे सदरील अर्जास कारण दि.०३/०७/२०२४ रोजी मौजे वडनेर तांडा, ता. कन्नड येथे घडले. अर्जदारांनी यापुर्वी अशा प्रकारचा वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठीचा अर्ज यापुर्वी इतर कोणत्याही न्यायालयात दाखल केलेला नाही अथवा न्याय प्रविष्ठ नाही. त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांनी अर्ज केल्यानुसार वारसा प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्याबाबत ज्या कुणास, कुठल्याही स्वरुपाचा उजर आक्षेप वगैरे असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीस (३०) दिवसांच्या आत आपला उजर, आक्षेप वगैरे मा.न्यायलयात नोंदवावा. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यात येईल. त्यानंतर आलेला उजरआक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही, याची नोंद घ्यावी. दिनांक :-

आदेशविरून

कनिष्ठ लिपीक — सहाय्यक अधिशक

दिवाणी न्यायधीश क. स्तर, कन्नड.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## घरवापसी

कुलदीप सिंह/अनुरोध भारद्वाज

# हिना खानची झाली प्रियांका

## तिहेरी तलाक, हलालाच्या भीतीने केला इस्लामचा त्याग

तिहेरी तलाक, हलाला यांसारख्या बुरसटलेल्या प्रथांना घाबरून उत्तर प्रदेशातील रोहिलखंड भागातील मुस्लिम युवती सातत्याने हिंदू धर्मात प्रवेश करीत आहेत. याच मालिके अंतर्गत पिलीभीतच्या मुस्लिम कुटुंबात जन्मलेल्या हिना बी खान या युवतीने स्वेच्छेने इस्लाम धर्माचा त्याग करून सनातन हिंदू धर्माशी आपले नाते जोडले आहे. हिना आता हिंदू धर्म स्वीकारून प्रियांका बनली आहे आणि तिने बरेलीतील एका आश्रमात वैदिक विधीनुसार आपला प्रियकर प्रेमशंकर गुप्ता यांच्यासमवेत शुभमंगल केले आहे. कट्टरपंथी कुटुंबाकडून मला आणि माझ्या पतीच्या जीवाला धोका असल्याचे सांगत हिना ऊर्फ प्रियांका हिने पोलिसांकडे संरक्षणाची मागणीही केली आहे.

बरेलीत झालेल्या एका कार्यक्रमात सनातनमध्ये मोगल आक्रमकांच्या दहशतीमुळे आमचे पूर्वज इस्लामचे अनुयायी झाले होते. मात्र माझी श्रद्धा सनातन हिंदू धर्मावर असल्याचे मुलीने प्रतिज्ञापत्रात स्पष्टपणे म्हटले आहे. मी अगदी सुरुवातीपासून देवी-देवतांची पूजा, उपासना करीत आले आहे, असेही तिने पत्रात नमूद केले. इस्लाममध्ये महिलांना मानसन्मान, आदर नाही आणि तिहेरी तलाक व हलालासारख्या वाईट प्रथा प्रचलित आहेत. त्यामुळे आपण घरवापसी करण्याचा निर्णय घेतला असून कोणाच्याही दबावाला बळी न पडता स्वतःच्या इच्छेनुसार हिंदू धर्म स्वीकारला आहे, असेही हिना खान ऊर्फ प्रियांका गुप्ताने पत्रात म्हटले आहे.



घरवापसी करणारी हिना बी. खान पिलीभीत जवळील पुरनपूर गावातील मुमताज खान यांची मुलगी आहे. तर तिचा जीवनसाथी बनलेला प्रेमशंकर गुप्ता हा उत्तराखंडमधील उधमसिंह नगर जिल्ह्यातील सितारगंज भागातील सिसोना गावातील अनिल यांचा पुत्र आहे. हिनाची प्रियांका झालेल्या या युवतीने बरेलीचे जिल्हा दंडाधिकारी आणि पोलिस अधीक्षक यांना सविस्तर पत्र पाठवून आपली कहाणी सांगितली. तसेच प्रियकर प्रेमशंकर गुप्ता याच्याशी विवाह करण्याची आपली इच्छा असल्याचे तिने स्पष्टपणे नमूद केले. आपण कायद्यानुसार प्रौढ असून चांगल्या-वाईटाचा विचार करण्यास सक्षम असल्याचे तिने प्रशासनाकडे पाठविलेल्या प्रतिज्ञापत्राद्वारे नमूद केले.

हिंदू धर्म स्वीकारण्याचा माझा हा निर्णय माझ्या कट्टरवादी कुटुंबीयांना आवडलेला नाही. माझ्या माहेरच्या लोकांकडून माझ्या पतीच्या आणि सासरच्या मंडळींच्या जीवाला धोका उत्पन्न झाला आहे. त्यांच्यावर कारवाई न केल्यास ते मला आणि माझ्या पतीला ठार मारू शकतात अथवा त्यांच्यावर खोटे गुन्हे दाखल करू शकतात, असेही हिना खान अर्थात प्रियांका गुप्ता हिने पोलिस अधीक्षक व जिल्हा दंडाधिकाऱ्यांना लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे. स्वतःच्या आणि सासरच्यांच्या सुरक्षेसाठी तिने पोलिस प्रशासनाकडे दाद मागितली आहे.



# प्रियकराच्या प्राप्तीसाठी स्वीकारला हिंदू धर्म

## फिरदौसची झाली दिव्या वैदिक पद्धतीने केला विवाह

सनातन धर्मात घरवापसीचे आणखी एक प्रकरण उत्तर प्रदेशातील सहारनपूर येथून समोर आले आहे. सहारनपूरजवळील एका गावातील मुस्लिम युवती फिरदौसने आपले प्रेम प्राप्त करण्यासाठी अर्थात आपल्या हिंदू प्रियकराच्या प्राप्तीसाठी सनातन हिंदू धर्माचा स्वीकार केला. या युवतीने स्वतःचे नाव देखील बदलून 'दिव्या' असे ठेवले आहे. हिंदू संघटनांच्या नेतृत्वाखाली या 'घरवापसी कार्यक्रमा'चे आयोजन करण्यात आले होते.

### काय आहे संपूर्ण प्रकरण?

सहारनपूर शहरातील देवबंदमधील एका गावातील हे प्रकरण आहे. मुस्लिम युवती आणि हिंदू युवक दोघेही एकाच गावातील रहिवासी आहेत. एकाच गावातील असल्याने दोघेही एकमेकांना लहानपणापासूनच ओळखत होते. त्यामुळे त्यांच्यात मित्रत्वाचे नाते होते. दोघेही तारुण्यात आले. त्यांच्या मैत्रीचे रुपांतर प्रेमात झाले. विशालशी विवाहबद्ध होण्यासाठी फिरदौसला सनातन हिंदू धर्म स्वीकारायचा होता. मात्र, तिच्या कुटुंबीयांचा या लग्नाला विरोध होता.

मात्र, दोघांनाही विवाह करण्याचा निर्णय मनाशी पक्का केला. त्यांनी यासाठी हिंदू संघटनांशी संपर्क साधला आणि त्यांच्या मदतीने दोघेही शहरातील हसनपूर चौकीजवळ असलेल्या शिवमंदिरात गेले. मंदिरात शास्त्रोक्त पूजाविधी होऊन तेथे फिरदौसला सनातन हिंदू धर्माची दीक्षा देण्यात आली. फिरदौसने आपला प्रियकर विशालसोबत मंदिरातच सात फेरे घेत लगीन गाठ बांधली. यासोबत तिने स्वतःचे नाव 'दिव्या' असे ठेवले. पती विशालसोबत आपण सुखी व आनंदी असून आपण स्वेच्छेने हिंदू धर्म स्वीकारला आहे, असे फिरदौसने घरवापसी कार्यक्रमानंतर माध्यमांशी बोलताना सांगितले.

दरम्यान, मुस्लिम तरुणीच्या कुटुंबीयांनी तिने सनातन धर्म स्वीकारल्याच्या विरोधात पोलिसांत तक्रार केली होती. त्यांनी न्यायालयात दाद देखील मागितली, मात्र न्यायालयातील सुनावणीदरम्यान फिरदौसने विशालच्या बाजूने निवेदन दिले आणि त्याच्यासोबतच राहण्याची इच्छा व्यक्त केली. न्यायालयाच्या आदेशानंतरच दोघेही हिंदू रीतिरिवाजांनुसार विवाह करू शकले. दरम्यान, आपल्या तसेच सासरकडील मंडळींच्या जीवाला धोका असल्याची तक्रार दिव्याने सहारनपूर पोलिसांकडे केली असून पोलिस संरक्षणाचे आवाहन केले आहे.

मुस्लिम तरुणीने सनातन हिंदू धर्म स्वीकारल्याच्या विरोधात तिच्या कुटुंबीयांनी पोलिसांत तक्रार दाखल केली होती. त्यांनी न्यायालयातही दाद मागितली, परंतु न्यायालयातील सुनावणीदरम्यान फिरदौसने आपला हिंदू प्रियकर विशालच्या बाजूने निवेदन देत त्याच्यासोबतच राहण्याची इच्छा व्यक्त केली. फिरदौसने 'दिव्या' हे नाव धारण केले असून तिने विशालशी वैदिक पद्धतीने विवाह केला.

# नेपाळमधील २००० लोकांचा सनातनमध्ये प्रवेश



सनातन हिंदू धर्माचे सौंदर्य हे आहे की जो तो हा धर्म जाणून घेण्याचा आणि समजून घेण्याचा प्रयत्न करतो. एकदा या धर्माची तत्त्वे कळल्यानंतर तो त्याचाच एक भाग म्हणून राहतो. अगदी ताजे प्रकरण भारताच्या शेजारील देश नेपाळमधील आहे, जिथे २००० हून अधिक नागरिकांनी एकत्र सनातन हिंदू धर्मात प्रवेश केला आहे.

एका खाजगी टीव्ही वाहिनीने दिलेल्या वृत्तानुसार, नेपाळमध्ये सध्या 'घरवापसी' चे अर्थात परधर्मात गेलेल्यांना पुन्हा स्वगृही हिंदू धर्मात आणण्याचे कार्यक्रम सुरू आहेत. मोठ्या प्रमाणात होणारे हे घरवापसीचे कार्यक्रम पाहून मोठ्या प्रमाणात इतर धर्मातील लोक पुन्हा आपल्या मूळ सनातन धर्मात प्रवेश करीत आहेत. ज्यांनी सनातन धर्म स्वीकारला ते सर्व सुनसरी जिल्ह्यातील नेपागंज गावचे रहिवासी असल्याचे सांगण्यात येत आहेत.

घरवापसी करणाऱ्यांची एकूण संख्या २ हजार असल्याची माहिती आहे. विश्व हिंदू परिषद नेपाळच्या नेतृत्वाखाली हा घरवापसी कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

## आरोग्य

# दुधात मखाना मिसळून खाण्याचे जबरदस्त फायदे

विविध क्षेत्रात कार्यरत असलेली नामवंत मंडळी, सेलिब्रिटीज नेहमीच फिट, कार्यक्षम असतात. त्यांच्यात प्रचंड ऊर्जा असते. त्यांची काम करण्याची क्षमता सर्वसामान्य माणसांपेक्षा कितीतरी अधिक असते. त्यांचे वजन फारसे वाढत नाही. ते का? आणि वाढत असेल तरी ते नियंत्रणात कसे आणतात? नेहमी फिट, तंदुरुस्त, कार्यक्षम राहण्यासाठी, दिसण्यासाठी ते नेमके काय करीत असतील हा प्रश्न नेहमी आपल्याला पडतो. यावर सोपे उत्तर म्हणजे ते नियमितपणे व्यायाम, योगासने करतात. भरपूर पायी चालतात, जॉगिंग करतात, पोहतात. तसेच सायकलिंग करतात. हे खरे आहे की ते दररोज न चुकता व्यायाम करतात. पण त्याचबरोबर त्यांचा आहार देखील अतिशय समतोल असतो. किंबहुना संतुलित आहार हेच त्यांचे तंदुरुस्त राहण्याचे एकमेव औषध असते. त्यांचा आहार पौष्टिक असतो पण अतिवजन वाढू नये असे पदार्थ त्यांच्या आहारात समाविष्ट असतात. त्यातील एक महत्त्वाचा पदार्थ म्हणजे मखाना अर्थात फॉक्स नट. संस्कृतमध्ये याला मखान्न, पद्मबीजाभ, पानीयफल, अंकलोड्य असे संबोधतात.

मखाना हा प्रकार आपण सर्वसामान्य लोकांनी फार कमी वेळा ऐकलेला किंवा पाहिलेला असतो किंवा काहींनी ऐकलेला देखील नसतो. मखाना हा एक पौष्टिक पदार्थ आहे जो स्नॅकचा एक प्रकार आहे. मखाने दिसायला पॉपकॉर्नसारखे व वजनाला अतिशय हलके असतात. मखाना हे एक 'लो कॅलरी' फूड आहे, ज्याने वजन नियंत्रित राहण्यास मदत होते. म्हणूनच विविध क्षेत्रातील सेलिब्रिटी मंडळी आहारात आवर्जून मखानाचा समावेश करतात. दूध आणि मखाना या दोन्हीमध्ये भरपूर पोषक घटक असतात आणि ते अत्यंत फायदेशीर मानले जातात. हे दोन्ही एकत्र खाल्ल्यास आरोग्याला दुप्पट फायदा होतो. चला जाणून घेऊया दुधात मखाना मिसळून खाण्याने होणारे आरोग्याचे फायदे.

मखाना आणि दूध हे दोन्ही कॅल्शियम, प्रथिने



(प्रोटीन) आणि इतर आवश्यक पोषक घटकांचे चांगले स्रोत आहेत. मखानामध्ये मॅग्नेशियम, पोटॅशियम आणि फॉस्फरस असते, जे हाडे मजबूत करण्यास मदत करते. दुधापासून मिळणारे कॅल्शियम आणि प्रथिनेही हाडांच्या आणि दातांच्या आरोग्यासाठी खूप महत्त्वाची असतात.

### वजन नियंत्रित ठेवण्यास उपयुक्त

मखानामध्ये कमी कॅलरीज असतात आणि त्यात भरपूर फायबर असते. हे अधिक काळ 'पोट भरलेले वाटण्यास' मदत करते, ज्यामुळे अधिक खाण्याची इच्छा कमी होते. दुधासोबत मखाना खाल्ल्याने वजन नियंत्रित राहण्यास मदत होते.

### पचनसंस्थेसाठी फायदेशीर

मखानात फायबर भरपूर प्रमाणात असते, जे पचनसंस्थेसाठी खूप फायदेशीर असते. हे बद्धकोष्ठतेची समस्या दूर करण्यास मदत करते आणि पचनसंस्था निरोगी ठेवते. दुधासोबत मखाना खाल्ल्याने पचनसंस्थेच्या समस्यांपासून आराम मिळतो.

### हृदयाचे आरोग्य सुधारते

मखानात सोडियमचे प्रमाण कमी आणि पोटॅशियमचे प्रमाण अधिक असल्याने रक्तदाब नियंत्रित ठेवण्यास मदत करते. हे हृदयाच्या आरोग्य अबाधित राखण्यासाठी चांगले आहे. दुधात असलेल्या कॅल्शियम आणि पोटॅशियममुळे देखील हृदयाचे आरोग्य सुधारण्यास मदत होते.

### ऊर्जेचा स्रोत

दूध आणि मखाना दोन्हीही ऊर्जेचा चांगला स्रोत आहे. यामुळे दिवसभराचा थकवा दूर होण्यास मदत होते तसेच यामुळे शरीर ताजेतवाने राहते. सकाळच्या न्याहारीत दूध आणि मखाना खाल्ल्याने संपूर्ण दिवसभर ऊर्जा मिळते.

### मधुमेही रुग्णांसाठी फायदेशीर

मखानामध्ये ग्लायसेमिक इंडेक्स कमी असतो, ज्यामुळे रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करण्यास मदत होते. दुधात आढळणारी प्रथिने आणि चरबी देखील रक्तातील साखर स्थिर ठेवण्यास मदत करतात.

### त्वचा आणि केसांसाठी फायदेशीर

दूध आणि मखाना हे दोन्ही त्वचा व केसांसाठी खूप फायदेशीर आहेत. मखान्यात असलेले अँटिऑक्सिडंट्स आणि दुधात असलेले व्हिटॅमिन त्वचेला चमकदार आणि केस मजबूत करतात. मखानामध्ये भरपूर पोषक तत्त्वे असतात आणि ते मॅंगनीज, पोटॅशियम, मॅग्नेशियम, थायामिन, प्रथिने आणि फॉस्फरसचे अत्यंत शक्तिशाली स्रोत आहेत. भाजलेले मखाणे हा चहाच्या वेळेचा उत्कृष्ट नाश्ता आणि मुलांसाठी एक उत्तम टिफिन पर्याय आहे. भारतात, लोक मखान्याचा वापर करून खीर, करी, लोणचे आणि कटलेट यासारखे पदार्थ बनवतात.

(पांचजन्यवरून साभार)

## जीवनशैली

महकसिंह

# सकाळी चहाऐवजी प्या 'तुळशीचे पाणी'

## जाणून घ्या त्याचे ७ महत्त्वाचे फायदे

झोपेतून उठल्याबरोबर सकाळचा चहा पिणे हा बहुतांश भारतीयांचा एक अतिशय आवडता 'कार्यक्रम' असतो. नव्हे, चहा प्यायल्याशिवाय भारतीयांचा दिवसच सुरू होत नाही. सकाळी उठल्याबरोबर चहा पिणे ही एक सामान्य सवय. परंतु चहाऐवजी तुळशीचे पाणी प्यायल्याने तुमचे आरोग्य मोठ्या प्रमाणात सुधारून अनेक आश्चर्यकारक फायदे मिळू शकतात, हे तुम्हाला माहीत आहे काय? तुळशीला आयुर्वेदात अतिशय महत्त्वाचे स्थान देण्यात आले आहे आणि तुळस हे औषधी गुणधर्मांचे भांडार मानले जाते. तेव्हा सकाळी-सकाळी तुळशीचे पाणी प्यायल्याने कोणते फायदे होतात, हे जाणून घेऊया .

### बळकट प्रतिकारशक्ती

तुळशीमध्ये अँटीऑक्सीडेंट्स आणि अँटी-बॅक्टेरियल गुणधर्म असतात ज्यामुळे तुमच्या शरीराची इम्यूनिटी अर्थात रोगप्रतिकारशक्ती वाढते. रोज सकाळी तुळशीचे पाणी प्यायल्याने शरीराची रोगप्रतिकारक शक्ती मोठ्या प्रमाणात वाढते, ज्यामुळे तुम्ही अनेक आजारांपासून दूर राहू शकता.

### चांगले पचन

तुळशीचे पाणी पचनसंस्था निरोगी ठेवण्यास मदत करते. याच्या नियमित सेवनाने गॅस, अपचन आणि ॲसिडिटी सारख्या समस्यांपासून आराम मिळतो. हे तुमचे मेटाबॉलिझम (चयापचय) देखील वाढवते, ज्यामुळे तुमची पचनसंस्था अधिक चांगल्याप्रकारे काम करते.

### वजन कमी करण्यास उपयुक्त

तुळशीचे पाणी चयापचय गतिमान करते, ज्यामुळे कॅलरी बर्न करण्याची प्रक्रिया गतीने होते. हे वजन कमी करण्यास मदत करते आणि तुम्हाला तंदुरुस्त आणि निरोगी बनवते.



> तुळशीला आयुर्वेदात अतिशय महत्त्वाचे स्थान देण्यात आले आहे. तुळस आणि भारतीय माणूस यांचे फार प्राचीन काळापासून नाते आहे. अंगणातील तुळशीचे रोपटे, तुळशी वृंदावन म्हणजे जणू आरोग्य व संस्कृतीचे प्रतीकच आहे. तुळस हे औषधी गुणधर्मांचे भांडार मानले जाते.

### त्वचेसाठी फायदेशीर

तुळशीतील अँटिऑक्सिडंट्स त्वचेला तरुण आणि चमकदार ठेवण्यास मदत करतात. सकाळी तुळशीचे पाणी प्यायल्याने तुमच्या त्वचेला नैसर्गिक चमक (नॅचरल ग्लो) येते आणि ती डिटॉक्सिफाय देखील होते.

### मानसिक आरोग्य चांगले राहते

तुळशीचे पाणी मानसिक तणाव आणि चिंता कमी करण्यास मदत करते. यामुळे मानसिक शांती मिळते आणि मूड सुधारण्यासही मदत करते. जर तुम्ही सकाळी तुळशीचे पाणी प्यायले तर तुम्हाला दिवसभरातील तणावपूर्ण कामांमध्ये संतुलन साधण्यास मदत होईल.

### साखरेची पातळी नियंत्रित ठेवते

तुळशीचे पाणी रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित ठेवण्यासही मदत करते. हे इन्सुलिनची प्रक्रिया सुधारते, ज्यामुळे मधुमेहासारख्या समस्यांचा धोका कमी होतो.

### शरीर डिटॉक्स करते

तुळशीचे पाणी डिटॉक्सिफाय करते, म्हणजेच ते शरीरातील विषारी पदार्थ बाहेर काढून टाकते. हे यकृत आणि मूत्रपिंड निरोगी ठेवते आणि शरीर आतून स्वच्छ करते.

### तुळशीचे पाणी कसे तयार करायचे?

तुळशीचे पाणी तयार करणे बनवणे खूप सोपे आहे. रात्री एक ग्लास पाण्यात ५-६ तुळशीची पाने टाका आणि झाकून ठेवा. सकाळी उठल्याबरोबर ते पाणी गाळून प्या.

(पांचजन्यवरून साभार)

## मंथन

# रामायणकालीन किष्किंधा नगरी



किष्किंधा हे रामायणकालीन प्राचीन नगर आहे. हे दंडकारण्यातील पंपा सरोवराच्या ईशान्येस तीन किमी. वर असून येथे वानरराज वाली व सुग्रीव यांची राजधानी होती. कर्नाटक राज्यातील तुंगभद्रा नदीकाठच्या हंपीजवळचे आधुनिक अनेगुंदी गाव म्हणजेच प्राचीन काळची किष्किंधा नगरी होय असे म्हणतात. अनेगुंदीपासून थोड्या अंतरावर आग्नेय दिशेने तुंगभद्रेच्या काठी वालीप्रासाद व सप्ततालवेधस्थान दाखविले जाते. या स्थळापलीकडील गुंफेमध्ये रामाने वालीवधानंतर विश्रांती घेतली होती. नदीच्या पलीकडील तीरावर वालीवधाचे स्थान असून, तेथील श्वेतशिला वालीच्या अस्थी म्हणून दाखवितात, तर त्याजवळच्या पर्वत शिखरांना तारा, अंगद व सुग्रीव यांच्या नावांनी संबोधतात.

### अभिषेकनाटकम् : रामायणकथेवर आधारित भासाचे नाटक

अभिषेकनाटकम् हे भासाचे रामायणकथेवर आधारित सहा अंकी नाटक आहे. रामायणातील किष्किंधा कांडापासून युद्ध कांडापर्यंतची म्हणजेच वालीवध ते रामराज्याभिषेक अशी रामकथा यात येते. सुग्रीव, बिभीषण आणि श्रीराम या तिघांचा राज्याभिषेक या कथानकात आला आहे, त्यामुळे नाटकाचे अभिषेक हे शीर्षक समर्पक ठरते. भासाने रामायण कथेवर इतरही अनेक नाटके लिहिली असून त्याच्या या नाटकांच्या शृंखलेमधून संपूर्ण रामायणाची कथा नाट्यरूपाने मांडण्याचा त्याने प्रयत्न केला आहे. भासाच्याच प्रतिमा या नाटकाचा अभिषेकनाटकम् हा पूर्वार्ध असावा असे एक मत व्यक्त करण्यात येते. मर्यादापुरुषोत्तम रामाकडून केला गेलेला वालीचा वध न्याय्य होता असे दाखवण्याचा प्रयत्न नाटककाराने या नाटकाद्वारे केला आहे. पारंपरिक रामायणकथेमध्ये ज्या पद्धतीचे पात्रवर्णन आढळते तेच काही अंशाने या नाटकातही आढळते.लक्ष्मणाची व्यक्तिरेखा एका आज्ञाकारी सेवक तसेच रामाच्या विनीत भक्ताच्या स्वरूपात रंगविली आहे. तर बिभीषण हा रामाचा न्यायप्रिय भगवद् भक्त असल्याचे दाखवले आहे. भासाने रावणाचे चित्रण क्रूर, दुराचारी असे केले आहे. या नाटकातील प्रधान रस वीररस आहे.

पहिल्या अंकात वानरराज वालीचा रामाच्या हातून वध होऊन सुग्रीवाला राज्याभिषेक करणे हा प्रसंग येतो. दुसऱ्या अंकात सुग्रीव सीतेच्या शोधार्थ सर्व दिशांना आपले दूत पाठवतो व त्यामुळे हनुमानाला जटायूकडून सीतेचे रावणाने हरण केल्याचे समजते. हनुमान लंकेला जातो व तिथे अशोकवाटिकेत त्याला सीता भेटते. तिसऱ्या अंकात हनुमान अशोकवाटिकेचा विध्वंस करतो. त्याला पकडण्यासाठी रावण आपली सेना पाठवतो. हनुमान ती नष्ट करतो. मग रावण आपला मुलगा अक्षयकुमार याला पाठवतो. हनुमान त्याला मारतो. रावण आपला मोठा मुलगा मेघनाद याला पाठवतो. मेघनाद हनुमानाला पकडून रावणासमोर हजर करतो. तेव्हा हनुमान त्याला रामाचा संदेश सांगतो. तो ऐकून रावण चिडतो. त्याला शांत करण्यासाठी बिभीषणाला बोलावले जाते. बिभीषण रावणाला सल्ला देतो की त्याने रामाला सीता परत करावी. त्यावर रावण तो पक्षपाती असल्याचा आरोप करतो. चौथ्या अंकात हनुमान परत आल्यावर सुग्रीव सैन्याची रचना करतो.

सैन्य समुद्रतटावर पोहोचते. रामाला घाबरून समुद्र वानरसेनेला मार्ग मोकळा देतो. बिभीषण रामाचा आश्रय घेतो. शुकसारक नावाचे दोन राक्षस वानररूप घेऊन रामाच्या सैन्यात दाखल होतात; परंतु ते पकडले जातात. उदार मनाचा राम त्यांना दंड न करता सोडून देतो आणि त्यांच्याकरवी रावणाला युद्धाचा संदेश पाठवतो. पाचव्या अंकात राम-रावणाच्या सेनेचे युद्ध वर्णिले आहे. कुंभकर्ण आणि इंद्रजित मारले गेल्यावर रावण खडबडून जागा होतो. भीतीच्या व शंकेच्या भरात तो सीतेचाच वध करण्याचे पाऊल उचलतो; परंतु त्याचे मंत्री त्याला स्त्रीवध करण्यापासून अडवतात. मग तो एक चाल खेळतो. रामाच्या व लक्ष्मणाच्या मस्तकाची प्रतिकृती करून ती तो सीतेला दाखवतो व राम आपल्याकडून मारला गेला असल्याचे भासवतो. 'आता तू माझा स्वीकार कर', असे तिला सांगतो; परंतु सीता आपल्या निश्चयावर अचल राहते. शेवटी सहाव्या अंकात राम-रावण युद्ध होते. रावण मारला जातो.जनमानसात रुळलेली रामकथा भासाने या नाटकात साकारली आहे. नाटकातील संवाद लहान आणि प्रभावी आहेत.

## अग्रलेख...

# शरद पवार खरंच पुरोगामी आहेत?

शरद पवार हे महाराष्ट्राच्या राजकारणात सक्रिय असलेले सर्वात ज्येष्ठ नेते आहेत. वयाच्या नवव्या दशकातील त्यांचा प्रवास सुरू आहे. चाटुकार त्यांना 'जाणते' म्हणूनही संबोधतात. पण, वयाच्या नवव्या दशकात असणारे शरद पवार हे अलिकडच्या काळात ज्या प्रकारची वक्तव्ये करीत आहेत, ते पाहता ते किती 'जाणते' आहेत, हे सहज लक्षात येते. सत्ता गेल्यापासून ते बावचळल्यासारखे वागताना दिसत आहेत. जातिपातीवरून समाजात फूट पाडण्याचे त्यांचे छुपे आणि उघड प्रयत्न कुणापासूनही लपून राहिलेले नाहीत. विशेषत: ब्राह्मण समाजाबाबत त्यांच्या मनात असलेला आकस वेळोवेळी प्रदर्शित झाल्याचे पुरोगामी म्हणविल्या जाणाऱ्या महाराष्ट्राने पाहिला आहे. देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री वा उपमुख्यमंत्रिपदी बसलेले त्यांना पाहवत नाही, हे एकदा नव्हे, अनेकदा स्पष्ट झाले आहे. देवेंद्र फडणवीसांची जात पाहूनच पवार त्यांना लक्ष्य करतात आणि तरीही स्वत:ला पुरोगामी असल्याचे भासवितात, हा दुतोंडीपणा राज्यातील जनतेने ओळखला आहे. फडणवीस हे जन्माने जरी ब्राह्मण असले, तरी त्यांनी सत्तेत असताना बहुजनांसाठी जी कामे केली आहेत, ती प्रशंसनीय आहेत. मराठा समाजाला टिकणारे आरक्षण देण्यासाठी सर्वप्रथम प्रामाणिक प्रयत्न केलेत, ते फडणवीस यांनीच. ओबीसींच्या समस्या सोडविण्यासाठी झटले ते फडणवीसच. फडणवीस सत्तेत आले की पवारांना आणि त्यांच्या साथीदारांना पेशवाई आठवते. कारण स्पष्ट आहे, पेशवाईचा मुद्दा उकरून काढत मराठा समाजातील लोकांना फडणवीसांविरुद्ध चिथावणी द्यायची आणि फडणवीस ज्या भाजपाचे आहेत, त्या भाजपाला फटाके लावायचे, पर्यायाने फडणवीसांना राजकीयदृष्ट्या जेरीस आणायचे, हा पवारांचा त्यामागचा हेतू लपून राहिलेला नाही. याउलट फडणवीसांचे आहे. ते कधीच जातीवरून कुणाला लक्ष्य करीत नाहीत. पवार मुख्यमंत्री असतानाच त्यांनी मराठा समाजाला आरक्षण द्यायला पाहिजे होते. पण, त्यांनी त्याबाबत कधीच विचार केला नाही. उलट, शरद पवार हे जेव्हा मुख्यमंत्री होते, तेव्हा ते असे म्हणाले होते की, मराठा समाजाला आरक्षण देणे कायद्याने शक्य नाही. पश्चिम महाराष्ट्रातील एका आघाडीच्या मराठी वर्तमानपत्राने त्याबाबत पहिल्या पानावर ठळकपणे बातमी छापली होती. त्या बातमीचे कात्रण आजही सगळीकडे फिरते आहे. जे कायद्याला मान्य नाही, ते फडणवीसांकडून अपेक्षित करताना शरद पवार कोणती खेळी खेळू पाहताहेत, हे न ओळखता येण्याइतकी जनताही आता खुळी राहिलेली नाही. मनोज जरांगे यांचा बोलविता धनी कोण आहे, हेही एव्हाना स्पष्ट झाले आहे.

एकीकडे स्वत:ला पुरोगामी म्हणायचे आणि दुसरीकडे जातीयवादी राजकारण करायचे हा पवारांचा दुटप्पीपणाच होय. गतकाळात घडलेल्या एका गोष्टीचे स्मरण होताच पवारांचे जातीयवादी राजकारण डोळ्यांपुढे येते. २०२३ च्या जुलै महिन्यात समृद्धी महामार्गावर खाजगी बसला अपघात झाला होता आणि त्यात २५ प्रवाशांचा होरपळून मृत्यू झाला होता. त्या घटनेवर प्रतिक्रिया देतानाही पवारांनी फडणवीसांना मध्ये आणलेच होते. समृद्धीवर झालेल्या अपघातात जो मृत्युमुखी पडतो, तो 'देवेंद्रवासी' होतो, असे लोक म्हणतात, हे वाक्य पवारांनी बोलण्याची काही आवश्यकताच नव्हती. पण, राज्यात कुठेही काही खुट्ट वाजले की फडणवीसांवर टीका करायची, ही पवारांना आता सवयच जडली आहे. राज्याच्या राजकारणात आपल्यापेक्षा कुणी मोठा होतो आहे, यशस्वी होतो आहे, आपले सगळे डावपेच आपल्यावरच उलटवतो आहे, हे शरद पवारांना सहन होऊच शकत नाही. होणारही नाही. महाराष्ट्राच्या राजकारणात कुणी चाणक्य निर्माण झालेला पवारांना आवडत नाही. त्यात देवेंद्र फडणवीस हे तर पवारांच्या अर्ध्या वयाचे नेते. शिवाय ब्राह्मण. अशा परिस्थितीत पवार फडणवीसांचे अस्तित्व आणि कर्तृत्व मान्य करतील, याचा विचार कुणी स्वप्नातही करू नये. समृद्धी महामार्गावर अपघात झाल्यानंतर त्यात मरण पावलेल्यांच्या कुटुंबीयांप्रती संवेदना व्यक्त करणे स्वाभाविक होते. पण, संवेदना व्यक्त करताना फडणवीसांचा उल्लेख करण्याची काहीच आवश्यकता नव्हती. पवार प्रत्येक वेळी जाणूनबुजून फडणवीसांवर टीका करतात. भाजपाला सांप्रदायिक ठरविण्याचा प्रयत्न करतात, हे महाराष्ट्राने नेहमीच अनुभवले आहे. आता विधानसभेच्या निवडणुका महाराष्ट्रात होणार आहेत. त्यासाठी सर्वच राजकीय पक्ष कामाला लागले आहेत. स्वाभाविकच शरद पवारही कामाला लागलेत. त्यांचे काम स्वत:चा पक्ष वाढविण्याऐवजी भाजपा आणि फडणवीस यांच्या शत्रूंना एकत्र आणून, जनतेच्या मनात विष कालवून सत्ता हस्तगत करण्यासाठी चालले आहे, हे कुणाच्याही सहज लक्षात येते. राजकारण हे सत्तेसाठीच असते, हे मान्य. पण, ते जातीवर नेऊन एका विशिष्ट जातीला लक्ष्य करून समाजात दुहीची बीजे पेरून केले जाणारे राजकारण पुरोगामी म्हणविल्या जाणाऱ्या महाराष्ट्राला परवडणारे नाही. फडणवीसांची 'सुप्रीमसी' पवारांना मान्य होतच नाही. कारण महाराष्ट्राच्या राजकारणात माझ्यापेक्षा कुणी श्रेष्ठ आहे वा मातब्बर आहे, हे मान्य करण्याचा मोठेपणा त्यांच्या ठायी नाही. पन्नास वर्षे सक्रिय राजकारणात राहिल्याने आपण श्रेष्ठ आहोत, हा अहंकार बळावला असल्याने आणि आता वयही उताराकडे असल्याने ते फडणवीस यांना लक्ष्य करण्याची संधी सोडत नाहीत, हे पुरते स्पष्ट झाले आहे. पण, फडणवीसांनी स्वकर्तृत्वाने स्वत:चे राजकीय श्रेष्ठत्व सिद्ध केले आहे. शिंदेंच्या नेतृत्वात सरकार येण्यापूर्वी जेव्हा राज्यसभा आणि विधानपरिषदेसाठी निवडणुका झाल्या होत्या, तेव्हा एकेक जास्तीची जागा जिंकत फडणवीसांनी पवारांना आणि उद्धव ठाकरे यांनाही धोबीपछाड दिली होती, हे तुम्ही-आम्ही पाहिलेच आहे. त्यामुळे समृद्धीवरील अपघाताबाबत संवेदना व्यक्त करताना पवार यांनी कारण नसताना फडणवीसांच्या बाबतीतले वाक्य लोकांच्या तोंडी घालून पत्रकारांना सांगितले होते, हे त्यांच्या स्वभावाला धरूनच आहे, असे मानले पाहिजे. असो. काळ जसजसा पुढे जाईल, तसतसे वास्तव अधिक उजळपणे राज्यातील जनतेपुढे येईल, यात शंका नाही. महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या सगळे विरोधक एकट्या फडणवीसांना लक्ष्य करताना दिसतात. त्याचा अर्थच असा की, फडणवीस हे आपल्या सगळ्यांपेक्षा भारी आहेत, ते त्यांनी मनोमन मान्य केले आहे. खालच्या पातळीवर उतरून अतिशय शेलक्या शब्दांत फडणवीसांवर टीका करायची, जनतेच्या मनात त्यांच्याबाबत विष कालवायचे आणि वाहवा मिळवायची, हा विरोधी मंडळींचा उद्योग आता जनतेच्याही लक्षात आला आहे. हिंमत असेल तर पवारादी नेत्यांनी विचारांची लढाई विचारांनी लढली पाहिजे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात बसविण्यात आलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा पडला, ही घटना अतिशय दुर्दैवीच होती. अशी घटना घडायला नको होती. पण, दुर्दैवाने ती घडली. या घटनेसाठीही पवार आणि इतरांनी फडणवीसांनाच जबाबदार धरण्याचा केविलवाणा प्रयत्न चालविला आहे. आपण पन्नास वर्षे राजकारणात आहोत, हे पवार नेहमी सांगत असतात. असे सांगताना ते कायम शाहू-फुले-आंबेडकरांचा महाराष्ट्र असा उल्लेख करतात. त्यांनी कधीही छत्रपती शिवरायांचे नाव घेतल्याचे आठवत नाही. कित्येक वर्षे ते रायगडावर गेले नव्हते. पण, पक्षात फूट पडली, पुतणे अजित पवार ४० आमदारांसह बाहेर पडले, तेव्हा कुठे शरद पवारांना छत्रपती शिवाजी महाराजांची आठवण झाली. ते पहिल्यांदा रायगडावर गेले, हे संपूर्ण महाराष्ट्राला माहिती आहे. फडणवीसांची छत्रपती शिवरायांवर प्रगाढ श्रद्धा आहे. ती सिद्ध करण्यासाठी त्यांना कुणाच्याही प्रमाणपत्राची गरज नाही. काँग्रेसमधून बाहेर पडत राष्ट्रवादी काँग्रेस नावाचा वेगळा पक्ष काढूनही शरद पवारांना स्वबळावर कधीही २८८ पैकी ७० पेक्षा जास्त जागा जिंकता आलेल्या नाहीत, हे वास्तव आहे. याउलट, फडणवीसांनी स्वबळावर भाजपाच्या १०५ जागा जिंकून आणण्यात यश मिळविले. त्यामुळे पवारांनी कितीही द्वेष केला तरी फडणवीस लहान होणार नाहीत; खचणार तर अजिबातच नाहीत, ही काळ्या दगडावरची रेष आहे. ▮

## दिल्ली दिनांक

रवींद्र दाणी

# हरयाणात तुल्यबळ लढत!

जम्मू-काश्मीर व हरयाणात होत असलेल्या विधानसभा निवडणुकींपैकी हरयाणातील निवडणुकीकडे राजकीय निरीक्षकांचे विशेष लक्ष लागले आहे. जम्मू भागात भाजपा तर काश्मीर खोऱ्यात नॅशनल कॉन्फरन्स असे काहीसे चित्र या राज्यात राहण्याची शक्यता आहे. त्याचप्रमाणे जम्मू-काश्मीरमध्ये कोणत्याही एका पक्षाला स्पष्ट बहुमत मिळण्याची शक्यता जवळपास नाही. जम्मू-काश्मीरमधील राजकीय चित्र असे काहीसे स्पष्ट असताना हरयाणात मात्र काँग्रेस व भाजपा यांच्यात तुल्यबळ लढत पाहावयास मिळेल, असे मानले जाते.

**सलग दोन विजय** : हरयाणात भाजपाने २०१४ व २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत सलग दोन विजय मिळविले. २०१४ च्या निवडणुकीत हरयाणात भाजपाला स्पष्ट बहुमत मिळाले होते तर २०१९ मध्ये बहुमतास काही जागा कमी पडल्या. पण, अपक्षांच्या मदतीने राज्यात भाजपाचे सरकार स्थापन झाले. मनोहरलाल खट्टर पुन्हा मुख्यमंत्री झाले. लोकसभा निवडणुकीस काही महिने शिल्लक असताना भाजपाने राज्यात नेतृत्वबदल करण्याचा निर्णय घेतला आणि खट्टर यांच्याऐवजी नायबसिंग सैनी यांना मुख्यमंत्री केले. खट्टर यांच्या विरोधात तयार झालेली स्वाभाविक नाराजी दूर करण्याचा हा एक प्रयत्न होता. तरी लोकसभा निवडणुकीत राज्यात भाजपाला अपेक्षित यश मिळू शकले नाही. शेतकरी आंदोलन हे त्याचे एक कारण होते. लोकसभा निवडणुकीत पंजाब, हरयाणा, उत्तरप्रदेशचा काही भाग व राजस्थान या भागांत शेतकरी आंदोलनाचा फटका भाजपाला बसला, असा निष्कर्ष लोकसभा निकालानंतर काढण्यात आला; जो बरोबर होता. अशा परिस्थितीत हरयाणात विधानसभा निवडणुका होत असल्याने या निकालाचे स्वरूप कसे राहील याची उलटसुलट चर्चा केली जात आहे.

**काँग्रेस-आप युती?** : काँग्रेसने हरयाणा, पंजाब व दिल्ली या तिन्ही राज्यांत आम आदमी पक्षाशी कोणतीही युती न करण्याचा निर्णय घेतला होता. पंजाबमध्ये युती न केल्याचा फायदा काँग्रेसला झाला. आम आदमी पक्षापेक्षा जादा जागा काँग्रेसने जिंकल्या. दुसरीकडे दिल्लीत आपसोबत युती केल्याचा कोणताही फायदा काँग्रेसला झाला नाही. दोन्ही पक्ष आपापली मते परस्परांकडे वळविण्यात अपयशी ठरले. पंजाब व दिल्लीतील हे अनुभव विचारात घेत काँग्रेसने हरयाणात आम आदमी पक्षासोबत युती न करण्याचे ठरविले होते. आता त्यात बदल होण्याचे संकेत पक्षाकडून दिले जात आहेत. हरयाणातील काँग्रेस नेते युतीसाठी उत्सुक नाहीत, असे म्हटले जाते; पण काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी युतीसाठी अनुकूलता दर्शविली आहे.

**२० जागांची मागणी** : आम आदमी पक्षाने काँग्रेसकडे ९० पैकी २० जागांची मागणी केली आहे. लोकसभा निवडणुकीत पक्षाने बजावलेल्या कामगिरीच्या आधारे ही मागणी करण्यात आली असल्याचे समजते. राज्यात अशी युती झाल्यास भाजपाला ही निवडणूक निश्चितच जड जाईल, असे मानले जाते. किमान १०-१२ मतदारसंघांत आम आदमी पक्षाची कामगिरी चांगली राहण्याची शक्यता आहे. युतीचा फायदा काँग्रेस व आप या दोन्ही पक्षांना मिळू शकेल.

**गटबाजीचा धोका** : आम आदमी पक्षासोबत युती झाली तरी काँग्रेसला या राज्यात सहज सोपा विजय मिळेल, असे मानण्याचे कारण नाही. राज्य काँग्रेसमधील गटबाजी काँग्रेससाठी नुकसानदायक ठरू शकते. राज्यात भूपिंदरसिंग हुड्डा हे काँग्रेसचे सर्वात प्रभावी नेते मानले जातात. ते जाट आहेत. मात्र राज्यातील अन्य काही नेत्यांचा त्यांना विरोध आहे. काँग्रेसला हुड्डा यांच्याशिवाय पर्याय नाही. त्या स्थितीत राज्यातील निवडणूक जाट विरुद्ध गैरजाट अशी होऊ शकते. याचा फायदा भाजपाला मिळू शकतो. मुख्यमंत्री नायबसिंग सैनी हे काही महिन्यांपूर्वी मुख्यमंत्री झाले असल्याने त्यांच्याविरोधात जनतेत नाराजी तयार झालेली नाही. ते सैनी या मागास समाजातून आलेले आहेत. राज्यात सैनी मतदारांची संख्या ८ ते १० टक्के असल्याचे म्हटले जाते.

**जाट विरुद्ध इतर** : हरयाणात जाट समाज मोठ्या संख्येत असून त्याची संख्या २२.२ टक्के आहे आणि ही काँग्रेसची परंपरागत व्होट बँक मानली जाते. भाजपाने ओबीसी वर्गावर आपले लक्ष केंद्रित केले असून राज्यात ओबीसी समाज २१ टक्के आहे. म्हणजे जाट विरुद्ध ओबीसी असे तुल्यबळ समीकरण राज्यात तयार होऊ शकते. याशिवाय पंजाबी ८ टक्के तर ब्राह्मण ७.५ टक्के असे दोन प्रमुख समाज राज्यात आहेत. हे दोन्ही घटक भाजपाकडे गेल्यास त्याचा पक्षाला फायदा होईल. याशिवाय अहिर, वैश्य, राजपूत असेही काही समाज राज्यात आहेत. अटीतटीच्या लढतीत त्यांचीही भूमिका महत्त्वाची ठरू शकते.

**जाटांचे वर्चस्व** : हरयाणा विधानसभेच्या ९० पैकी ४० मतदारसंघांत जाटांचे वर्चस्व असल्याचे मानले जाते. २०१४ च्या निवडणुकीत जाट समाजाने भाजपाला पाठिंबा दिला होता. त्यामुळे भाजपाचा मोठा विजय झाला. नंतर राज्यात जाट विरुद्ध गैरजाट असे आंदोलन झाले. जाट भाजपापासून दुरावला व त्याची परिणती भाजपाच्या जागा कमी होण्यात झाली. २०२४ च्या निवडणुकीत जाट समाज भाजपाच्या पूर्णपणे विरोधात जातो की काही जाट मते भाजपाला मिळतात, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. जाट मतांवर डोळा ठेवूनच भाजपाने माजी मुख्यमंत्री स्व. चौधरी बंसीलाल यांच्या स्नुषा किरण चौधरी यांना भाजपात घेऊन त्यांना राज्यसभेत आणले. चौधरी आता जाट समाजाला किती प्रमाणात भाजपाकडे वळवू शकतात, हे पाहावे लागेल.

**४६ विरुद्ध ४५** : तीन महिन्यांपूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीत मतांची टक्केवारी काँग्रेससाठी उत्साहवर्धक असली, तरी भाजपासाठी एकदम निराशाजनक अशीही नाही. दोन्ही पक्षांनी पाच-पाच जागा जिंकल्या असल्या, तरी भाजपाला काँग्रेसपेक्षा एक टक्का मते जास्त मिळाली आहेत. लोकसभा निवडणुकीत भाजपाला ४६ टक्के तर काँग्रेस व आपला ४५ टक्के असे मतदान झाले आहे. पण, काँग्रेसने आपल्या मतांच्या टक्केवारीत मोठी वाढ करण्यात यश मिळविले आहे, हे लक्षात घेतले पाहिजे.

**भाजपाची दारोमदार** : भाजपाने राज्यातील ९० पैकी ६७ मतदारसंघांतील उमेदवार निश्चित केले असून उर्वरित उमेदवारही लवकरच निश्चित केले जातील, असे समजते. या निवडणुकीत भाजपाची दारोमदार दोन घटकांवर अवलंबून आहे. एक म्हणजे गैरजाट भाजपाला एकगठ्ठा मतदान करतील. भाजपाची दुसरी आशा म्हणजे शेतकऱ्यांची नाराजी यावेळी मतदानात दिसणार नाही. हे दोन घटक भाजपाच्या बाजूने गेल्यास हरयाणात भाजपाला पुन्हा एकदा निसटता विजय मिळू शकतो. त्याचप्रमाणे काँग्रेस व आम आदमी पक्ष यांच्यात युती न झाल्यास त्याचा मोठा फटका काँग्रेसला बसू शकतो. या तीन-चार घटकांपैकी कोणते घटक भाजपाला साथ देतात, यावर या राज्यातील निकालांचे चित्र अवलंबून आहे.

**झारखंडमधील घटनाक्रम** : चंपाई सोरेन यांनी झारखंड मुक्ती मोर्चाला राम राम करीत भाजपात प्रवेश केला. त्याने राज्यात भाजपाला बळ मिळेल, असे मानले जाते. झारखंडमधील निवडणूक महाराष्ट्र विधानसभेसोबत होणार आहे. झारखंडमध्ये सध्या झारखंड मुक्ती मोर्चा व काँग्रेस यांचे संयुक्त सरकार आहे. सरकारविरुद्धची नाराजी आणि चंपाई सोरेन यांची नाराजी अशा या दुहेरी नाराजीचा फटका मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांना बसेल तर स्वाभाविक फायदा भाजपाला मिळेल, असे चित्र राज्यात तयार होत आहे. ▮

## वेध

नीलेश अ. डाखोरे

# कशी होणार शाळा सुंदर?

'शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे. जो प्राशन करतो तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही,' असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते. यावरून शिक्षण किती महत्त्वाचे आहे, हे समजून येते. मात्र, याचे महत्त्व सरकारला कळले का? आता 'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' टप्पा-२ ची नोंदणी करण्याची सूचना सरकारकडून आली आहे. शिक्षकांनी नोंदणी करायची की विद्यार्थ्यांना शिकवायचे, हा प्रश्नच आहे. यामुळेच 'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' कशी होणार, असा प्रश्न उपस्थित होणे साहजिकही आहे. अगोदरच शासकीय शाळांना रिक्त पदांचे ग्रहण लागलेले आहे. शिक्षकांची संख्या अपुरी असताना कित्येक वर्षांपासून रिक्त पदे भरलेली नाहीत. यामुळेच एका शिक्षकावर तीन ते चार वर्गांचा प्रभार सोपविलेला दिसतो. अशा कठीण परिस्थितीतही शिक्षक विद्यार्थ्यांना शिकविण्यास तयार आहेत की त्यांचा नाईलाज आहे, याचाही विचार व्हायला हवा. कमी पटसंख्येत शिक्षकांना खरंच विद्यार्थ्यांना शिकवायला मिळते का, हा प्रश्न प्रत्येक पालकांच्या डोक्यात घर करतो. याचे प्रमुख कारण म्हणजे शिक्षकांच्या मागे शिक्षणाव्यतिरिक्त लावलेली अन्य कामे...

निवडणूक कोणतीही असो, शिक्षकांना बैलांसारखे जुंपले जाते. जनगणना करायची असल्यास सर्वात अगोदर शिक्षकांची आठवण येते. मतदार याद्या तयार करायच्या असल्यास शिक्षकांना पुढे केले जाते. दिव्यांग, ज्येष्ठ नागरिकांचा मतदानाचा प्रश्न, मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा उपक्रम, नवसाक्षर अभियान, महावाचन चळवळ, स्वच्छता मॉनिटर, साक्षरता सप्ताह, वृक्षारोपण, कोणतेही सर्वेक्षण, विविध कामांचे फोटो अपलोड करणे आदी कामे शिक्षकांकडून करून घेतली जातात. याउलट शिक्षक शाळेत जातो की नाही, तो विद्यार्थ्यांना शिकवतो की नाही, शाळेत आवश्यक पटसंख्या आहे की नाही, ही माहिती घेण्याकडे हेतुपुरस्सर दुर्लक्ष केले जाते. आम्ही मागितलेली माहिती वेळेवर द्या व सांगितलेले उपक्रम राबवा, हे मात्र ठणकावून सांगितले जाते, हे सांगण्यासारखे... अशी बिकट स्थिती असताना कोणता सुज्ञ पालक आपल्या पाल्याला शासकीय शाळेत ज्ञानार्जनासाठी पाठवेल का? हा मुद्दा लक्षात घेण्यासारखा आहे. शासकीय शाळांची ही स्थिती पाहता शहर असो वा ग्रामीण भाग, सर्वत्र खाजगी शाळांचा सुळसुळाट पाहायला मिळतो. ज्यांची परिस्थिती नाही ते नाईलाजास्तव पाल्यांना शासकीय शाळेत पाठवतात. मात्र, ज्यांची आर्थिक परिस्थिती बऱ्यापैकी आहे, ते पोटाला चिमटा घेत मुलांना महागड्या शाळेत शिक्षण देतात. यातून ते आपली श्रीमंती दाखविण्याचा प्रयत्न करतात. यावरून पालकांनी जिल्हा परिषद, नगर परिषदेच्या शाळांकडे दुर्लक्ष केल्याचे प्रथमदर्शी लक्षात येईल. मात्र, खोलात जात याचा विचार केला तर याला शैक्षणिक धोरण तितकेच जबाबदार असल्याचे लक्षात येईल. दुसरीकडे जिल्हा परिषद, नगर परिषद शाळांचा दर्जा वाढविण्यासाठी नानाविध प्रयोग केले जात असल्याचे भासविले जाते. त्याचा मोठा गाजावाजाही केला जातो. मात्र, प्रत्यक्षात असे होते का? याचा विचार केला तर उत्तर नाहीच मिळणार आहे. असे का? याचा कुठेतरी विचार करावा लागणार आहे. सरकार खाजगी शाळांवर लक्ष असल्याचे भासवते. विद्यार्थ्यांच्या पाठीवर दप्तराचे किती ओझे असावे, हे ठरवून देते. सरकार शाळांची सकाळची वेळ बदलण्यास सांगते. मात्र, जेव्हा शिक्षण शुल्काचा विषय पुढे येतो तेव्हा तो त्या-त्या शाळेने ठरवावा, असे म्हणत हात झटकले जातात. या मागील कारणही लक्षात घेण्यासारखे आहे. कारण १० पैकी ७ ते ८ खाजगी शाळा आजी-माजी आमदार, खासदार, त्यांचे नातेवाईक, मोठ्या उद्योजकांशी संबंधित आहेत. त्यांच्या मिळकतीचा विचार करूनच शैक्षणिक धोरण ठरविले जाते. मग यातून गरिबांची पिळवणूक झाली तरी काही पर्वा नाही. म्हणूनच खाजगी शाळांचे चांगले फोफावत आहे. ज्या शाळेचे शुल्क कमी तिथे विद्यार्थ्यांची पटसंख्या अधिक आणि ज्या शाळेचे शुल्क जास्त तिथे विद्यार्थी पटसंख्या कमी, असे साधारण चित्र असायला हवे. मात्र, शिक्षणाच्या बाजारीकरणाने अगदी याउलट चित्र पाहायला मिळते. वाढती गरिबी आणि विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्याचा विचार करता शैक्षणिक धोरणात बदल करण्याची वेळ आली आहे. कोणतीही खाजगी शाळा ठरावीक शैक्षणिक शुल्काशिवाय अतिरिक्त शुल्क घेणार नाही, असा नियम करण्यात आला पाहिजे. या नियमाचे उल्लंघन करणाऱ्या खाजगी शाळेवर कारवाईचा बडगा उगारला जाईल, असा अध्यादेश काढायला हवा तसेच रिक्त पदे भरण्यावर जोर दिला पाहिजे. हे जरी केले तरी शासकीय शाळांचा दर्जा सुधारेल. अन्यथा, 'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळे'चे स्वप्न केवळ स्वप्नच राहील, यात शंका नाही... ▮

९०२१०५५११५

## कानोसा

अमोल पुसदकर

# गणेश उत्सवामागील व्यवस्थापनशास्त्र



सर्वत्र गणरायाचं उत्साहात आगमन झालं आहे. गणेशोत्सव हा जरी सर्व देशभर साजरा होत असला, तरी महाराष्ट्रामध्ये त्याची धूम काही वेगळीच असते. लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांनी इंग्रजांच्या राज्यामध्ये लोकांना एकत्र करण्यासाठी देव, देश आणि धर्म याबद्दल त्यांच्या मनामध्ये जागृती निर्माण करण्यासाठी या उत्सवाचा प्रारंभ केला. आज १० हजारांपेक्षा अधिक मंडळं संपूर्ण महाराष्ट्रात आहेत. यांचे लाखो कार्यकर्ते आहेत. तसं पाहिलं तर हा गणेशोत्सव आपल्या सगळ्यांना भरपूर काही शिकवून जातो. काही ठिकाणी बाल गणेश मंडळ असते, काही ठिकाणी तरुण गणेश मंडळ असते. बाल काय अन् तरुण काय सर्वच गणरायासाठी खपत असतात आणि यातूनच त्यांना विविध गोष्टी शिकायला मिळतात. गणरायाचे आगमन ज्यावेळेला होते त्यावेळेला बरेचदा शाळांमध्ये परीक्षाही असतात. परंतु, गणपतीजवळ जायला मिळावे, तिथल्या कार्यक्रमांमध्ये भाग घ्यायला मिळावा यासाठी बच्चे कंपनी आपला अभ्यास आणि गणराया समोरचे कार्यक्रम त्याच्यामध्ये समन्वय साधण्याचा प्रयत्न करीत असतात. गणरायाच्या निमित्ताने वस्तीतील सर्व लहान मुलं एकत्र येतात. त्यांचे खेळ-कार्यक्रम अशा सर्वच गोष्टी यामुळे घडत असतात. वस्तीतील मोठी माणसे या निमित्ताने एकत्र येत असतात. वस्तीमध्ये होणाऱ्या महाप्रसादाला वस्तीतील सर्वच नागरिकांची उपस्थिती असते. यातून सामाजिक समरसता साधली जाते.

गणेशोत्सव पार पाडताना बालगोपाल व तरुणांना अनेक गोष्टी शिकायला मिळतात. या अनेक गोष्टी म्हणजे दुसरे-तिसरे काही नसून आधुनिक व्यवस्थापनशास्त्राचेच धडे आहेत. यातील बरीच मुलं अशी असतात, की जी कधीही कोणत्याही सामाजिक कार्यासाठी घराच्या बाहेर पडलेली नसतात. गणपतीसाठी सुरुवातीला मुलं एकत्र येऊन जी बैठक घेतात त्यामध्ये कुठलाही सण-समारंभ साजरा करण्यासाठी प्लॅनिंग म्हणजे योजना कशी बनविली पाहिजे, हे त्यांना समजते. ज्यांना गणेशोत्सवाची योजना करण्याचा अनुभव आहे, त्यांच्यापासून इतर मुलं शिकत असतात. योजना ठरविणे आणि ती कागदावर उतरवणे (पेपर प्लॅनिंग) हा अनुभव मुलांना यातून मिळतो. गणेशोत्सव म्हणजे विविध गोष्टींवर होणारा खर्च आलाच. त्यासाठी वर्गणी जमा करणे आलेच. मुलं घरोघरी जातात व ज्या कामासाठी आम्ही पैसा गोळा करतो आहोत ते कार्य कसे चांगले आहे, हे त्यांनाही पटलेले असते व ते ज्यांच्याकडून वर्गणी मागतात त्यांनाही पटवून देऊ शकतात. यामुळे वस्तीमध्ये त्यांची ओळख होते. ते स्वत:ची पण ओळख सांगू शकतात. सामाजिक कार्यासाठी पैसा जमा करण्याची त्यांना सवय लागते. ज्यांनी कधीच कोणाला काही मागितलेले नाही, अशी मुले पहिल्यांदाच सार्वजनिक कामासाठी कोणाला काहीतरी मागत असतात. यातून त्यांच्या मनात असलेली भीड चेपली जाते. जमा झालेल्या पैशाचा योग्य विनियोग कसा करायचा व जमा-खर्च कसा लिहून ठेवायचा, याचे शिक्षण त्यांना मिळते. गणेश उत्सवाचे विविध कार्यक्रम करताना त्यांना तन-मन-धनाने ते कार्य करावे लागते. तन म्हणजे शारीरिक शक्ती त्यांना खर्ची घालावी लागते. मन म्हणजे मनापासून हे कार्य करावे लागते आणि धन म्हणजे स्वत:चे पैसेसुद्धा या कामासाठी त्यांना खर्च करावे लागतात. त्यामुळे सामाजिक कार्य कसे करायचे याचा अनुभव त्यांना मिळतो व एका पिढीपासून दुसरी पिढी शिकत राहते. सामाजिक कार्यासाठी स्वत:च्या जीवनामध्ये बदल घडवून आणण्यासाठी ते सज्ज होतात. दिवसभराचे सर्व कार्यक्रम व्यवस्थित व वेळेवर पार पडले पाहिजे यासाठी आपला व्यक्तिगत वेळ त्यांना खर्ची घालावा लागतो. वस्तीतील समवयस्क विविध मुलांना सोबत घेतले पाहिजे व त्यांनाही या कामात लावले पाहिजे, ही भावना वाढीला लागते. त्यांचे संघटन कौशल्य यातून वाढीस लागते. मंडळातील प्रत्येकाला कोणती ना कोणती जबाबदारी सोपवावी लागते. जबाबदारी सोपविणे (डिलिगेशन ऑफ ॲथॉरिटी) ही गोष्ट त्यांना शिकायला मिळते. ज्याच्यावर जबाबदारी सोपवली त्यांनी ते कार्य बरोबर पार पाडले की नाही, याकडे कसे बघावे, हे त्यांना शिकायला मिळते. हा सर्व आधुनिक व्यवस्थापनशास्त्राचा भागच आहे. आनंद मेळावा असो वा महाप्रसाद ज्यांच्याकडे जी जी जबाबदारी सोपविलेली आहे त्यांच्याकडून ती सर्व कामे व्यवस्थित पार पडत आहेत की नाही, हे बघणे म्हणजे समन्वय (को-ऑर्डिनेशन) व्यवस्थित साधावा लागतो. जे ठरवले आहे तेच झाले पाहिजे म्हणजे (डायरेक्शन) दिशानिर्देशन त्यांना करावे लागते. जर कुठे ठरवल्यापेक्षा काही वेगळे होत असेल तर त्याला ताबडतोब थांबवणे आणि ठरवलेल्या गोष्टी सगळ्यांकडून जशाच्या तशा करून घेणे म्हणजे कंट्रोलिंग त्यांना शिकायला मिळते. विविध जबाबदाऱ्या पार पाडणाऱ्या मंडळाच्या या कार्यकर्त्यांचा सत्कार (रिवार्ड ॲण्ड रिकग्निशन) झाला पाहिजे. त्यामुळे त्यांना प्रोत्साहन मिळेल व आपणही काही कामाचे आहोत, हा भाव त्यांच्या मनामध्ये निर्माण होईल. मोठ्यांकडून मिळालेली कौतुकाची थाप ही तरुणांचा उत्साह वाढविणारी ठरते. डीजेचा अत्यंत कर्कश आवाज, फॅन्सी ड्रेसच्या निमित्ताने होणारी भडक स्पर्धा, चित्रपटाच्या गाण्यांवर होणारे नाच, गणपतीसमोर ग्रामीण भागात होणारे लावणीचे कार्यक्रम यातून बाहेर पडून काही विधायक, सकारात्मक, बालगोपाल तरुण, वृद्ध या सर्वांच्या कलागुणांना उजाळा देणारे कार्यक्रम करणे आवश्यक आहे.

लाठीकाठी, योग प्रात्यक्षिक, हस्ताक्षर, मेंदी, पाककला, गायन, भजन, फुलांची सजावट, अथर्वशीर्ष पठन, गणपतीच्या कथांचे कथाकथन, फॅन्सी ड्रेस म्हणजे वेशभूषा स्पर्धेमध्ये विविध गणेश रूपे, कार्तिकेय, रिद्धी, सिद्धी अशा विविध वेशभूषा बालकांना धारण करायला लावल्या पाहिजे व त्यांची स्पर्धा असायला हवी. यासाठी वस्तीतील सर्वांनीच पुढाकार घेऊन एकत्रित बैठक घेणे आवश्यक आहे. ती जर झाली तर या कार्यक्रमांच्या ऐवजी आपण कोणते कार्यक्रम घेऊ शकतो, या सूचना अनेकांकडून येतील. तरच लोकसंघटन, लोकसंस्कार, लोकजागृती अशा पद्धतीचा उद्देश असलेला गणेशोत्सव खऱ्या अर्थाने साजरा झाला, असे म्हणता येईल. ▮

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

### प्रथम तुला वंदितो...!

मंदिरात गेलो की आपण प्रदक्षिणा घालतो. सर्वात पहिली प्रदक्षिणा कुणी घातली? तर, ती गणेशानेच घातली आहे. विश्वाच्या इतिहासात मातृ-पितृभक्तीसाठी श्रीगणेशाचा उल्लेख होतो. एकदा सर्व देवतांनी पृथ्वी प्रदक्षिणेची स्पर्धा घेण्याचे ठरवले. तेव्हा कार्तिकेय त्यांचे वाहन मोरावर बसून प्रदक्षिणेसाठी निघाले. गणपतीने विचार केला, आपले वाहन तर उंदीर आहे. उंदरावर बसून प्रदक्षिणा घालायला खूप वेळ लागणार! तेव्हा गणपती आपले माता-पिता शिव-पार्वती यांना नमस्कार करून सात वेळा प्रदक्षिणा घालायचे ठरवतात. जेव्हा कार्तिकेय पृथ्वी प्रदक्षिणा घालून परत येतात, तेव्हा गणेशाला पाहून ते म्हणतात, गणेश प्रदक्षिणेला गेलाच नाही. तेव्हा गणेश कार्तिकेय यांना सांगतो की, मी आपल्या माता-पित्यांनाच सात वेळा प्रदक्षिणा घातली आहे. कारण त्यांच्या चरणांपाशी सर्व तीर्थे एकवटली आहेत, हे ऐकून शंकर प्रसन्न होऊन गणपतीला आशीर्वाद देतात की, समस्त देवतांमध्ये सर्वप्रथम तुझीच पूजा होईल. या कथेमधून आपल्याला एक शिकवण मिळते की, कुठल्याही स्पर्धेपेक्षा इतरांचा सन्मान करणे अधिक महत्त्वाचे आहे.

**दीपाली गीते**/९८२२००४०५४

●● ●●

### रुग्णवाढ चिंताजनकच

३१ ऑगस्टच्या 'आपलं नागपूर'मध्ये अनेक घरांमध्ये नागपूरकर चिकनगुनियाने त्रस्त असल्याची बातमी वाचली. नागपुरातील डेंग्यू आणि चिकनगुनियाची वाढती रुग्ण संख्या निश्चितच चिंताजनक आहे. या संबंधात मनपाद्वारे डासांच्या उपसर्गावर फवारणीही होताना दिसते आहे, हे चांगलेच आहे. तसेही पावसाळ्यात अस्वच्छतेमुळे साथीचे विकार अपेक्षित असतातच. या सर्व बाबींना घरातील कुंड्या, कुलर, पाण्याच्या टाक्यांची नित्य स्वच्छता ठेवण्याची नैतिक जबाबदारी नागरिकांची असते. काही नागरिकांद्वारा घरातील अवांछित कचराही अयोग्य ठिकाणी फेकण्यात येतो; ज्यामुळे मैला वाहणाऱ्या गटर लाईन तुंबतात आणि रोगराई वाढवणारे घाण पाणी रस्त्यांवर वाहताना दिसते. याला कारण बेजबाबदार नागरिकच. शाळेत जाणाऱ्या लहान मुलांद्वारे घरात इतरांना संसर्ग होतो, हेही पाहण्यात येते; ज्यामुळे साथीचे आजार फैलावतात. शाळांमधील स्वच्छतागृह, परिसराची विशेषत: पावसाळ्यात योग्य देखभाल करणे ही जबाबदारी शाळा व्यवस्थापनाची आहे. रोगराईचे खापर फक्त शासकीय यंत्रणेवर फोडणे अयोग्य आहे. महानगरपालिकेत प्रत्येक वॉर्डात 'स्वच्छता निरीक्षक' असणे गरजेचे आहे; ज्यांची जबाबदारी रस्त्यांवर, इतर परिसरात साचलेल्या डबक्यांवर लक्ष ठेवून उपाययोजना करण्याची हवी. असे मनपाद्वारे नित्य होते की नाही, याविषयी शंकाच आहे. नागपुरातील अनेक विभागांतील रस्त्यांची दुर्दशा अजूनही संपलेली नाही. ठिकठिकाणी खड्डे पडले असून त्यात पावसाचे पाणी साचते; जे रोगराईस आमंत्रित करते. अशाच झोन, भागात सध्या डासांमुळे उद्भवणाऱ्या साथीचे रुग्ण वाढले आहेत. ही बाब 'तरुण भारतने' निदर्शनास आणली आहे. परंतु जबाबदार यंत्रणेच्या ढिसाळ नियोजनावर प्रश्नचिन्ह आहेच. सामान्य नागपूरकरांच्या नशिबी मात्र दरवर्षी पावसाळ्यातील दवाखान्याच्या चकरा आणि वैद्यकीय खर्च यात सुतराम फरक पडलेला नाही.

**राम राजे**/९४२१७७९९४५

●● ●●

## वाचक पत्रे

### शिवप्रेमाची काँग्रेसी ढोंगबाजी

मालवण येथे शिवरायांचा पुतळा कोसळला, ही अत्यंत दुर्दैवी, दु:खाची घटना घडली. त्याबाबतच्या दोषींवर कठोर कारवाई होईलच. महाराष्ट्रातील इतर नेत्यांबरोबरच काँग्रेसी नेत्यांनीही दु:ख व्यक्त करून त्या दुर्घटनेचे राजकारण करण्याचा अश्लाघ्य प्रयत्न केला. राहुल गांधी यांनी सांगलीतील सभेत 'या दुर्घटनेप्रकरणी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शिवरायांची माफी मागितली, पण त्यांनी समस्त महाराष्ट्राची माफी मागायला हवी' असा उथळ पत्रकारांच्या भाषेत 'हल्लाबोल' करून शब्दच्छल करण्याचा पोरकट प्रयत्न केला. ही काँग्रेसची ढोंगबाजी आहे. काँग्रेसची स्थापना १८८५ मध्ये झाली. त्यानंतरच्या सत्तरएक वर्षांत काँग्रेसने शिवाजी महाराजांचे नावदेखील उच्चारले नव्हते. कारण काँग्रेसचा 'तुष्टीकरणाचा' कार्यक्रम! १९५६-५७ मध्ये संयुक्त महाराष्ट्र समितीची चळवळ जोरात असताना शिवप्रेम दाखविण्यात मतांचे मार्केट आहे, याचा साक्षात्कार काँग्रेसी नेत्यांना झाला आणि त्यांनी शिवप्रेमाचा बाप्तिस्मा घेऊन शिवाजी महाराजांना हायजॅक करण्याचा प्रयत्न केला. याउलट संघाची स्थापना १९२५ मध्ये झाली. तेव्हापासून आजतागायत संघामध्ये वर्षभरात जे सहा-उत्सव साजरे केले जातात त्यामध्ये 'शिवराज्याभिषेक दिना'चा समावेश असतो. (काँग्रेस सेवादल कधी काळी अस्तित्वात असताना असा समावेश होता का?) छत्रपती शिवाजी महाराज आणि राणा प्रताप हीच संघाची आराध्य दैवते आहेत. तेव्हा राहुल गांधी यांनी नरेंद्र मोदींना शिवप्रेम शिकविण्याचे ढोंग करू नये, स्वत:चे शिवप्रेम तपासावे आणि त्यांची भारतावर निष्ठा असेल तर परदेशांत भारताची बदनामी करण्याचे थांबवावे. ▮

**अविनाश वाघ**/९३२२९९६२४३

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.

प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87

stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# खरबी वळण बंधाऱ्याविरोधात हिंगोलीत ट्रॅक्टर मोर्चा

## निविदा तत्काळ रद्द करून प्रकल्पाला स्थगिती देण्याची मागणी, हिंगोलीचे पाणी नांदेड जिल्ह्यात पळविण्याचा प्रयत्न हाणून पाडणार

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ९ सप्टेंबर**

हिंगोली जिल्ह्यातील कयाधू नदीवर खरबी येथे बंधारा बांधून त्याचे पाणी ईसापुर धरणात वळविण्यासाठी काढण्यात आलेल्या निविदा रद्द करून सदर योजनेला स्थगिती देणे व सिंचनाच्या ईतर मागण्यांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर माजी खा.ॲड शिवाजीराव माने यांच्या नेतृत्वात भव्य ट्रॅक्टर मोर्चा काढून हिंगोलीकरांनी खरबी बंधाऱ्याला असलेला तीव्र विरोध दाखवून दिला. यावेळी जिल्हाधिकारी यांचेमार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन सादर करण्यात आले.

दिनांक ३ सप्टेंबर रोजी उर्ध्व पेनगंगा प्रकल्प विभाग क्रमांक चार आखाडा बाळापूरच्या कार्यकारी अभियंत्यांनी खरबी वळण बंधाग्र, खरबी ते ईसापूर जलाशय पाणी वाहन प्रणालीचे बांधकाम व अनुषंगिक कामे या करता निविदा प्रकाशित करण्यात आलेली असून याकरता ९९५ कोटी ४१ लाख रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे ४ सप्टेंबर पासून १८ सप्टेंबर पर्यंत निविदा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत २० सप्टेंबर रोजी निविदा उघडण्यात येणार असल्याचे सदर निविदा सूचनेत स्पष्ट करण्यात आले आहे. सदरचा खरबी बंधारा बांधल्यास हिंगोली जिल्ह्याचे अक्षरशः वाळवंट होणार आहे. हिंगोली जिल्ह्याच्या मधोमध वाहणारी ही नदी असल्यामुळे या नदीच्या पात्रात पावसाळ्याचे काही दिवस वगळता तुरळक ठिकाणी पाणी साठून राहते परंतु हा बंधारा झाल्यास या नदीत पाणीच राहणार नाही ज्यामुळे कयाधू काठच्या परिसरातील गावांचे शेतकऱ्यांचे कधीही न भरून येणारे नुकसान होणार आहे. कयाधू नदीच्या दोन्ही तीरावरील पंधरा ते वीस किलोमीटर पर्यंतच्या बोअरला, विहिरीना पाणी राहत असते परंतु नदी वळती केल्याने भविष्यामध्ये पाण्याचे मोठे संकट या जिल्ह्यात उभे राहणार आहे.



हिंगोली जिल्ह्याचा सिंचनाचा अनुशेष अजूनही कायम असताना हे पाणी ईसापुर धरणात वळवून नांदेडला नेल्या जात आहे ज्यामुळे या जिल्ह्याच्या हक्काचे पाणी या जिल्ह्याला मिळणार नाही त्यामुळे हा बांधारा या जिल्ह्याच्या कोणत्याही कामाचा नसल्याने तो बांधण्यात येऊ नये. खरबी बांधारा बघण्याच्या अनुषंगाने प्रस्ताव तयार केला गेला आहे तो प्रस्ताव तयार करण्यापूर्वी हिंगोली जिल्ह्यातील कोणत्याही लोकप्रतिनिधी किंवा या क्षेत्रात काम करणाऱ्या कोणत्याही शेतकरी नागरिकांना विश्वासात घेतल्या गेलेल्या नाही वास्तविक पाहता नदी वळवणारा हा प्रकल्प असल्यामुळे याची जन सुनावणी घेणे आवश्यक असताना संबधीत विभागाने असे काही न करता निविदा काढलेल्या आहेत. बंधाराच्या बांधण्याच्या नावाखाली सापळी धरणामध्ये जेवढे पाणी येणार होते. ते सर्व पाणी वळवल्या जात आहे. त्यामुळे सापळी धरण बांधकामाच्या निविदा काढण्यापूर्वी ज्या काही पद्धत अवलंबिली गेली होती. ती प्रक्रिया पार पाडणे आवश्यक असताना असे काही या प्रकरणात केल्या गेलेले नाही. पर्यावरणीय दृष्ट्या नदीचा प्रवाह बदलणे याकरता केंद्र शासनाच्या पर्यावरण मंत्रालयाची पण परवानगी लागत असते परंतु एक नदीच वळती करत असताना संबंधित विभागाने अशी कोणताही परवानगी घेतलेली नाही व हे टाळण्यासाठी च बांधारा बांधल्या जात असल्याचे भासविले जात आहे.

राज्य शासनाने नुकतीच वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पाला मान्यता दिलेली आहे गोसीखुर्द धरणातून पाणी उचलून हा प्रकल्प राबविला जाणार आहे या प्रकल्प अंतर्गत वाशिम जिल्ह्याचा पण समावेश असून या प्रकल्पातील पाणी वाशिमजवळ पैनगंगा नदीत आणल्या जाणार आहे म्हणजे पर्यायाने हे पाणी ईसापूर धरणातच जाणार आहे त्यामुळे अप्पर पैंनगंगा प्रकल्पा मधील पाण्याची तूट भरून निघणार आहे असल्याने खरबी बंधाऱ्याचे कामही पडणार नाही. खरबी गावाजवळ कयाधू नदीवर बांधलेल्या बंधाऱ्यातून ईसापुर धरणात जाणारे पाणी हे बोगदा व पाईपलाईन द्वारे जाणार असल्यामुळे त्याचा फायदा ज्या भागातून हे पाणी वळवल्या जाणार आहे त्या भागातील शेतकऱ्यांना पण होणार नाही.

नांदेड जिल्ह्यातील शेतकरी व नागरिक यांना निवडणूकीच्या तोंडावर खुश करण्यासाठी हे सर्व केले जात आहे कारण निविदातील कामांची किंमत व त्या करता निश्चित केलेल्या कालमर्यादा या पाहिल्यास यात होत असलेली घाई यामूळे फक्त हिंगोली जिल्ह्यातील पाणी पळवीने हाच उद्देश असल्याने ह्या निविदा तात्काळ रद्द करून या प्रकल्पाला स्थगिती देण्यात यावी. राज्यपालांनी जो सिंचनाच्या अनुशेष दाखविला आहे. त्यामध्ये व प्रत्यक्ष फार मोठी तफावत असल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे. हिंगोली जिल्ह्यातील कयाधू नदीच्या पाण्याचा वापर जिल्ह्यातच होण्यासाठी परिपूर्ण प्रकल्प अहवाल उझठ तयार करण्यात यावा. हिंगोली जिल्ह्याच्या सिंचनाचा अनुशेष भरून काढण्याकरता ज्या योजना प्रस्तावित करण्यात आलेल्या आहेत त्यांना मान्यता देण्यात याव्यात. कयाधू नदीवर श्रृंखलाबद्दल उच्च पातळीचे बंधारे बांधण्या करता सिंचनाच्या मापदंडात सूट देऊन विशेष बाब म्हणून मान्यता देण्यात यावी. कळमनुरी तालुक्यातील शेनोडी - रामवाडी उपसा सिंचन योजनेस प्रशासकीय मान्यता देण्याबाबत मा. कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ छत्रपती संभाजी नगर यांनी अप्पर मुख्य सचिव (जसंप्र) जलसंपदा विभाग मंत्रालय मुंबई यांच्याकडे प्रस्ताव दिनांक २६-६-२०२४ रोजी पाठवलेला आहे त्यास तातडीने मान्यता देण्यात यावी. गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ छत्रपती संभाजी नगर यांनी त्यांचे पत्र दिनांक २०१९ रोजी प्रधान सचिव जलसंपदा विभाग मंत्रालय मुंबई यांना देऊन ईसापुर धरणाची उंची दोन मीटरने वाढवून २०० दलघमीचा अतिरिक्त जलसाठा निर्माण करणे जेणेकरून सापळी धरणाची आवश्यकता भासणार नाही असे कळविलेले आहे. ईसापुर धरणाचे बॅक वॉटर आजच ज्या जमिनी संपादित केलेल्या नाहीत तिथपर्यंत जात आहे जर दोन मीटरने ईसापुर धरणाची उंची वाढवल्यास त्याचा फटका अनेक गावांना बसणार आहे याचा पण विचार होणे गरजेचे आहे. ईसापुर धरणाच्या उजव्या कालव्यातून सिंचनासाठी जाणाऱ्या चारी एक ते सतरा क्रमांकाच्या बंद आहेत त्यातील सिंचन होत नाही त्याचे पुर्ननिर्माण करून देण्यात यावे. या मागण्यांवर १५ दिवसात निर्णय घ्यावा. शेकडोंच्या संख्येने निघालेल्या ट्रेक्टर मोर्चात हिंगोली जिल्ह्यातील शेतकरी, नागरिक, व्यापारी, पत्रकार, सर्वच राजकीय, सामाजिक संघटनांनी सहभागी होत नांदेडकरांच्या दडपशाही विरुद्ध वज्रमुठ आवळली असल्याचे दिसून आले.

# मुलांनो मोठी स्वप्न बघा- पोलिस अधीक्षक कोकाटे

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ९ सप्टेंबर**



जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर मुलांनो नेहमीच मोठी स्वप्ने पहा. ती सत्यात उतरवण्यासाठी वाटचाल करा, मेहनत करा. आपल्याकडे काय नाही यापेक्षा काय आहे याचा विचार करा आणि आगेकूच करा. एकदिवस तुम्ही पाहीलेले स्वप्न पूर्ण होईल असा सल्ला पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी सेवासदन वस्तीगृहातील मुलांना दिला.

शेतकरी आत्महत्याग्रस्त मुलांच्या जिजामाता नगर येथील सेवासदन वस्तीगृहात स्थापन केलेल्या श्री-गणेशाची आरती करण्यासाठी पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे गेले असता त्यांनी सेवासदन वस्तीगृहातील विद्यार्थ्यांशी संवाद साधला. सेवासदन परिवारातील श्री गणरायांची आरती श्रीकृष्ण कोकाटे यांच्याहस्ते करण्यात आली. यावेळी कोकाटे यांनी आपल्या जीवनाचा प्रवास मुलांना सांगितला. त्याचबरोबर मुलांनो आपण जे स्वप्न पाहतो ते सत्यात नक्कीच उतरत असते. तुम्ही मोठी स्वप्न पहा आणि ती पूर्ण करण्यासाठी अहोरात्र मेहनत करा. मीरा कदम धनराज कदम व समाजातील आम्ही सर्वजण तुमच्या पाठीशी आहोत. आपल्याकडे काय नाही यापेक्षा आपल्याकडे काय आहे याचा विचार करा आणि पुढे चालत रहा. तुम्ही खूप नशीबवान आहात की तुम्ही सेवासदनाच्या सावलीमध्ये आहात. इथे तुमची आई-वडिलांप्रमाणे काळजी घेणारे धनराज कदम आणि मीरा कदम आहेत. इथे येऊन खरोखरच मला खूप छान वाटले अशा भावना श्रीकृष्ण कोकाटे यांनी व्यक्त केल्या.

सेवासदनमधील मुलांनीसुद्धा कोकाटे यांच्या मार्गदर्शनानंतर आपल्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या. सेवासदन परिवाराच्यावतीने श्रीकृष्ण कोकाटे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी पोलिस निरीक्षक विकास पाटील, पोलिस निरीक्षक नरेंद्र पडळकर तसेच धनराज कदम, मीरा कदम, कवी शिवाजी कऱ्हाळे व सेवासदन मधील सर्व मुले उपस्थित होते.

# पानकनेरगाव सर्कलमध्ये भाजपच्या बुथ प्रमुख, शक्ती केंद्र प्रमुखांना मार्गदर्शन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ९ सप्टेंबर**



पानकनेरगाव सर्कल मधील जयपूर गणातील बूथ प्रमुख व सशक्तीकरण भाजपा युवा नेते शिवाजीराव मुटकुळे यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक संपन्न झाली.

यावेळी युवा नेते शिवाजीराव मुटकुळे यांनी बूथ सशक्तीकरण, मन की बात, धन्यवाद मोदीजी, फ्रेंड्स ऑफ बीजेपी व आगामी कार्यक्रम यांसारख्या विविध प्रकारच्या विषयांवर चर्चा व काही समस्या जाणून घेतल्या. त्यावर मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी युवा नेते शिवाजीराव मुटकुळे सोबत तालुकाध्यक्ष हिंमतराव राठोड, अशिष वाचपेयी, संतोषराव खोडके, विजय धाकतोडे, लक्ष्मण थोरात, श्यामभाऊ देशमुख, विवेकानंद तांबिले पाटील सरपंच, जानार्दन कोरडे, श्रीरंग राठोड, विधानसभा विस्तारक मुंजाळ, माजी सरपंच शंकरराव देशमुख, भागवत मुंडे सरपंच, कान्होजी थोरात यांच्या सह मोठ्या संख्येने पदाधिकारी, बूथ प्रमुख, शक्ती केंद्र प्रमुख व मंडळ अध्यक्ष उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त

### नशामुक्त भारत अभियानाचा श्रीगणेशा

हिंगोली- जय बजरंग गणेश मित्र मंडळ च्या पदाधिकारी-गणेश भक्तांना व्यसनमुक्ती-नशामुक्तीची प्रतिज्ञा देत, नशामुक्त भारत अभियानाचा श्रीगणेशा वसमत येथे दि. ७ शनिवारी करण्यात आला. सामाजिक कार्यकर्ते विशाल अग्रवाल यांची प्रमुख उपस्थिती होती. नशामुक्त भारत अभियान समितीच्या अंतर्गत, जिल्हा परिषद समाज कल्याण विभाग आणि नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने गणेश मंडळाच्या परिसरात व्यसनमुक्ती-नशामुक्ती उपक्रम राबविण्यात आला. नशामुक्त भारत अभियान समितीचे जिल्हा पदाधिकारी तथा समन्वयक-विशाल अग्रवाल यांनी तंबाखू-तंबाखूजन्य पदार्थ, व्यसनवर्धक पदार्थांचे दुष्परिणाम विशद केले. नशाबंदी मंडळ प्रकाशित-व्यसनांच्या दुष्परिणाम बाबत चित्र प्रदर्शनीचे आयोजन देखील करण्यात आले होते. नशाबंदी मंडळाच्या कार्यकर्त्या-शुभदा सरोदे यांनी नशामुक्तीची प्रतिज्ञा दिली. व्यसनमुक्ती प्रबोधनपर पत्रकांचे वितरण करण्यात आले. प्रारंभी श्रींची आरती पार पडली.

### तेलगाव येथील तरूण शेतकऱ्याची आत्महत्या



वसमत- वसमत तालुक्यातील तेलगाव येथे तरुण शेतकरी राजेश्वर पंडितराव कानोडे यांनी शेतामध्ये आंब्याच्या झाडाला गळफास घेऊन सततच्या नापिकीला व बँकेचे त्यांच्या वडीलाकडे कर्ज होते. हैदराबाद बँक परभणी व जयप्रकाश नागरी बँक वसमत या दोन बँकेचे यांच्या वडीलाकडे कर्ज होते व मराठा समाजाला आरक्षण मिळत नसल्याने घरची परिस्थिती हलाखीची असून शिक्षणासाठी सुद्धा पैसे मिळत नसून पोलीस भरतीमध्ये सुद्धा त्यांनी खूप प्रयत्न केले. राजेश्वर यांच्या खिशात चिट्टी मिळून आली की माझे कुटुंबावर बँकेच्या कर्जाचा बोजा आहे माझे आई-वडील अपंग आहेत सततच्या नापिकीमुळे मी बँकेचे कर्ज फेडू शकत नसल्यामुळे व मराठा आरक्षण सुद्धा मिळत नसल्यामुळे या निराशातून मी कुठलीही देखील नोकरी कर्ज फेडू शकत नाही व नोकरी मिळू शकत नाही अशा निराशेतून मी माझे जीवन संपवत आहे या सरकारच्या अडसळ धोरणामुळे मी माझी जीवन यात्रा संपित आहे असे या चिट्टी मध्ये लिहिलेले आहे तेलगाव या गावावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. पुढील तपास हट्टा पोलीस स्टेशन केंद्रे, संदीप सुरशे, आशिक हे करीत आहेत.

### अनोळखी पुरूष जातीचा मृतदेह आढळला

हिंगोली- औंढा ते हिंगोली मार्गावर दि ६ सप्टेंबर २०२४ लिंबाळा मक्ता गावाजवळ अज्ञात वाहनाच्या धडकेत ३० ते ३५ वर्ष पुरूष जातीचा मृतदेह आढळला आहे. त्यांच्या अंगात पांढरा शर्ट, एक निळ्या रंगाची पँट, काळ्या रंगाची रबरी चप्पल आहे. सदर इसमांबद्दल लिंबाळा, नर्सी फाटा परिसरात विचारपूस तसेच सीसीटीव्ही फुटेज तपासले असता सदर फोटोमधील इसम तोच असल्याचे स्पष्ट झाले आहे. अपघातात कमरेच्या वरील भाग चेंदामेंदा झाल्याने ओळख पटत नाही. सदर प्रेताची ओळख पटल्यास मो नं ७०२०६७२२२१ वर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# वसमत येथे उत्साहात गणरायाचे आगमन

**तभा वृत्तसेवा**
**वसमत ९ सप्टेंबर**

शहरात मोठ्या उत्साहात ढोल ताशाच्या गजरात गणपती बाप्पाच्या मूर्तीची स्थापना करण्यात आली. शहरात विविध ठिकाणी गणेश मूर्तीच्या दुकानात मूर्ती खरेदीसाठी भाविकांनी गर्दी केली होती वसमत शहरात व तालुक्यातील मोठ्या उत्साहात भक्तीमय वातावरणात गणपती बाप्पाची मूर्तीची स्थापना करण्यात आली. वसमत शहरात सांस्कृतिक जुनी परंपरा असून शहरात मानाचे एकूण १३ गणपतीची स्थापना करण्यात आली यावर्षी शहरात एकूण १०६ गणेश मूर्तीची स्थापना करण्यात आली तसेच संपूर्ण तालुक्याचा ठिकाणी ४०५ गणेश मूर्तीची स्थापना करण्यात आली. गणेश चतुर्थी निमित्त गणेश मूर्ती सजावटी साहित्य खरेदीसाठी मोठ्या प्रमाणात भाविकांनी गर्दी केली होती. सर्वत्र भक्तीमय वातावरणात शनिवारी घरोघरी गणरायाचे आगमन झाले गणेश उत्सवाचा पार्श्वभूमीवर वसमत शहरात जागोजागी पोलिसांकडून चोक बंदोबस्त करण्यात आले होते. ढोल ताशाच्या गजरात भक्तीमय वातावरणात वसमत शहरात ठीक ठिकाणी गणरायाची मूर्तीची स्थापना करण्यात आली गणेश उत्सवाच्या पावन परव आनंदमय वातावरणात मूर्तीची स्थापना करण्यात आली गणरायाच्या आगमनानिमित्त शहरातील बाजारपेठ गजबजली होती.

# सांदीपनी पब्लीक स्कूलमध्ये शिक्षक दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ९ सप्टेंबर**



५ सप्टेंबर रोजी सांदिपनी पब्लिक स्कूल तरोडा (बु) नांदेड येथील शाळेत शिक्षक दिनाचा कार्यक्रम अतिशय उत्साहात पार पडला या दिवशी शिक्षक दिन कार्यक्रमाचे संपूर्ण आयोजन दहावीच्या विद्यार्थ्यांनी केले. दहावीच्या सर्व विद्यार्थ्यांनी मुख्याध्यापका पासून ते शिपायापर्यंतच्या भूमिका सर्वांनी अतिशय व्यवस्थितरीत्या पार पाडले.

दुपारच्या सत्रात कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. सर्वपल्ली राधाकृष्ण आणि चक्रधर स्वामी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली तसेच डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा वाढदिवस संपूर्ण भारतात शिक्षक दीन म्हणून उत्साहाने साजरा केला जातो. त्याच्या जीवनावर काही विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले यात संस्कार मोरे (यु.के.जी.) कु, तन्वी मिश्रा, कु, आराध्या मद्दे वर्ग ४ था कुलविंदर सिंह विष्णुपुरीकर इ. ६ वी. ज्या विद्यार्थ्यांनी शिक्षकाचीभूमिका बजावली त्याही विद्यार्थ्यांनी आपले अनुभव या ठिकाणी व्यक्त केले. मनोगत व्यक्त केले आहे.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. अर्पिता सिंह, कु वैष्णवी आरसुळे इयत्ता नववी या वर्गातील विद्यार्थिनींनी केले के जी. ते ते इ. ९ वी पर्यंत शिकविणाऱ्या ज्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्टपणे शिकवले त्या विद्यार्थांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. या कार्यक्रमाला इ १० वी च्या विद्यार्थ्यांनी संपूर्ण शिक्षकांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले या कार्यक्रमाला या शाळेचे संचालक सुनील राठोड, सहसंचालक मुकुल राठोड, विपुल राठोड, सौ. रेश्मा विपुल राठोड, सौ माहेश्वरी मुकुल राठोड, शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती क्रांती कुलकर्णी, उपमुख्याध्यापिका सौ. हरप्रीत कौर, शाळेचे प्रशासक मारुती मेखाले यांच्यासह शाळेतील सर्व शिक्षक वृंद व शिक्षकेतर कर्मचा चारी उपस्थित होते अशारीतीने कार्यक्रम यशस्वीरीत्या संपन्न झाला.

# आदिवासांच्या प्रश्नांसाठी पाठपुरावा करू माजी मंत्री जयप्रकाश दांडेगावकर यांचे आश्वासन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली ९ सप्टेंबर**



आदिवासी बांधवांच्या न्याय प्रश्नांसाठी आपण सदैव पाठपुरावा करू असे अभिवचन माजी मंत्री जयप्रकाश दांडेगावकर यांनी वाई गोरक्षनाथ येथे आयोजित संवाद मेळाव्यात बोलताना दिले.

वसमत तालुक्यातील वाई गोरक्षनाथ येथे आदिवासी कल्याण संघाच्या वतीने आदिवासी संवाद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमास आदिवासी समाजाचे नेते माजी आमदार संतोष टार्फे, शरदचंद्र पवार राष्ट्रवादी कॉंग्रेस जिल्हाध्यक्ष दिलीप चव्हाण, आदिवासींचे नेते डॉक्टर सतीश पाचपुते, माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष अंबादास भोसले यांची प्रमुख उपस्थिती यावेळी बोलताना दांडेगावकर पुढे म्हणाले की आदिवासी समाज अजूनही दऱ्याखोऱ्यात विभागलेला आहे. विकासापासून कोसो दूर आहे. आदिवासी समाजाला विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी प्रामुख्याने वनपट्टे आदिवासींच्या नावावर करणे, घरकुलाला निधी वाढुन देणे, आदिवासी समाजाच्या मुलाचे नौकरीचा प्रश्न मोठ्या प्रमाणात आहे. आरक्षण असले तरी समाजात जागृती नसल्यामुळे आजही आदिवासी विकासाच्या प्रवाहात आलेला आदिवासींचे प्रश्न सोडवण्यासाठी आपण सर्वतोपरी प्रयत्न करू असे अभिवचन दांडेगावकर यांनी दिले. यावेळी माजी आमदार सतोष टारफे, आदिवासी युवक कल्याण संघाचे जिल्हाध्यक्ष डॉ सतीश पाचपुते यांनी आदिवासी समाजाने ऐकजुटीनी शक्ती जयप्रकाश दांडेगावकर व महाविकास आघाडीच्या पाठीमागे उभी करावी असे आवाहन केले. यावेळी दौलत हुबेड, शाम कदम बाबु दळवी, यल्लपा मिटकरीसह मोठ्या संख्येने आदिवासी बाधव उपस्थित होते.

# वैद्यकीय प्रवेश प्रक्रियेत बोगस घुसखोरी करणाऱ्यांची चौकशी करा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली ९ सप्टेंबर**

एमबीबीएस, बीडीएस, बीएएमएस, बीयुएमएस, बीपीटी या वैद्यकीय प्रवेश प्रक्रिया २०२४ मध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची यादी प्रसिध्द करण्यात आली असून यामध्ये बोगस २४६ राजपूत भामटा आणि ६६ बोगस छप्परबंद विद्यार्थ्यांनी घुसखोरी केली असल्याचा आरोप गोरसेनेच्यावतीने करण्यात आला आहे. या सर्वांची एसआयटीमार्फत चौकशी करून खऱ्या विमुक्त जाती प्रवर्गातील उमेदवारांना न्याय द्यावा अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. यावेळी जिल्हाध्यक्ष शेषराव चव्हाण यांनी सांगितले की, बोगस जातवैधता प्रमाणपत्रांची फेरतपासणी करणे आवश्यक असून दोषी आढळल्यास प्रवेश रद्द करून त्यांच्या जागेवर प्रवेशापासून वंचीत राहीलेल्या योग्य विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावा. निवेदनावर जिल्हाध्यक्ष शेषराव चव्हाण, बन्सी राठोड नारायण बाबा राठोड, रवि राठोड आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# परळीकरांची सेवा हा माझा धर्म आणि कर्तव्य, अखेरच्या श्वासापर्यंत निभावत राहीन-धनंजय मुंडे

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.९ सप्टेंबर**

आज राजकारणात व समाजकारणात जो काही आहे तो केवळ आणि केवळ परळीतील जनतेच्या आशीर्वादामुळे आहे. त्यामुळे सत्ता असो नसो, परळीकरांची सेवा करणे हा माझा धर्म आणि माझं कर्तव्य आहे आणि हे कर्तव्य मी अखेरच्या श्वासापर्यंत निभावत राहीन, असे मत बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी पूरग्रस्त कुटुंबियांशी संवाद साधताना व्यक्त केले आहे.

परळी वैजनाथ शहरातील सरस्वती नदीला मागील आठवड्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे पूर आल्याने पुराचे पाणी काही घरांमध्ये शिरून कौटुंबिक साहित्य, कपडे, भांडी, अन्नधान्य आदींचे नुकसान झाले होते. त्यांना तात्काळ दिलासा म्हणून धान्याच्या किट देण्यात आल्या, त्याचबरोबर प्रशासनाच्या नियमानुसार तहसील कार्यालयामार्फत प्रत्येक बाधित कुटुंबाला प्रत्येकी पाच हजार रुपये तर कृषिमंत्री धनंजय मुंडे अध्यक्ष असलेल्या नाथ प्रतिष्ठान या संस्थेच्या मार्फत तब्बल दहा हजार रुपयांची आर्थिक मदत देण्यात येत आहे.



या मदतीचे आज धनंजय मुंडे यांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरूपात ३५ कुटुंबांना धनादेश स्वरूपर वितरण करण्यात आले. तर उर्वरित कुटुंबांना सोमवार व मंगळवार या दोन दिवसात घरपोच वितरण करण्यात येईल. ही मदत एकूण ५५० पेक्षा अधिक कुटुंबांना देण्यात येणार असून कुटुंबांची संख्या आणखी वाढण्याची शक्यता आहे.

वेगवेगळ्या नैसर्गिक आपत्ती मध्ये नाथ प्रतिष्ठान पुढाकार घेत परळीवासीयांच्या मदतीला पावलोपावली धाव घेत असते. आर्थिक दुर्बल कुटुंबातील हजारो मुलींचे सामुदायिक विवाह सोहळ्याच्या माध्यमातून कन्यादान करण्याचे कामही नाथ प्रतिष्ठानच्या वतीने आजवर करण्यात आलेले आहे. कडक लॉकडाउनच्या काळात देखील हजारो कुटुंबांपर्यंत अन्नधान्य किराणा भाजीपाला तसेच औषधी ते अगदी रेमडिसिव्हीर मोफत पोहोचवण्याचे काम सुद्धा नाथ प्रतिष्ठानच्या माध्यमातून करण्यात आलेले आहे. दिवाळी, ईद, गणेशोत्सव यासारख्या सणांच्या काळामध्ये देखील नाथ प्रतिष्ठानने अनेक वर्षांपासून आपली सामाजिक बांधिलकी जपली आहे, असेही धनंजय मुंडे पुढे बोलताना म्हणाले.

# बीड शहरातील महिलांसाठी दर्जेदार शिलाई प्रशिक्षण

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.९ सप्टेंबर**

कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय भारत सरकार द्वारा जन शिक्षण संस्थान बीड द्वारा जिल्ह्यात विविध कौशल्य विषयक प्रशिक्षण देण्याचे कार्य सुरू आहे. १५ ते ४५ वयोगटातील निरक्षर नव साक्षर तसेच दहावी बारावी पदवीपर्यंत शिक्षण घेतलेल्या महिलांसाठी मयूर निवास भगवान विद्यालय धानोरा रोड येथे प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यात आले असून यामध्ये एससी एसटी दिव्यांग विधवा परित्यात्क्या महिलांना निशुल्क प्रशिक्षण देण्यात येणार असून उर्वरित प्रवर्गातील महिलांसाठी अत्यल्प शुल्क आकारण्यात येणार आहे. तरी बीड शहर व धानोरा रोड परिसरातील जास्तीत जास्त महिलांनी या प्रशिक्षणाचा लाभ घेण्याचे आवाहन जन शिक्षण संस्थान बीडच्या वतीने संचालक श्री गंगाधर देशमुख यांनी केले आहे. संपर्क :- श्री सुदाम पालकर ९५२७४४०१४५, श्री नितीन क्षीरसागर ९७६५४०५८३७

# गोविंद इतापे यांच्यासह शेकडो युवकांचा मोहनराव जगताप यांच्या नेतृत्वाखाली जाहीर प्रवेश

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.९ सप्टेंबर**

माजलगाव शहरातील शेळके गल्ली परिसरातील युवा कार्यकर्ते गोविंद इतापे यांच्यासह मित्रमंडळाच्या शेकडो कार्यकर्त्यांनी मोहनराव जगताप यांच्या नेतृत्वाखाली जाहीर प्रवेश केला. माजलगाव येथील मोहनराव जगताप यांच्या संपर्क कार्यालयात प्रवेशाचा कार्यक्रम पार पडला यावेळी गोविंद ईतापे यांच्या मित्र मंडळाच्या सर्व युवकांनी मोहनराव जगताप यांच्या पाठीमागे संपूर्ण ताकद उभा करण्यासाठी हा प्रवेश करत असल्याचे सांगितले.



यावेळी मोहनराव जगताप त्यांनी सर्व युवकांसाठी आपले दार चोवीस तास उघडे असल्याचे सांगून युवकांच्या अडी अडचणी ते प्राधान्याने सोडवतील असे सांगितले. तसेच मोहनराव जगताप यांनी या युवकांच्या प्रवेशामुळे माझी ताकद वाढली असल्याचे सांगून गोविंद इतापे यांच्यासह सर्व युवकांचा यथोचित सन्मान केला. यावेळी गोविंद इतापे यांच्यासह पांडुरंग इतापे,अंगद रोमन, श्रीराम शेळके, गणेश शेळके, सुनील नावडकर, अनिल साळवे, बाळू साळवे, अशोक इतापे, नितीन शेळके, पांडुरंग गडदे, मोहसीन मोबीन, शेख हबीब, लक्ष्मीकांत साळवे, आकाश इतापे, सचिन धपाटे, रवी धपाटे, संभाजी मुंडे, सतीश रोमन, वशिष्ठ रोमन,मच्छिंद्र इतापे, विठ्ठलराव कोंबडे, अरुण गोमचाळे, भिकू पौळ, राम बावणे, संतोष वाघमारे, नाना पोळ, माऊली धुमाळ,दीपक सटाले,शिवाजी तांदळे, मेघराज नावडकर, मधुकरराव लोंढे, शिवाजी पवार, गजानन जाधव, गोपाल भंडारी, कृष्णा चौधरी, अर्जुन काकडे, अशोक जाधव, हबीब शेख यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी जाहीर प्रवेश केला.या कार्यक्रमाप्रसंगी संतोषराव यादव, माजी नगराध्यक्ष नानाभाऊ शिंदे, मा.नगरसेवक राम जगताप, शरदराव यादव, ईश्वर होके,जगदीशराव बादाडे,हनुमंतराव बादाडे, विलास महाराज बादाडे,राजेभाऊ वापटे,संभाजी नाईकनवरे,बप्पा देशमुख,प्रकाश चव्हाण,सिद्धेश्वर डाके, सरपंच अविनाश गोंडे, भालचंद्र सोळंके, मारोती विटेकर सर,राजूभाई सय्यद,रामेश्वर पठाडे, शाहेद भाई पठाण,सदाशिव रोडगे यांची प्रमुख उपस्थिती होती.

# धनंजय मुंडे यांच्या नाथ प्रतिष्ठान आयोजित वैद्यनाथ सार्वजनिक गणेश महोत्सवाचे शानदार उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.९ सप्टेंबर**

राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे अध्यक्ष असलेल्या नाथ प्रतिष्ठानच्या १९व्या वैद्यनाथ सार्वजनिक गणेश महोत्सवाचे शानदार उद्घाटन सुप्रसिद्ध अभिनेत्री पुष्पा फेम रश्मिका मंदांना व आदीपुरुष रामायणातील सीताफेम कृती सेनान यांच्या प्रमुख उपस्थिती झाले. यावेळी तमाम परळीकरांना स्मित हास्य देत रश्मिका मंदांना व गणपती बाप्पा मोरयाचा जयघोष करत अभिनेत्री कृती सेनान यांनी उपस्थित प्रेक्षकांची मने जिंकली. तर या व्यासपीठावरून विरोधकांचा खरपूस समाचार घेत धनंजय मुंडे यांनी नाथ प्रतिष्ठानच्या वेळोवेळी केलेल्या सामाजिक दायित्वाची साक्ष उपस्थितांसमोर मांडली.



धनंजय मुंडे अध्यक्ष असलेल्या नाथ प्रतिष्ठानच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यावर्षीही परळीकरांसाठी सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी म्हणजेच वैद्यनाथ सार्वजनिक गणेश महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवात दिग्गज कलाकारांच्या कार्यक्रमांचे व कला सादरीकरणाचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. या कार्यक्रमाचे शानदार उद्घाटन स्व.पंडित अण्णा मुंडे सहभागृह, जत्रा मैदान, परळी येथे आज झाले.

# केज परिसरातून राष्ट्रीय खेळाडूं निर्माण व्हावेत: खासदार बजरंग सोनवणे

**केज तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धा उदघाटन प्रसंगी**

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.९ सप्टेंबर**

केज प्रतिनिधी महाराष्ट्र राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालया अंतर्गत बीड जिल्हा क्रीडा कार्यालय व गटसधान केंद्र केज यांच्या संयुक्त विद्यमाने स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कुल केज याठिकाणी तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेस सुरुवात झाली.




स्पर्धेचे प्रमुख उदघाटन मा. खासदार बजरंगबप्पा सोनवणे साहेब यांच्या हस्ते झाले यावेळी या कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे सचिव श्री मा. श्री अंकुशराव इंगळेसाहेब होते तर प्रमुख उपस्थिती श्री. महाजन साहेब पोलीस उपनिरीक्षक केज हे होते. यांचे स्वागत प्रिन्सिपल गणेश कोकीळ सर व क्रीडा संयोजक श्री. विनोद गुंड सर यांनी केले

_ या वेळी मार्गदर्शन करताना खेळाडूंनी उत्कृष्ट खेळ खेळून आपल्या केजचे नाव राष्ट्रीय पातळीवर न्यावे अशी इच्छा यावेळी खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांनी व्यक्त केली. तर, या स्पर्धेसाठी पंच म्हणून बर्डे सर,गिरी सर, कांबळे सर, पवार सर, तोंडसे सर, नागरगोजे सर, शुभम जाधव सर, कोरडे सर, शेवाळे सर यांनी काम पहिले.या स्पर्धेला क्रीडाशिक्षक पटाईत सर, टिके सर, जोगदंड सर, खडबडे सर, लोंढे मॅडम, गिरी मॅडम उपस्थित होते.या प्रसंगी क्रीडा संयोजक विनोद गुंड सर यांनी प्रास्ताविक केले तर गिरी सर यांनी सूत्रसंचलन केले.या स्पर्धेत केज तालुक्यातील तीस पेक्षा अधिक संघांनी सहभाग नोंदवला होता.

# जी माणसे माणसा सोबत उचित व्यवहार करतात तेच खरे सुखी असतात-भिक्खू धम्मशील थेरो

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.९ सप्टेंबर**

माणसाचे माणसा सोबत असलेले माणुसकीचे नाते हाच बुद्ध धम्माचा केंद्रबिंदू आहे, म्हणून माणूस असाल तर माणसा सारखे वागले पाहिजे.जी माणसे माणसा सोबत उचित व्यवहार करतात तीच माणसे खरी सुखी असतात.समस्त मानव जातीला मनुष्यत्व प्राप्ती साठी बुद्ध धम्मा शिवाय पर्याय नाही.असे प्रतिपादन आपल्या साप्ताहिक प्रवचनात पूज्य भिक्खू धम्मशील थेरो यांनी केले.

सदधम्म सेवा संघाच्या वतीने श्रावस्ती बुद्ध विहार केसापुरी वसाहत येथे साप्ताहिक धम्मदेसनेच्या प्रवचन मालिकेत दि.८ सप्टेंबर २०२४ रोजी पू. भिक्खू धम्मशील थेरो आपल्या मानवी जीवनात बुद्ध धम्माचे महत्त्व या विषयावरील प्रवचन मालिकेत पहिले पुष्प गुंफताना बोलत होते. पुढे बोलताना भिक्खू म्हणाले की, बुद्धाचा धम्म हा बहुआयामी असून माणसाचे मंगल होण्यासाठी सर्वांगीण मार्ग सांगतो. मानवी जीवनाचा उत्कर्ष बुद्ध धम्मातच असल्यामुळे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी २१ वर्षाच्या काळात विविध धर्माच्या अभ्यासानंतर बुद्धाच्या धम्माचा स्वीकार केला.

धम्म मनोरंजनाचा नाही तर, धम्मात नीतीमतेला स्थान आहे. धम्म म्हणजे नीती आणि नीती म्हणजे धम्म आहे.



इथे मनाला विचारांचा आहार दिला जातो. आपले वर्तन सुधारायचे असेल तर केवळ मनोरंजन करून जमणार नाही. खरा धम्मरस समजून घ्यावा लागेल. अर्थात धम्माचा उद्देश समजून घ्यावे लागेल. यापैकी पहिला उद्देश माणसाने मनुष्यत्व प्राप्ती करून घेणे आहे.माणूस असाल तर माणसा सारखे वागा केवळ माणसासारखे दिसणे दिसणे अपेक्षित नाही. माणसाने जनावरासारखे वर्तन करू नये. असे दुर्गुण नष्ट करून माणसाने माणसासोबत असलेल माणुसकीचे नाते जपणे गरजेचे आहे.आणि हीच बुद्ध धम्माची खरी शिकवण आहे. माणसातील पशुत्व नाहीसे करणारे औषध म्हणजे बुद्ध धम्म होय.आजच्या पूजेचे यजमान लताताई मथुरादास बनसोडे आणि ज्योतीताई तेजसकुमार बनसोडे त्यांच्या वतीने उपस्थितांना भोजनदान देण्यात आले. प्रसंगी शहर पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक कणके यांचा सपत्नीक तर, सेवानिवृत्त कर्मचारी संघटनेचे शिवाजी धाईजे, वसंतराव जावळे, माजी नगरसेवक सचिन डोंगरे, माजी जि .प . समाज कल्याण सभापती गयाताई आव्हाड,वंचित आघाडीचे धम्मानंद साळवे,अंकुश जाधव,पूजेचे यजमान बनसोडे परिवार यांचा सद् धम्म सेवा संघाच्या वतीने सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड दशरथ मकसरे यांनी केले तर,आभार सदाशिव भालेराव यांनी मानले.या वेळी सद् धम्म सेवा संघाचे अरुण नाकलगावकर, श्यामराव वाघमारे, भगवानराव सातपुते, पांडुरंग जाधव, रविकांत उघडे, सोपानराव उजगरे, एम.बी.चांदमारे,जी एन घनगाव, वाल्हाबाई टाकणखार, लिलाबाई उजगरे, हे उपस्थित होते. तर राजश्री शाहू शिक्षक पथसंस्थेचे अध्यक्ष कपिल डोंगरे, मनीषा सिद्धार्थ ढवळे, शांताबाई साळवे, सुशीलाताई चांदमारे, पुनमताई धाईजे,दीपक भालेराव,बबनराव खोपे,विलास साळवे,राजरत्न खळगे,मनोरमाताई सोनवणे,आशाताई शिरसट, लक्ष्मणराव बनसोडे, गोविंदराव टाकणखार,नवनाथ गायकवाड, प्रा.संजय बागुल,अनिताताई वाघमारे,मीरा वाघमारे,कमलबाई श्रीमंतराव डोंगरे,सुधामती जावळे,इत्यादी बौद्ध उपासक उपासिका माजलगाव शहर आणि ग्रामीण भागातून या कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

# मी कोणाच्या नादी लागत नाही; माझ्याही कोणी नादी लागू नये-मनोज जरांगे पाटील

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.९ सप्टेंबर**

आरक्षणाची लढाई आपल्याला जिंकायची आहे. त्याशिवाय मराठा समाजाला गत्यंतर नाही. राजकारण येत राहील, होत राहील. मात्र अरक्षणापासून मराठा समाजाचे एकही घर वंचित राहणार नाही याची आपल्याला काळजी घ्यावी लागणार आहे. आरक्षणाच्या लढाईत आपण आता अंतिम टप्प्यात आहोत. शासनालाही आता आरक्षण दिल्याशिवाय पर्याय नाही. सरकारने जर आरक्षण नाही दिले तर त्यांना परत आपल्याला सत्तेवर येऊ द्यायचे नाही. देवेंद्र फडणवीस यांनी माझ्या विरोधात ट्रॅप रचला आहे, दररोज एक आमदार माझ्यावर गरळ ओकत आहे. देवेंद्र फडणवीस यांनी माझ्या नादाला लागू नये अन्यथा महाराष्ट्रात भाजपला बियाला माणूस उरणार नाही असा इशारा मराठा आरक्षण संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी दिला. ते परळी वैजनाथ येथे आयोजित घोंगडी बैठकीत बोलत होते.



परळी येथील हलगे गार्डन येथे घोंगडी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. जे जे लोक आणि नेते मराठा आरक्षणाच्या विरोधात गेले आहेत त्यांना येत्या विधानसभा निवडणुकीत हिसका दाखवणार आणि घरी बसवणार. मराठा समाजाच्या आरक्षणात राजकारण आणू नये अशी कळकळीची या राज्यकर्त्यांना विनंती आहे. फडणवीसांनी माझ्यावर सापळे रचण्यात वेळ घालवण्यापेक्षा गोरगरीब मराठा समाजाच्या घरात जाऊन बसावे आणि त्यांच्या वेदना समजून घ्याव्यात म्हणजे त्यांना समजेल की मराठा समाजाला आरक्षण कशासाठी लागते? मराठा समाजाच्या वेदना आणि अडचणी प्रचंड आहेत त्यांनी अगोदर त्या समजून घ्याव्यात. कष्ट करून लेकर शिकवायला काय संघर्ष करावा लागतो हे या निष्ठुर शासनाला कधीही कळणार नाही. मराठ्यांनी फडणवीसांनी मनमानी ऐकून घेण्यासाठी लेकरं शिकवले नाहीत.

# आयुष ग्लोबल स्कूलमध्ये गणरायाचे आगमन मोठ्या जल्लोषात





**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.९ सप्टेंबर**

आयुष ग्लोबल स्कूलमध्ये गणेश चतुर्थी निमित्त गणरायाचे आगमन मोठ्या थाटामाटात व जल्लोषात साजरे करण्यात आले. वक्रतुंड महाकाय सूर्यकोटि समप्रभ निर्विघ्नम कुर्मे देव सर्वकार्येषु सर्वदा मंत्रोच्चारांनी कार्यक्रमाची सुरुवात सकाळी नऊ वाजता झाली. संपूर्ण शाळा गणेशोत्सवाच्या निमित्ताने आकर्षकपणे सजवण्यात आली होती.

गणरायाच्या आगमनासाठी आयोजित मिरवणूक ढोल-ताशांच्या गजरात मोठ्या उत्साहात पार पडली, ज्यात शाळेतील चिमुकल्यांचा सहभाग उल्लेखनीय होता. प्ले स्कूलच्या विद्यार्थ्यांनी विविध गणेशगीतांवर नृत्य सादर केले. तसेच आयुष कोचिंगच्या विद्यार्थ्यांनी लेझीम व नृत्य सादर करत उपस्थितांचे लक्ष वेधले.गणेशोत्सवातील प्रमुख आकर्षण म्हणजे स्त्री अत्याचार या विषयावर साकारलेला लक्षवेधक देखावा. स्त्रियांवरील वाढत्या अत्याचाराच्या घटनांवर जनजागृती करण्यासाठी या देखाव्याद्वारे समाजात एक महत्त्वाचा संदेश दिला गेला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंकिता लाटे मॅडम यांनी केले. शाळेच्या संस्थापिका भाग्यश्री करवा मॅडम आणि संचालक सागर करवा सर यांनी विद्यार्थ्यांना गणेशोत्सवाच्या महत्त्वाबद्दल मार्गदर्शन केले. संपूर्ण कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षकवृंदाने विशेष मेहनत घेतली.

# परळी-बीड-नगर रेल्वेमार्गाची गती वाढविण्यासाठी मुख्यमंत्र्यांना भेटणार मजविप शिष्टमंडळ जिल्हाधिकाऱ्यांच्या भेटीला

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.९ सप्टेंबर**

परळी-बीड -नगर रेल्वे मार्गाचे काम संथगतीने सुरू असून त्याची गती वाढविण्यासाठी लवकरच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेणार असल्याचे प्रतिपादन माजी शिक्षक आमदार डी.के.देशमुख यांनी केले.

मराठवाडा जनता विकास परिषदेच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांची भेट घेऊन बीडसह माजलगाव,अंबाजोगाई,धारूर तालुक्यातील विविध विकास प्रश्नांबाबत निवेदन देऊन चर्चा केली. यामध्ये परळी-बीड-नगर रेल्वेमार्गाच्या कामासह,अंबाजोगाई तालुक्याला जिल्ह्याचा दर्जा देणे, धारूर घाटातील रस्त्याचे रुंदीकरण करणे,माजलगाव मधील शासकीय आरक्षित जागेवरील अतिक्रमणे काढणे यांसह जिल्ह्यातील ३० मागण्यांचा यामध्ये समावेश असून यासंबंधी जिल्हाधिकारी यांनी शासनाकडे पाठपुरावा करावा अशीही मागणी करण्यात आली.यावेळी माजी आमदार डी.के.देशमुख यांच्या नेतृत्वाखालील या शिष्टमंडळात जिल्हाध्यक्ष राजेंद्र आगवान,जिल्हा सचिव सुमंत गायकवाड, शिरीष देशमुख, प्रा.पी.के.देशमुख, सुहास देशमुख,हिमांशू देशमुख, प्रा. डी. एच.थोरात, ,डी.जी.तांदळे, जी.बी.गदळे,आर. एल. राऊत,प्र. का.कल्याणकर,आर.जी.जाधव यांसह कार्यकर्त्यांची मोठी उपस्थिती होती.




दीनदयाळ नागरी सहकारी बँक म., अंबाजोगाई
DNS Bank Ltd. Ambajogai
"दीनदयाळ भवन", परळी रोड, अंबाजोगाई. जि.बीड [illegible]. फोन-[illegible]
जा.क्र.दीन.वसुली/सरफेसी/०४/परळी-वै/एचवायपी-४६/६०/२०२४-२५ दिनांक ०६.०९.२०२४

वित्तीय मालमतेच्या सुरक्षितत्तिकरण आणि पुनर्निर्माण आणि सुरक्षा अधिकारी अंमलबजावणी अॅक्ट २००२ (२रा) च्या सेक्शन १३ (४) नुसार ताबा सुचना

## (ताबा सुचना)

प्रति,
(१) मे. युवराज एन्टरप्राईजेस प्रोप्रा. घाडगे अमित प्रल्हादराव
पत्ताः- अमित निवास, पद्मावती गल्ली, परळी-वैजनाथ, जि. बीड ४३१ ५१५
(२) श्री. अंकुश श्रीरंग जाधव
पत्ताः- टीपीएस कॉलनी, शक्तीकुंज वसाहत, परळी वैजनाथ, जि. बीड ४३१ ५१५
(३) श्री. प्रणव प्रमोदराव परळीकर
पत्ताः- शंकर पार्वती नगर, परळी वैजनाथ, जि. बीड ४३१ ५१५
विषयः-वित्तीय मालमत्तेच्या सुरक्षित्तीकरण आणि पुनर्निर्माण आणि सुरक्षा अधिकार अंमलबजावणी अॅक्ट २००२ (२ रा) च्या सेक्शन १३ (४) नुसार ताबा सुचना
संदर्भः बँकेची डिमांड नोटीस क्र. SARFAESI/04/HYP-46/15/2024-25 दिनांक १७.०५.२०२४ अन्वये.
महोदय,
उपरोक्त संदर्भीय डिमांड नोटीस दिनांक १७.०५.२०२४ नुसार मी खालील सही करणार आपणास सुचित करीत आहे की ६० दिवसाची मुदत पुर्ण होवुन व वेळोवेळी आपणास थकीत कर्ज भरण्याची मुदत देवुन सुधा थकीत कर्ज रक्कम जमा न केल्यामुळे खालील प्रमाणे वर्णन केलेल्या मालमत्तेचा ताबा कलम १३ (४) अंतर्गत ताबा घेण्यात येईल.
करीता आपणास कळविण्यात येते की, दिनांक २१.०९.२०२४ रोजी दुपारी ०१.०० वाजता (१५दिवसांच्या आत) किंवा त्यानंतर बँकेच्या वेळेनुसार केव्हाही आपल्या स्थावर मालमत्तेचा ताबा घेण्यासाठी येत आहे. स्थावर मालमत्तेचा ताबा घेण्यास व पंचनामा तसेच इंव्हेन्टरी तयार करतांना सहकार्य करावे.
तसेच आपणास कळविण्यात येते की, वरील कार्यवाही करतांना आपण अथवा इतर कोणीही कुठल्याही प्रकारे कार्यवाही मध्ये अडथळे निर्माण केल्यास अथवा कार्यवाही थांबविण्याचा प्रयत्न केल्यास सदर्हु वर्तन हे फौजदारी कार्यवाहीस पात्र राहील. कृपया नोंद घ्यावी.
परिशिष्ठः- मालमत्तेचे वर्णन
श्री.घाडगे अमित प्रल्हादराव यांच्या नावावरील मौजे जलालपुर ता. परळी वैजनाथ जि. बीड येथील गट क्र.३७/अ प्लॉट क्र.३० क्षेत्र पुर्व-पश्चिम १८मी. आणि दक्षिण-उत्तर-१०.२५ मी एकुण १८४.०० चौ.मी. १९७९.८४ स्वे.फु. मालकी भाडेकरु श्रमीक सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. परळी वैजनाथ जलालपुरचा भाग परळी वैजनाथ, जि. बीड त्यावरील बांधकामसह ज्याच्या चतुःसिमा खालीलप्रमाणेः-
पुर्व- प्लॉट क्र.३१ आणि ३२, पश्चिम कॉलनी रस्ता, दक्षिण- खुला प्लॉट, उत्तर-प्लॉट क्र.२९
(वरील मालमत्ता जशी आहे तशी व आहे त्या स्थितीत')

अधिकृत अधिकारी

बीड विभागीय कार्यालय : आदर्शनगर गणपती मंदिरासमोर पांगरी रोड, बीड मो.९४०३२६४९३०, E-Mail - jagannathdeshmukh2020@gmail.com

### घरकुल विभागातील ऑपरेटर आडे व इंजी.रगडेसह

# पैश्यांची देवाण-घेवाण करणाऱ्या सहाय्यकावर बिडीओ गुन्हे दाखल करणार का?



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

परतुर पंचायत समितीच्या घरकुल विभागातील कंत्राटी कामगार अधिकाऱ्यांनी स्वतःच्या मर्जीने तसेच मौजे वरफळ येथील लाभार्थ्यांना बनावट बोगस ओबिसी पत्र लावत खुल्या वर्गातील नागरिकांना घरकुलांचा लाभ दिला तसेच तालुक्यातील अनेक गावात विविध प्रकारच्या घरकुल योजनेतून लाभार्थ्यांना लाभ मिळत आहे मात्र हा घरकुलाचा लाभ लाभार्थ्यांना घेवयाचा असल्यास या कंत्राटी ईतर ईंजिनिअरसह अक्षय रगडे हे पैस्यांची मागणी करतात तर रगडेंनी या पैस्याच्या देवाण घेवाण करण्यासाठी चक्क एका सहाय्यकाची नेमणुक केली आहे . व ऑपरेटर मुकेश आडे चक्क तिन हजारांची मागणी करत आहे याची अनेकांनी परतुरचे बिडीओ यांच्याकडे तोंडी तक्रारीही केल्या मात्र बिडीओ यांनी समज देत संबंधीत तक्रारीवर पांघरूण घातले आहे . तर परतुर पंचायत समितीच्या आवारात असाही आवाज ऐकू येऊ लागला कि , घरकुल विभागातील सावळ्या गोंधळात बिडीओ तांगडे यांचाही हिस्सा असतो हिस्सा असल्याने त्यांच्यावर कारवाई केली जात नाही . वरिल सर्व प्रकारच्या चर्चा , अरोप खोटे आसतील तर बिडीओ तांगडे यांनी सत्यता पडताळून संबंधितावर तात्काळ कारवाई करण्यात यावी अशी मागणी परतुरवासियांतून होत आहे .

# आमदार बबनराव लोणीकर हे पुढील सरकार मध्ये नुसते आमदार नाहीत तर मंत्री होणार – खा.अशोकराव चव्हाण

**तभा वृत्तसेवा**
**परतूर / प्रतिनिधी**

खोटे नेरेटिव्ह सेट करत जनतेच्या डोळ्यात धूळफेक करणाऱ्या, महाविकास आघाडीला येत्या विधानसभा निवडणुकीमध्ये जागा दाखवील असा विश्वास खासदार अशोकराव चव्हाण यांनी येथे व्यक्त केला ते परतुर येथे भाजपा कार्यकर्ता मेळावा व भव्य प्रवेश सोहळ्याप्रसंगी बोलत होते.

पुढे बोलताना ते म्हणाले की, राज्यातील महायुती सरकारने, सर्वसामान्य जनतेच्या वैयक्तिक लाभाच्या अनेक योजना राबवलेल्या असून या योजनांच्या माध्यमातून थेट गोरगरिबांना लाभ मिळत असल्याचे यावेळी बोलताना त्यांनी नमूद केले. पुढे बोलताना ते म्हणाले की, लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून, सर्वसामान्य घरातील महिलांना सक्षम करण्यावर सरकारचा भर असल्याचे सांगतानाच गोरगरीब सर्वसामान्य जनतेला, खऱ्या अर्थाने आधार देण्याचे काम राज्यातील महायुती सरकारने केले असल्याचे ते म्हणाले, पुढे बोलताना ते म्हणाले की माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर हे गेल्या ३५ वर्षांपासून राजकारणाच्या माध्यमातून सर्वसामान्य गोरगरीब जनतेचे सेवा करत असून खऱ्या अर्थाने ग्रामीण भागातील जनतेशी नाळ असणारा मराठवाड्यातील एकमेव नेता



असल्याचे यावेळी त्यांनी बोलताना नमूद केले. माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी यावेळी बोलताना सांगितले की, सर्वसामान्य जनतेचा आपल्यावर विश्वास असून आज या प्रवेशोहळ्याच्या माध्यमातून हजारो ग्रामीण भागातील युवकांनी शहरी भागातील युवकांनी भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केल्याचा आनंद असून येणाऱ्या काळात संपूर्ण ताकदीनिशी मतदारसंघाचा विकास करणार असल्याची ग्वाही यावेळी बोलताना त्यांनी दिली. यावेळी बोलताना भाजपा प्रदेश सचिव राहुल लोणीकर म्हणाले की येणाऱ्या विधानसभा निवडणुकीमध्ये माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर पुन्हा एकदा पन्नास हजारच्या प्रचंड मताधिक्याने निवडून येणार असून येणाऱ्या काळामध्ये विकासाचा हा झंजावता असाच कायम राहणार असल्याचे यावेळी बोलताना त्यांनी सांगितले, मतदारसंघामध्ये १७६० भावी झाले असून फिक्स आमदार हे बबनराव लोणीकर असल्याचे यावेळी बोलताना त्यांनी नमूद केले

यावेळी ११०० कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला त्यामध्ये काराळा येथील जीवनराव येवले, माऊली सोळंके, रवींद्र सोळंके, उमेश सोळंके राजेश कांबळे व सहकारी, फुलवाडी येथील ग्रामपंचायत अशोकराव वाघमारे सरपंच प्रल्हादराव लाहाडे, तर शेलगाव येथील काँग्रेसचे सोशल मीडिया जिल्हाध्यक्ष सचिन लिपणे व सहकारी परतूर शहरातील इंद्रजीत हिवाळे गाव भागातील इरफान शेख, लिंबोना तांडा येथील भरत राठोड, शेवली येथील गजानन पाखरे, कोकाटे हदगाव फाटा येथील कार्यकर्ते मरीबा झोटे, किर्ला तांडा येथील एस एस राठोड हेलस येथील रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे तालुका अध्यक्ष रमेश प्रधान शंकरराव राठोड,आसनगाव येथील गोकुळ खरात पांडे पोखरी येथील आकाश भदर्गे सुखदेव कुर्धने राहुल जगताप, मापेगाव येथील बाळासाहेब आठवे, पाटोदा येथील तुकाराम क्षीरसागर, भाऊराव भाकड, परतूर शहरातील सोशल मीडिया कार्यकर्ते संदीप पाचारे, लिंबोना तांडा येथील भरत कैलास राठोड उपसरपंच, भाऊसाहेब घोडे, दहिफळ खंदारे तांडा येथील बबनराव जाधव, आष्टी येथील सलीम बागवान शहानवाज कुरेशी वीरगव्हाण तांडा येथील संदीप चव्हाण अविनाश राठोड खुराड सावंगी येथील दगडू राठोड आकाश चव्हाण वझर सरकटे येथील गजानन सरकटे पंडित सरकटे किरला गावातील सोपानराव लांडगे गोविंदराव लांडगे, यांच्यासह हजारो कार्यकर्त्यांनी माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून भाजपामध्ये प्रवेश केला यावेळी भाजपा प्रदेश सचिव राहुल लोणीकर यांच्यासह गणेशराव खवणे, संदीप गोरे रमेश भापकर शत्रुघन सतीश राव निर्वळ माऊली शेजुळ जिजाबाई जाधव,राजेश मोरे अंकुश बोबडे बद्रीनारायण ढवळे अशोकराव बरकुले, विठ्ठलराव काळे सुजित जोगस संपतराव टकले तुकाराम सोळंके संभाजी वारे रवींद्र सोळंके प्रवीण सातोणकर कैलास चव्हाण कृष्णा आरगडे, सुरेश जगताप, बंडू मानवतकर, विलास घोडके, विकास पालवे, मोहन आ ढे नरसिंग राठोड विक्रम उफाड पद्माकर कवडे, प्रसाद राव गडदे नागेशराव घारे, माझी शेंडगे प्रदीप ढवळे नरेश कांबळे दिगंबर मुजमुले प्रकाश टकले दिलीप पवार अशोक डोके किशोर हनवते आनंद जाधव नागेश घारे दत्तराव कांगणे, राजेश म्हस्के शिवाजी पाईकराव, संदीप बाहेकर, प्रकाश चव्हाण, कृष्णा आरगडे, संजय भालेकर सुधाकर बेरगुडे गजाननराव देशमुख, दारासिंग चव्हाण नितीन सरकटे, राजेंद्र वायाळ, प्रमोद राठोड संतोष शेवाळे पिंटू काका ढवळे, रमेश आढाव, मधुकर मोरे, नसरुल्ला काकड, रफिक मिस्तरी, अमोल जोशी बबलू सातपुते, सिताराम राठोड, अर्जुन राठोड यांच्या सह हजारो कार्यकर्त्यांची उपस्थिती होती

## संक्षिप्त

### याच शैक्षणिक वर्षापासून मेडिकल कॉलेज सुरू होईल –आ.गोरंटयाल



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनीधी**

जालना येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील प्राध्यापक आणि सहयोगी प्राध्यापकांची पदे तातडीने भरावीत यासाठी शासनस्तरावर प्रयत्न सुरू आहे. शासनाने सदर पदे भरल्यास याच शैक्षणिक वर्षापासून सदर कॉलेज सुरु होईल असा विश्वास आ. कैलास गोरंटयाल यांनी व्यक्त केला आहे.

जालना येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय मंजुरी पासून त्यासाठी जागा निश्चिती आणि अन्य सर्व बाबींची पूर्तता करण्यासाठी आ. कैलास गोरंटयाल यांनी सातत्याने पाठपुरावा केला असून विधिमंडळाच्या पावसाळी, हिवाळी व अर्थसंकल्पीय अधिवेशनात देखील या प्रश्नावरून सभागृहात टोकाचा संघर्ष करत जालन्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय मंजुरीसाठी विशेष प्रयत्न केले आहेत. राज्य सरकारने त्यांच्या या संघर्षाची दखल घेत जालन्यातील मंजूर करण्यात आलेल्या या महाविद्यालयाच्या इमारत बांधकामासह वसतिगृह आणि अन्य बाबींसाठी तब्बल ४०४ कोटी रुपयांचा निधी देखील मागील काही महिन्यांपूर्वी मंजूर करून त्याची तरतूद केली आहे. मात्र, पद भरतीची प्रक्रिया पूर्ण न झाल्यामुळे जालन्यासह राज्यातील ११ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांना पदभरती करण्यासाठी केंद्रीय आरोग्य पथकाकडून दोन महिन्याची मुदतवाढ देण्यात आली होती. दि. २४ जून २०२४ रोजी दिल्ली येथील वरिष्ठ अधिकाऱ्यांचे पथक जालना येथे आले होते. या पथकाने शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी निश्चित करण्यात आलेली जागा व अन्य बाबींची तपासणी करून त्यात काही त्रुटी काढल्या होत्या. मात्र सदर त्रुटींची पूर्तता करून त्याबाबतचा अहवाल मेडिकल कौन्सिलकडे पाठविण्यात आला असल्याचे सांगून आ.गोरंटयाल म्हणाले की, दि. ७ ऑगस्ट २०२४ रोजी व्हीसीद्वारे झालेल्या सुनावणीच्या वेळी जुलै ते ऑगस्ट २०२४ या कालावधीत महाविद्यालयाचे अधिष्ठाता यांच्या अधिकारात स्थानिक पातळीवर ११ सहाय्यक प्राध्यापक आणि १४ वरिष्ठ निवासी पदे भरण्यात आल्याचे सांगण्यात आले. मात्र, उर्वरित पदांची भरती न झाल्यामुळे प्रथम अपील अमान्य करण्यात आले होते. याप्रकरणी दुसरे अपील केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण या मंत्रालयाकडे दाखल करण्यात आले असून त्यावर उद्या दि. १० सप्टेंबर मंगळवार रोजी केंद्रीयमंत्री जे.पी. नड्डा यांच्या दालनात सुनावणी होणार असल्याचे आ. गोरंटयाल यांनी सांगितले. नियोजित शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी अपेक्षित असणारी जागा अधिष्ठाता यांच्या नावावर झाली असून जालना येथील सिव्हील हॉस्पिटलला मेडिकल कॉलेज संलग्न करण्यात आले आहे. शिवाय ग्लोबल गुरुकुलची जागा मेडिकल कॉलेजसाठी भाडे तत्वावर घेण्यात आली आहे. त्यामुळे आता केवळ प्राध्यापक आणि सहयोगी प्राध्यापक पद भरतीचा प्रश्न उरला असून राज्य शासनाच्या सचिवांनी पद भरती संदर्भातील हमीपत्र देखील केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयास सादर केले असून उद्या मंगळवारी त्यावर सुनावणी होणार असल्याचे आ.कैलास गोरंटयाल यांनी स्पष्ट केले. प्राध्यापक आणि सहयोगी प्राध्यापक या पदांची भरती तातडीने करण्यात यावी यासाठी आपण राज्य सरकारकडे पाठपुरावा करत असून त्यासाठी सरकारकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. ही पदभरती झाल्यास याच शैक्षणिक वर्षापासून जालन्यातील मेडिकल कॉलेज सुरू होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

### महिलेला पिको-फॉल मशीन प्रदान करून उपलब्ध करून दिला स्वयंरोजगार



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

लॉयन्स क्लब जालनातर्फे महिला सक्षमीकरण उपक्रमांतर्गत सुकन्या कुंडलकर यांना साडी पीको आणि फॉल करण्याची मशीन प्रदान करण्यात येऊन स्वयंरोजगाराचा मार्ग सुकर करून देण्यात आला. हा उपक्रम माजी प्रांतपाल आणि लायन्स परिवाराचे उपाध्यक्ष पुरुषोत्तम जयपुरीया यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून राबविण्यात आला.

सुकन्या कुंडलकर या सुशिक्षित महिलेने रोजगाराच्यादृष्टीने साडीला पिको-फॉल करण्याचे प्रशिक्षण घेतलेले आहे. मात्र, मशीन नसल्यामुळे तिचा रोजगाराचा मार्ग अडखळला होता. ही बाब विच-ारात घेऊन, साडी पिको, फॉल करण्याची मशीन प्रदान करण्यात आली. या मशीनमुळे तिचे आत्मनिर्भरतेकडे एक पाऊल पुढे पडले आहे. मशीन प्रदान सोहळ्याप्रसंगी लॉयन्स क्लबच्या अध्यक्ष जयश्री लड्ढा, सचिव मंजू श्रीमाली यांनी या स्तुत्य उपक्रमाबद्दल पुरुषोत्तम जयपुरीया यांचे स्वागत केले. याप्रसंगी बळीराम बेन्द्रे, वंदना मुदंडा, अरुण मित्तल, द्वारकादास मुदंडा, राजेश खीस्ते, प्रकाश कुंडलकर, जयप्रकाश श्रीमाली, अतुल लड्ढा, तसेच लायन्स क्लब जालना रॉयल्सच्या पद्मा लड्ढा उपस्थित होत्या. या उपक्रमाच्या माध्यमातून लायन्स क्लबने महिलांना आर्थिकदृष्ट्या सशक्त करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे.

# आ.राजेश टोपे यांनी केली अतिवृष्टीने नुकसान झालेल्या भागाची पाहणी

**तभा वृत्तसेवा**
**अंबड/प्रतिनिधी**

अंबड दि ८ सप्टेंबर तालुक्यातील अतिवृष्टीने नुकसान झालेल्या गोरी –गंधारी, डोमलगाव, साष्ट पिंपळगाव, बळेगाव, आपेगाव, दह्याळा या भागातील शेतीची पाहणी माननीय आमदार राजेश भैय्या टोपे यांनी आज दिनांक ८ सप्टेंबर रोजी केली.

यावेळी या भागातील मोठ्या संख्येने शेतकरी बांधव उपस्थित होते यावेळी नायब तहसीलदार भालचीम मॅडम, तालुका कृषी अधिकारी श्री सचिन गिरी, कडाच्या उपकार्यकारी अभियंता श्रीमती राठोड,सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपकार्यकारी अभियंता श्री दगुला उपस्थित होते. मागील आठवड्यात अतिवृष्टीमुळे या भागातील कापूस सोयाबीन उसाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. शेतात मोठ्या मोठ्या प्रमाणात पाणी साचलेले असून त्यामुळे पिके पिवळी पडून ऊस वाऱ्याने पडला आहे. यावेळी माननीय आमदार राजेश टोपे



साहेब यांनी सरसकट शासनाने शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी केली. यावेळी भाऊसाहेब कणके, संजय कणके, सहदेव भारती, रजियोद्दीन पटेल, बाळासाहेब नरवडे,रमेश निवारे, अरबाज तांबोळी, विनायक मचे, संदीप तिळवणे, कालु पाटील खराद, आसाराम खराद, इंदर पाटील खराद, सुरेश औटे , महादेव तांबडे,गणेश शिंदे, गजानन चौधरी, अर्जुन चौधरी, राजू देशमुख, विश्वंभर गारुळे, भागवत बर्वे आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पिरपिंपळगाव येथील ग्रामपंचायत सदस्य बाळू बनसोडेचा समर्थकांसह शिवसेनेत प्रवेश



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

जालना विधानसभा मतदारसंघातील मौजे पीर पिंपळगाव येथील ग्रामपंचायत सदस्य बाळू बनसोडे यांनी आपल्या असंख्य समर्थकांसह शिवसेनेत शिवसेना उपनेते अर्जुनरावजी खोतकर यांच्या प्रमुख उप-स्थितीमध्ये व शिवसेना शहरप्रमुख पाच फुले समाजसेवक नजीर भाई शेख यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. हा प्रवेश सोहळा भाग्यनगर येथील दर्शना बंगल्यावर छोटेखानी कार्यक्रमात पार पडला. यावेळी युवासेना सचिव अभिमन्यू दादा खोतकर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बाळू बनसोडे ग्रामपंचायत सदस्य, मधुकर गायकवाड, गजानन गजर, रियाज शेख, अशोक मंडाळे ,कपिल बोर्डे ,अजय मगर ,अभिजीत खिल्लारे, मनोज मगर ,विजय मगर, आवेज शेख, हकीम शेख, इमरान शेख ,रामजी शेळके ,आकाश हिवाळे, सत्तार सय्यद, रोहिदास सरगंडे, हमदीप लगाने ,योगेश खिल्लारे, शेख इरफान, ऋतिक बनसोडे, रामदास गाडगे ,गोविंद शेळके, अजय शेळके संदीप हिवाळे संजय शेळके, अजय हिवाळे, अक्षय चोरमारे, ऋषिकेश जराड, सोपान बरकाटे ,श्रावण शेळके, योगेश वाघमारे, शैलेंद्र हिवाळे ,अल्ताफ शेख, आकाश गायकवाड ,बळी मगर ,जीवन शेळके ,अभिषेक शेळके, आकाश कोल्हे, वैभव कोल्हे, विश्वास कोल्हे ,अभिषेक हिवाळे, युवराज शेळके ,राजू शेळके, किरण शेळके, आदींनी शिवसेनेत जाहीर प्रवेश केला या सर्व प्रवेशकर्त्याचे शिवसेना उपनेते अर्जुनराव खोतकर व अभिमन्यू खोतकर, विष्णू पाचफुले, नजीर भाई, यांनी शिवसेना पक्षात प्रवेश केल्याबद्दल स्वागत केले व त्यांचे आभार व्यक्त केले. यावेळी शिवसेना उपजिल्हाप्रमुख गणेश दादा सुपारकर ,एडवोकेट अनुराग कपूर ,नगरसेवक राहुल हिवराळे ,राज रत्नपारखे, यशराज खोतकर, विभाग प्रमुख किशोर शिंदे सह आदी संख्येने उपस्थित होते.

# स्विफ्ट कार व रिक्षाचा अपघात; नऊ जण जखमी तर एक ठार

**तभा वृत्तसेवा**
**मंठा/प्रतिनिधी**



मंठा-जिंतूर राज्य रस्त्यावर हेलस पाटीजवळ कार व रिक्षाचा अपघात झाल्याची घटना( ता९) सोमवार रोजी घडली आहे. यात रिक्षातील प्रवासी जखमी झाले आहेत.या अपघातात ज्येष्ठ नागरिकांसह महिला व विद्यार्थ्यांचा समावेश आहे. अपघातानंतर जखमी दहा प्रवाशांना मंठा येथील ग्रामीण रुग्णालयात प्राथमिक उपचार करून पुढील उपचारासाठी जालना येथे पाठविण्यात आले असल्याचे वैद्यकीय अधिकारी वैशाली देशमुख यांनी सांगितले. यातील एका प्रवाशाचा उपच-ारादरम्यान जालना येथे मृत्यू झाला आहे.श्रीराम भाऊराव वाघ वय ४० वर्ष असे मताचे नाव आहे.

तर मोबीना इनुस शेख , रेहान रिया शेख वय ११ वर्ष , रफिया अफसर शेख वय पन्नास वर्षे , आशिया आर्या शेख वय सहा वर्ष , शेरूल्ला दादाभाई पटेल व ५५ वर्ष, सुगरा पटेल वय ४५ वर्ष , गोविंद गणेश हावळे वय बारा वर्षे , महादेव जेसोबा ५७ वर्ष , गणेश शिवाजी हावळे पस्तीस वर्षे हे नऊ जण जखमी झाले आहेत. यावेळी पोलीस निरीक्षक रवींद्र निकाळजे यांच्या पथकातील सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक नारायण आडे, श्याम गायके यांच्यासह इतर कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन सदरील ठिकाणची ट्राफिक व्यवस्थित केली.

# जनतेच्या कल्याणासाठी अहोरात्र कार्यरत असलेले रावसाहेब दानवें सारखे नेतृत्व जपले पाहिजे – खा.अशोकराव चव्हाण

**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन/प्रतिनिधी**

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाच्या पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकरावजी चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत ता. ९ सोमवार रोजी भोकरदन येथे मोठया उत्साहात संपन्न झाली. यावेळी आमदार संतोष पाटील दानवे, भाजपा जालना जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे, उपजिल्हाध्यक्ष राजेंद्र देशमुख, संघटन सरचिटणीस सिध्दीविनायक मुळे, जालना लोकसभा प्रमुख गणेश फुके, भोकरदन-जाफ्राबाद विधानसभा प्रमुख विजयनाना परिहार, भोकरदन भाजपा तालुका अध्यक्ष गणेश ठाले, जाफ्राबाद भाजपा तालुका अध्यक्ष नाना भागिले, जि.प.सदस्य सौ. आशाताई पांडे, मुकेश चिने, सुरेश दिवटे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलतांना आमदार संतोष पाटील दानवे म्हणाले की, खा.अशोकरावजी चव्हाण हे जरी आता भाजपा सोबत आले असले तरी ते मुख्यमंत्री असतांना त्यांचे काम मी पाहिले आहे. ते अतिशय शिस्तबध्द नेते असुन स्पष्ट बोलणारे आहे. ते मुख्यमंत्री असतांना त्यांनी कुठलाही भेदभाव न करता फक्त राज्याच्या हिताचे निर्णय घेतले आहे. त्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीमध्ये आम्ही सकारात्मकरीत्या निवडणुकीला सामोरे जाऊन भोकरदन-जाफ्राबाद विधानसभा मतदारसंघामध्ये परत एकदा भारतीय जनता पक्षाचा झेंडा फडकावु असे ते म्हणाले. यावेळी बोलताना खा.अशोकरावजी चव्हाण म्हणाले की, जालना



जिल्हयाचा जो काही सर्वांगिण विकास झाला आहे, त्याचे श्रेय केवळ माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे यांना जाते. त्यांनी केंद्रीय मंत्री असतांना जालना जिल्हयासाठी मोठ-मोठे प्रकल्प मंजुर करुन घेतले असुन मागील ३० ते ३५ वर्षापासुन ते गोरगरीब जनतेच्या कल्याणासाठी अहोरात्र कार्यरत आहे. त्यामुळे माजी मंत्री रावसाहेब पाटील दानवे यांच्यासारखे जेष्ठ नेतृत्व आपण सर्वांनी जपले पाहिजे. मी मुख्यमंत्री असतांना व माजी मंत्री रावसाहेब पाटील दानवे केंद्रात मंत्री असतांना आम्ही फक्त मराठवाडयाच्या विकासालाच प्राधान्य देत आलो आहे. माजी मंत्री रावसाहेब पाटील दानवे यांनी रेल्वेमंत्री असतांना मराठवाडया विकासाला चालना देण्यासाठी मराठवाडयामध्ये नविन रेल्वे मार्ग मंजुर करुन घेतले आहे. त्यांच्या या कार्यामुळे मराठवाडयाच्या सर्वांगिण विकासासह पर्यटनाला देखील चालना मिळणार आहे. आज सारथी सारख्या संस्थेच्या माध्यमातुन हजारो विद्यार्थी प्रशिक्षण घेत आहे. त्यासोबतच मराठा समाजाच्या बेरोजगार युवकांसाठी आण्णासाहेब पाटील आर्थिक महामंडळाच्या माध्यमातुन अत्यल्प व्याजदारामध्ये औद्योगिक कर्ज उपलब्ध करुन देण्याचे काम महायुती सरकाने केले आहे. त्यामुळे आज हजारो मराठा युवक उद्योजक बनुन आर्थिकदृष्ट सक्षम झाले आहे. त्यामुळे मराठा आर-क्षणाच्या मुद्दयावर नकारात्मक विचार न करता शासनाने मराठा समाजाच्या विद्यार्थ्यांसाठी केलेल्या ज्याकाही सध्याच्या सोयी सुविधा आहे, त्याचा मराठा समाजातील विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा व सकारात्मकरित्या निवडणुकींना सामारे जावे असे आवाहन त्यांनी यावेळी केले. याप्रसंगी भाजपाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, जि.प.सदस्य, पं.स.सदस्य, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक मंडळ, खरेदी विक्री संघाचे संचालक मंडळ, रामेश्वर सहाकरी साखर कारखान्याचे संचालक मंडळ,नगरसेवक यांची उपस्थिती होती

### माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांच्या विशेष प्रयत्नाने मंजूर कामांचे

# विधानसभा प्रमुख भास्करआबा दानवे यांच्या हस्ते लोकार्पण

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

जवळपास १ कोटी ८३ लक्ष्य रुपयांचा निधी २०२३-२४ वर्षांमध्ये बाजीउम्रद गावासाठी विविध विकासकामांसाठी मंजूर करण्यात आला आहे, यावेळी गावात सामाजिक सभागृहाचे बांधकामासाठी खासदार निधी अंतर्गत १० लक्ष्य रुपये, २५१५ योजनेंतर्गत सी. सी. रोड चे बांधकाम करण्यासाठी ५ लक्ष्य रुपये, तसेच खासदार निधी अंतर्गत नालीसह सी.सी. रोड चे बांधकाम करण्यासाठी २७ लक्ष्य रुपये, तांडा वस्ती योजनेंतर्गत बाजीउम्रद तांडा, रामनाईक तांडा येथे पेव्हर ब्लॉक बसविण्यासाठी १० लक्ष्य रुपये, तांडा वस्ती योजनेंतर्गत सी.सी. रोड बांधकाम करण्यासाठी ५ लक्ष्य रुपये व भूमिगत नालीचे बांधकाम करण्यासाठी १० लक्ष्य रुपये तसेच तांडा वस्ती योजनेंतर्गत सि.सि. रोड चे बांधकामासाठी १० लक्ष्य



रुपये असा निधी उपलब्ध करून दिला होता, यावेळी या सर्व पूर्ण झालेल्या कामांचे लोकार्पण करण्यात आले.

यावेळी बोलताना भास्करआबा यांनी सांगितले कि, बाजीउम्रद गावात हि विकासकामे मा. रावसाहेबदादा दानवे यांच्या नेतृत्वात निरंतर होतच राहतील. जालना जिल्ह्यात नवीन जालना-जळगाव रेल्वे, ड्राय पोर्ट सारखे मोठे प्रकल्प येत आहेत त्यांच्यामुळेच आज जालना शहर देशाचा नकाशावर झळकत आहे, अजिंठा-बुलढाणा, जालना-वडिगोद्री यांसारखे प्रमुख रस्ते त्याच प्रमाणे भारतमाला योजनेअंतर्गत बांधण्यात येणारा ६ पदरी जालना-संभाजीनगर यांसारखे जवळपास ६००० कोटींचे रस्ते दादांच्या माध्यमातून बांधण्यात आले अहेत असे सांगितले. त्याचप्रमाणे यापुढेही आपल्या बाजीउम्रद गावाला कधीही कुठल्याही प्रकारचा निधी कमी पडू दिला जाणार नाही असे आश्वासन यावेळी दिले.

तसेच गावकऱ्यांच्या मागणी नुसार गावात ४ ठिकाणी पेव्हर ब्लॉक बसविण्यासाठी ९५०५ योजनेंतर्गत प्रत्येकी १० लक्ष्य रुपये, तसेच ९५०५ योजनेंतर्गत गावांतर्गत सि.सि. रोड चे बांधकाम करण्यासाठी १० लक्ष्य रुपये निधी मंजूर करण्यात आला आहे, यावेळी या नवीन कामांचे भूमिपूजन करण्यात आले. त्याच प्रमाणे २ ठिकाणी मातोश्री पाणंद रस्ते योजनेंतर्गत पाणंद रस्त्याचे बांधकाम करण्यासाठी प्रत्येकी १८ लक्ष्य रुपये व बाजीउम्रद ते निरखेडा रस्त्याची सुधारणा करण्यासाठी जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत १० लक्ष्य रुपये निधी मंजूर करून या कामाचेही भूमिपूजन करण्यात आले.

याप्रसंगी जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे, सरचिटणीस सिद्धिविनायक मुळे, तालुका अध्यक्ष वसंतराव शिंदे, कार्यक्रमाचे आयोजक संजय डोंगरे, दिपक पडूळ, गणेश सवडे, अनिल सरकाटे, कैलास उबाळे, विष्णु डोंगरे, बद्रीभाऊ भसांडे, काकासाहेब घुले, निवृत्ती लंके, निवृत्ती गायकवाड, उत्तमभाऊ घुले, ज्ञानेश्वर राठोड, अतुल चव्हाण, विनायक पवार, राजाभाऊ कळकुंभे, राजू राठोड, गजानन घुले, पुजाराम भुतेकर, राम जाधव, सुभाषराव भुतेकर, गौतम सरकाटे, राज-ाराम जाधव, दत्ता जाधव, विलास जाधव, गोपाल चौधरी, सुरेशराव डोंगरे, श्रीधर डोंगरे, बबन डोंगरे, नामदेव पडूळ, जगन पडूळ, रामेश्वर डोंगरे, महादेव डोंगरे, निवृत्ती डोंगरे, राजू आप्पा डोंगरे, शरद पडूळ, बळीराम पडूळ, सोपानराव कोरडे, हरिभाऊ लहाने, गणेश सवडे, उद्धवराव डोंगरे, नितीन डोंगरे, योगेश डोंगरे, मनोहर डोंगरे, चांगदेव डोंगरे, कृष्णा थोरात, विकास शिंदे, बाळू पडूळ, गणेश शिंदे, भगवान लोखंडे यांच्यासह अनेक भाजप कार्यकर्ते व गावकरी मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.